ब/83
अ/3/926
अ/3/926

संगीत प्रणयानंद.

किंमत ०–८–०.

अ/3/1210

रंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ५१ वें.

प्रणयानंद.

[संगीत सातअंकी नाटक.]

श्रीयुत जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर,

यांनीं लिहिलें.

[प्रथमावृत्ति.]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

मत ०-८-०.] सर्व हक्क स्वाधीन. [जून, १९१०.

Printed at the Nirnaya Sagar Press,
by B. R. Ghaneker, for the Publishers:
MANORANJAK GRANTHA PRASARAKA MANDALI,
BOMBAY.

३१/3/92८

प्रस्तावना.

श्रीहर्ष महाकवीची प्रियदर्शिका नाटिका व बृहत्कथासागरांतील वत्सराजाची कथा, यांच्या आधारानें प्रस्तुत नाटक लिहिलें आहे. प्रयोगाच्या सोईसाठीं कथानकांत थोडाबहुत फेरफार केला आहे. पद्यांच्या चाली अगदीं सुगम व त्या त्या रसास परिपोषक अशाच घालण्याचा प्रयत्न केला आहे. या नाटकांतील बहुतेक पद्यें चांगल्या नामांकित गवयांकडून ह्मणवून घेऊन व त्यांच्या सूचनेप्रमाणें तीं दुरुस्त करून, मग घातलीं आहेत. प्रस्तुत नाटकास डे. व्ह.ट्रॅ. सोसायटीनें बक्षीस दिलें आहे. माझे मित्र रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं नाटकाची हस्तलिखित प्रत वाचून पाहून पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. नाट्यरचनेच्या कामीं रा. गद्रे यांच्या संस्कृत प्रियदर्शिकेच्या भाषांतराचें फार साहाय्य झालें, याबद्दल त्यांचेहि आभार मानणें रास्त आहे.

पुणें १–६–१०.

ज. र. आजगांवकर.

या नाटकांतील पात्रें.

सूत्रधार.	नाटकाचा कर्ता.
दृढवर्मा.	चंपावती नगरीचा राजा (प्रियदर्शिकेचा पिता).
वसुभूती.	दृढवर्म्याचा प्रधान.
धौम्य.	दृढवर्म्याचा कुलगुरू.
वत्सराज.	नायक (कौशाम्बी नगरचा राजा).
विदूषक.	वत्सराजाचा मित्र.
यौगंधरायण.	वत्सराजाचा प्रधान.
विजयसेन.	वत्सराजाचा सेनापती.
प्रियदर्शिका.	नायिका (दृढवर्म्याची कन्या).
वासवदत्ता.	वत्सराजाची राणी.
मनोरमा. इंदिवरिका. मधुकरी.	वासवदत्तेच्या दासी.

ऋषिकुमार, कंचुकी, सेवक, दासी, वगैरे.

3/3/1928

संगीत

प्रणयानंद नाटक.

[सूत्रधार व पारिपार्श्वक प्रवेश करितात.]

नान्दी.

(चाल—सांबसुराभरणा०)

श्रीमन्नटवेषा । वंदन । आधीं कमलेशा ॥ वंदन ।
युगायुगीं अवतार धरी हा । धर्मस्थापक दुष्टविनाशा ॥ ध्रु० ॥
मृदुपन्नगशयना । प्रभुच्या । मंदस्मित वदना । पाहुनि ॥
संवाहक ललना । कमला । होई मुदितांतःकरणा । झाली ॥
घे सुस्वर वीणा । नारद । नामामृतपाना । करितो ॥
जें नामामृत सेवन करितां । पावति मुक्तदशा ॥ साधु ॥ १ ॥

सूत्रधार—

पद (यमन—कल्याण)

चकोर सुखकर शशिकरपानें । अथवा कमलिनि रविकिरणानें ॥ ध्रु०॥
पावति तोष; तसे तुम्हि केवळ । सेवुनि निशिदिनिं हरिपद निर्मळ ।
शांतवितां मन निसर्गचंचळ । नित्य तृप्तता हरिगुणगानें ॥ १ ॥
उदात्त तुमचे विचार सारे । नाहीं वैषम्याचें वारें ।
लवलां बहु विनयाच्या भारें । द्यावें अभय मला वरदानें ॥ २ ॥

(हात जोडून)—आतां रसिक व गुणज्ञ जनांस माझी इतकीच विनंति आहे, कीं—

कविकुलभूषण श्रीहर्षरचित वत्सराजचरितातें ।
संगीताचा वेष देउनी अर्पितसें तुह्मांतें ॥
दोष सकल टाका । कविचे गुणगण अवलोका ॥ १ ॥

(पारिपार्श्वक जातात, त्यांपैकीं एकास) मारिषा, जरा थांब. खरें ह्मटलें तर माझी प्रिया इतक्यांत इकडे यावयाची. ती अद्याप कां बरें आली नाहीं ? तिला ह्मणावें, मी इकडे तुझी वाट पहात आहें, क्षणाचाहि विलंब न करितां असशील तशी निघून ये. जा, पळत जा पाहूं कसा !

मारीष—आज्ञा महाराज.

[जातो.

सूत्रधार—(स्वगत) काय ती विसरली असेल? छे असें व्हावयाचें नाहीं. इतक्यांत आलीच पाहिजे ! (कानोसा घेत) हीं कोणाचीं बरें पावलें वाजत आहेत ? माझी प्रियाच असावी ही.

[नटी प्रवेश करिते.]

नटी—

पद (चाल—इतुके कां कोपलां.)

वाचित मी बसलें । सदनीं ॥
इकडे प्रियपति असतिल रुसले ॥ ध्रु० ॥
तत्प्रेमाहुनी मजला कैसें ।
गीतामृत रुचलें ॥ १ ॥
स्त्रीजीवन हें प्रेम पतीचें ।
व्रत दुसरें कसलें ? ॥ २ ॥

तर आतां, अगोदर क्षमा मागावी, हें उत्तम. (सूत्रधारास) मला इकडे यायला किंचित् अवकाश लागला, याबद्दल मी आपली क्षमा मागतें—

सूत्रधार—अगदींच वेडी तूं. यांत क्षमा मागण्यासारखें तें काय आहे ? वास्तविक पाहतां अशा अवेळीं मीं तुला इकडे बोलावली, याबद्दल मींच उलट तुझी क्षमा मागितली पाहिजे.

नटी—प्रिया, आपण असं बोलावं हें आपलं स्वभावसौजन्य होय. पण खरं ह्मणाल, तर क्षमा मागण्याचा अधिकार माझा अन् क्षमा करण्याचा अधिकार आपला आहे. यांपैकीं ज्याचा जो अधिकार तो त्यानं बजावला, ह्मणजे त्यांत जी मौज आहे ती दुसऱ्या कशांत नाहीं !

सूत्रधार—शाबास प्रिये ! ह्या तुझ्या विनयामुळेंच तूं मला जीव कीं प्राण होऊन बसली आहेस. बरें, हा विषय सध्या राहूं द्या; मी आज येथें कोणत्या हेतूनें आलों आहें, हें तुला ठाऊक आहे का ?

नटी—मी तरी आपणांस आतां हेंच विचारणार होतें:—

पद (**चाल**—खेळ चांगला वेषधर०)

नाट्यवेष हा धरुनि साजिरा,
काय योजिलें आज कविवरा !
थोर थोर हे रसिक जमविले,
नाट्यदर्शनीं जे सुखावले. १

सूत्रधार—प्रिये, या महाजनांच्या मनोरंजनार्थ, संगीत प्रणयानंद नांवाच्या एका नूतन व सुंदर नाटकाचा प्रयोग मी आतां येथें करून दाखविणार आहें, व असलेल्या अनुकूलतेवरून तो चांगला वठेल अशी माझी खात्री आहे.

नटी—आपण असें कशावरून ह्मणतां ? आजपर्यंत ज्या नाटकाचे प्रयोग आपण करून दाखविले त्यांपेक्षां आजच्या नाटकांत विशेष मोहकता ती काय असणार ?

सूत्रधार—वेडे, याहून मोहकता ती काय पाहिजे ?

पद (छायानट-त्रिताल.)

हर्षकवीची मधुरा वाणी ।
वत्सनृपकथा जन वाखाणी ॥ ध्रु० ॥
नाट्यकलेचा अभिज्ञ मी या ।
रसिक युवति तूं साह्य कराया, ।
गुणज्ञ जन हे, रंगस्थलिं या ।
मद्भाग्योदय झाला रमणी ॥ १ ॥

नटी—पण प्राणनाथ, ज्या वत्सराजाचें चरित्र रसिक जनांला एवढें प्रिय झालें आहे, तो वत्सराज होता तरी कोण ?

सूत्रधार—ज्याच्या चरित्राचें वर्णन करितांना गुणाढ्य व श्रीहर्ष अशांसारख्या महाकवींची वाग्देवता थकून गेली त्या वत्सराजाचा महिमा माझ्यासारख्या सामान्य माणसानें काय वर्णन करावा ? तथापि तुझी ऐकण्याची इच्छा असेल तर ऐकः—

(साकी.)

कौशाम्बीपुर थोर तयाचा सार्वभौम तो स्वामी,
दीन जनांचा रक्षणकर्ता नृपनयपथानुगामी;
शूर तसा ज्ञाता । वर्णू न शकें तच्चरिता. १

(पडद्यांत ' शाबास भरताचार्या ! शाबास !')

नटी—हें ग बाई काय ? आह्मी आमच्या नाटकासंबंधाच्या गोष्टी बोलत असतां, आपणांस मध्येंच एवढी धन्यता देणारा हा कोण ?

सूत्रधार—प्रिये ! त्या वत्सराजाच्या औदार्यानें ज्याचें कांहीं तरी कल्याण झालें आहे असा कोणीतरी परिजन अथवा याचक इकडे येत असावा असें वाटतें. तर चल आपण येथून निघून जाऊं.

[जातात.

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

[स्थल—अरण्य. दृढवर्म्याचा प्रधान वसुभूति व कन्या प्रियदर्शिका प्रवेश करितात.]

वसुभूति—शाबास भरताचार्या ! तूं वर्णन केलेंस तें अगदीं यथायोग्य केलेंस. (स्वगत) त्या कौशाम्बीच्या वत्सराजासारखा गुणरूपसंपन्न भूपति या जगतीतलावर सांप्रत एकहि नसेल. शौर्याचा तर तो केवळ पुतळाच आहे. आज माझ्या वयाला जवळ जवळ साठ वर्षें झालीं, एवढ्या कालांत जितके ह्मणून राजे या कौशाम्बीच्या सिंहासनावर बसले त्या सर्वांत सर्वगुणसंपन्न असा जर एखादा राजा झाला असेल तर तो वत्सराजच होय ! कवि त्याचे गुणानुवाद गाण्यांत धन्यता मानितात, टीकाकार त्याच्या दुष्कृत्यांवर आपणांस टीका करण्याचा प्रसंग कधीं येईल याची वाट पहात बसून निराशेनें लज्जित होतात, व देशोदेशींचे याचक जन त्याची कीर्ति ऐकून कौशाम्बी नगरीकडे धाव घेतात ! आणि अशा त्या नृपपुंगवाची, ही आमच्या दृढवर्मा महाराजांची एकुलती एक लाडकी कन्या प्रियदर्शिका अर्धांगी होऊन आपल्या गुणांनीं आणि सौंदर्यानें साऱ्या कौशाम्बी नगरीचें भूषण होऊन बसणार होती; पण दैवगति काय विचित्र आहे पहा ! त्या दुष्ट कलिंगानें आमच्या नगरावर अपरात्रीचा हल्ला करून आमची धुळधाणी उडवून दिली ! दृढवर्मा महाराज व राणीसाहेब हीं त्या गर्दींत कुठें गेलीं, अथवा त्यांची काय अवस्था झाली याचा पत्ताहि नाहीं ! काय करावें ! या सुकुमार राजकन्येला माझ्याबरोबर अशा या निबिड अरण्यांतून भटकण्याचा प्रसंग यावा ही केवढ्या दुःखाची गोष्ट ? परंतु दैवगतीपुढें मनुष्याचा काय उपाय चालावयाचा आहे ?

दर्शिका—वसुभूती, इतका वेळ आपल्याशींच काय बरं बोलत आहां ?

वसुभूति—बाळे, आतां आणखी बोलावयाचें काय राहिलें आहे ?

दर्शिका—असं नका हो बोलूं. आधींच दुःखानं पोळून गेलेल्या माझ्या मनाला, असल्या निराशापूर्ण भाषणानं तुह्मी नका आणखी घरे पाडूं. प्रभो ! काय माझं दुर्दैव हें ! शिव ! शिव !

पद (चाल—पतिवीणें मजसि कांहीं०)

जगिं नाहीं लव सुखाचा मज वाटे अंतरीं ।
मज वाटे अंतरीं । किति मी चिंता ही करीं ॥ ध्रु० ॥
जनकजननिनें मला सोडिलें ।
ऐशा व्यसनार्णवीं बुडालें ।
दुर्दैवानें वनीं धाडिलें ।
झालें किंकरी ॥ किति मी चिंता० ॥ १ ॥
देवा! अघटित कसें घडविलें ।
अकस्मात तें राज्य बुडविलें ।
नृपकन्या मी मला रडविलें ।
कैसें करूं तरी ॥ किति मी चिंता० ॥ २ ॥
मजसाठीं असु सोडिल जननी ।
रडेल निशिदिनिं मज आठवुनी ।
पुनरपि कधिं तिस पाहिन नयनीं ।
देवा! भूवरी ॥ किति मी चिंता० ॥ ३ ॥

वसुभूति—बाळे, आतां हा शोक पुरे कर. तुला असें रडतांना पाहून माझें हें वज्रतुल्य धीर हृदयहि तिळतिळ तुटूं लागतें. (रागानें) दुष्टा कलिंगा ! आमचा अन्यायानें पराभव करून तूं क्षात्रधर्माला कलंक लाविलास, सर्व महाजनांच्या व प्रजेच्या क्षोभाला कारण झालास आणि आह्मांला या भयंकर विपिनांतून भिकाऱ्यांप्रमाणें भटकावयास लाविलेंस! पण तुझ्या ह्या भयंकर अपराधाचा व तूं आजपर्यंत केलेल्या सगळ्या महापातकांचा तुला यथायोग्य जाब द्यावा लागेल व शेवटीं—

(साकी.)

ताडित ओढित दूत यमाचे नेतिल बांधुनि तुजशीं,
चरचर चिरितिल कंठ तुझा रे! अथवा देतिल फांशीं;
तेथें कोण तुला । त्राता होइल सांग खला ! १

दर्शिका—अहो वसुभूती ! त्या बिचाऱ्या कलिंगराजाला काय ह्मणून दोष द्यावा बरं ? मीच फुटक्या नशिबाची, ह्मणून आज या रानावनांतून अशी तळतळत फिरत आहें. देवा—

पद (राग जोगी–धुमाळी.)

ऐसें पातक केलें काय ? । न कळे तें प्रभुराय ! ॥ ध्रु० ॥
परम थोर अति शूरवीर नृपवर्यांची
मी कन्या । असतां, आली ही
दुःस्थिति । रडावें किती । भ्रमतसे मती ॥ १ ॥
त्यांतहि माझीं जनकजननी हीं ।
मजला टाकुनि गेलीं ।
आतां दृष्टीं पडतिल कशीं ।
लागली अशी । व्यथा मानसीं ॥ २ ॥

प्रभो ! माझ्यामुळं पुढं असा अनर्थ उद्भवणार हें जर तुला ठाऊक होतं, तर मला अभागिनीला जन्माला तरी कशाला घातलंस ? (रडूं लागते.)

वसुभूति—(स्वगत) पोर अगदीं कोमल मनाची पडली ! आतां हिची समजूत तरी कशी करावी ? (उघड) बाळे ! तूं आतां माझें ऐकणार, कीं, अशीच रडत रहाणार ? असल्या राजकारणाच्या गोष्टींत तुझा अज्ञ मुलीचा काय वरें संबंध असणार ?

दर्शिका—या उद्भवलेल्या संकटाशीं राजकारणाचा कांहीं संबंध नसून त्याचं कारण हें माझं दुष्ट सौंदर्य होय, हें तुम्हाला ठाऊक नाहीं वाटतं ? ऐका तरः—

पद (चाल—शाखा सद्गुण जया पालवी०)

गुणरूपाची ऐकुनि ख्याति, वत्सराज राजया ।
तातांनीं मज अभागिनीला योजियलें द्यावया ॥ ध्रु० ॥
कळतां मज हें आनंदानें वेडी मी जाहलें ।
परि तें माझ्या दुर्दैवाला प्रिय नाहीं वाटलें ॥ १ ॥
दुष्ट कलिंगें दूतमुखानें वार्ता ती परिसुनी ।
मजविषयीं मागणी कराया पत्र दिलें धाडुनी ॥ २ ॥
उत्तर त्याचें नच पाठविलें तातांनीं जाणुनी ।
अधमानें त्या सूड घेतला, वेळ असा साधुनी ॥ ३ ॥

असो; जें नशिबीं आलें तें भोगल्यावांचून सुटका का आहे ? बरं वसुभूति, आतां तुह्मी माझी काय व्यवस्था करितां ? का मला इथंच या भयंकर अरण्यांत सोडून जातां ? तसं केलंत तर येथील भयंकर वनपशूंच्या भक्षस्थानीं पडून या असह्य दुःखाग्नींतून मी एकदाची मुक्त तरी होईन !

वसुभूति—बाळे, असें वेड्यासारखें काय करतेस ? एवढी शहाणी मुलगी तूं आणि अशी रडत बसतेस हें काय बरें ? क्षत्रियांच्या बालिकांनीं संकटांस असें भ्यावें काय ? आतां, आपल्या समोरच जो हा उंच आणि वनश्रीनें गजबजलेला असा विंध्यपर्वत दिसत आहे, त्याच्या पायथ्याशीं महाराजांचा परम मित्र जो पराक्रमी विंध्यकेतु राजा त्याचें राज्य आहे. त्याच्यापाशीं तुला नेऊन ठेवतों व नंतर महाराज व राणीसाहेब यांच्या शोधास मी निघून जातों. तूं कांहीं काळजी करूं नकोस. त्या दीनदयाघन परमेश्वरावर भरंवसा ठेवून स्वस्थ रहा. चल तर आतां हळुहळू, माझी लाडकी ती.

[जातात.

प्रवेश दुसरा.

[**स्थल**-उपवन. राजा व विदूषक प्रवेश करितात.]

(पडद्यांत बंदीजन स्तुतिपाठ करितात.)

पद (पूर्वी-त्रिवट.)

सदा तव विजय असो भूपा ! प्रजाजनाच्या हरितां तापा ॥ ध्रु० ॥
यच्चरणीं धरणीवर सारे । नम्र सदा नृप कोण असा रे ।
एकचि शशि नभिं अनंत तारे । कीर्तीचा पथ नाहीं सोपा ॥ १ ॥
धीरललित तुज कविवर ह्मणती । वीर वीरवर तुजला गणिती ।
रिपुकारागृहीं झाली वरिती । विजयश्री, धरितां नच चापा ॥ २ ॥

राजा—मित्रा, या स्तुतिपाठकांनीं 'मी कैदेंत पडलों असतांहि विजयश्रीनें मला माळ घातली ' असें जें ह्मटलें तें अगदीं यथार्थ आहे. कारणः—

पद (**चाल**—ठाऊक मजला असे ऋषीचें०)

संकटकालीं अनुगजनांनीं नाहिं मला त्यजिलें ।
सचिवमनाचें योग्य परीक्षण सहजचि तें झालें ॥ ध्रु० ॥
आप्तजनींही विपत्समयिं मज नच अंतर दिधलें ।
प्रेमातिशयें पौरजनींही मन्मन तोषविलें ।
परवशतेचें दुःख कसें तें पूर्ण मला कळलें ।
विमुक्त होतां स्त्रीरत्नहि तें माझ्या करिं आलें ॥ १ ॥

आणि माझी युद्ध करण्याची जी पुष्कळ दिवसांची हौस तीहि शेवटीं पूर्ण झाली. एकंदरींत, प्रद्योत राजाच्या कैदेंत पडल्यामुळें माझा कांहींच तोटा न होतां उलट फायदाच झाला, असें ह्मटलें पाहिजे.

विदूषक—छे छे ! मी नाहीं बुवा हें खरें ह्मणणार ! अरे त्या कारागृह-सुखाची एवढी तारीफ करावयास, तें कारागृह ह्मणजे काय सहस्रभोजन होतें, कीं, एखादा लग्नसमारंभ होता ? जसा एखादा मस्त झालेला रानहत्ती एकांतांत कोंडून ठेविला असतां, रागानें संतप्त होऊन आपली लांबलचक सोंड भिंतीवर धडाधड आपटतो, आणि डोळे लाल करून टवकारून पाहतो, तद्वत् तुझी स्थिति त्या प्रद्योतराजाच्या कारागृहांत झाली होती आणि तिचेंच तूं सुख सुख ह्मणून जें मोठ्या बढाईनें वर्णन करितोस त्या तुला ह्मणावें तरी काय ?

राजा—किती अरसिक आहेस रे तूं ! त्या कारागृहांत होणाऱ्या दुःखाचें मात्र तूं वर्णन केलेंस, परंतु तेथें मीं जीं नानाप्रकारचीं सौख्यें भोगिलीं तीं कुठें तुला माहीत आहेत ?

विदूषक—वाः ! तीं आह्माला कशीं बरें माहीत असतील ? आह्मीं आपल्यासारखे प्रद्योत राजाच्या कैदेंत थोडेच पडलों होतों !

राजा—ऐक तर मगः—

पद (धनाश्री–धुमाळी.)

कारागारांतिल अंधारीं नृपतनयामुखचंद्रानें ।
शृंखल–शब्दहि पीडी, परि नवतरुणीमधुरालापानें ।
त्रास देति जरि रक्षक तरि त्या युवतीनेत्रकटाक्षानें ।
अमित दिलें मज सुख; परिणामीं वरिलें वासवदत्तेनें ! ॥ १ ॥

विदूषक—(स्वगत) या राजश्रींनीं तर उपमांवर उपमा ठेवून माझें भाषण अगदींच दडपून टाकिलें ! ठीक आहे, आतां याला असें विचारितों. (उघड) शाबास राजश्री ! तर मग आपण जे शेंकडों लोक अपराधी ह्मणून पायांत बिड्या घालून तुरुंगांत ठेविले आहेत, व त्यांनीं पळून जाऊं नये ह्मणून तुरुंगाच्या दरवाजावर लांब मिशांच्या धिप्पाड शिपायांचा पहारा ठेविला आहे, ते सगळे कैदी फार सुखी असतील तर !

राजा—हा वेड्या ! अरे, वासवदत्तेसारखें प्रमदारत्न हस्तगत करून कारागृहांतून निसटून जाणारे माझ्यासारखे सर्वच काय वत्सराज आहेत !

विदूषक—(स्वगत) या वेड्याला फारच गर्व झाला आहे. ह्मणे सगळेच काय आपल्यासारखे वत्सराज आहेत ! (उघड) अरे हेंच कीं नाहीं, कीं तूं चांगला गाणारा, तरणा बांड आणि गोरागोमटा आहेस हें पाहून ती खुळी प्रद्योततनया वासवदत्ता भुलली ! पण यांत एवढें नवल कशाचें ?

राजा—बरें मित्रा !

(साकी.)

विंध्यध्वज नृप जिंकायास्तव सेनाधिपती गेले,
विजय असे का अपजय नकळे जाउनि बहुदिन झाले;
झाली काय गती । संशय वाटतसे चित्तीं. १

[प्रतिहारी प्रवेश करिते.]

विदूषक—(प्रतिहारीस) काय गे ए कार्टे ! कोणीकडे एवढ्या घाईनें चाललीस ?

प्रतिहारी—(स्वगत) या द्वाड भटाला शिव्या दिल्याशिवाय मुळीं बोलतांच येत नाहीं वाटतं ? (उघड) महाराजांचा जयजयकार असो ! महाराज, विजयसेन सेनापति व यौगंधरायण प्रधानजी आपल्या आज्ञेची वाट पहात बाहेर उभे आहेत.

राजा—जा, त्यांनां लवकर इकडे घेऊन ये.

प्रतिहारी—आज्ञा महाराज.

[जाते.

[यौगंधरायण, विजयसेन व प्रियदर्शिका हीं प्रवेश करितात.]

राजा—यावें प्रधानजी.

विदूषक—यावें, सेनापतिसाहेब !

विजयसेन—(दर्शिकेस) विंध्यकन्ये! हे पाहिलेस का आमचे महाराज?

दर्शिका—(स्वगत) मी विंध्यकेतु राजाची कन्या आहें, अशीच यांची समजूत झाली आहे वाटतं! ठीक आहे. आपणहि आपलं कुलशील उघड न करावं, हेंच चांगलं. (राजाकडे पाहून स्वगत)

पद (चाल—टाकिला यानें०)

पाहुनी नयनीं। नयनीं भूपतिला।
होतसे हर्ष फार मजला॥ ध्रु०॥
उदार सुंदर हा। सुंदर हा नृपती।
दिसतो एकचि भूवरती॥ १॥
मदनाचा पुतळा। पुतळा जन गणिती।
याला मदन कां न ह्मणती?॥ २॥

आणि माझ्या प्रिय तातांनीं, याच महाराजांनां मला अर्पण करण्याचं योजिलं होतं; परंतु माझ्या अभागिनीचं इतकं थोर नशीब कुठं आहे? आतां तर या राजाची दासी होऊन राहणं मला भाग पडणार! शिव! शिव! माझे आईबाप जर या जगांत कुठंतरी जीवंत असले आणि ज्या वत्सराजाची मी पट्टराणी होणार होतें त्याचीच मी दासी होऊन राहिलें आहें असं त्यांनां समजलं, तर त्यांनां किती वाईट वाटेल बरं? असो. परमेश्वर ठेवील तसं राहिलं पाहिजे!

राजा—बरें विजयसेन! विंध्यकेतू राजावर केलेल्या स्वारीचा कसा काय परिणाम झाला?

विजयसेन—महाराज! परिणाम आणखी काय व्हावयाचा?

पद (शंकराभरण–झंपा.)

भीम भीषण जसा कुरुदलीं मी तसा।
शत्रुपुरिं चंडवेगेंचि शिरलों॥
विंध्यकेतू नृपा धाडुनी सुरपुरीं।
विजय संपादुनी आज आलों॥
नृपा! पुण्य हें आपुलें खचित आहे।
त्याविणें विजय हा किमपि नोहे॥ १॥

विदूषक—(स्वगत) काय बेटा चढून गेला आहे पण! याला वाटतें, कीं, शूरवर्य काय तो आपण आणि बाकी साऱ्या भागूबाईच आहेत !

राजा—शाबास !

(साकी.)

शूरवीर तूं धीर खरोखर रणनिपुणा रे ! विजया,
विजय पावुनी शत्रुदलावरि येसी, परि नच विनया;
त्यजिसी; हेंच खरें । तुजला भूषण कीं दुसरें. १

सेनाधीश ! या भयंकर युद्धप्रसंगाचा सविस्तर वृत्तांत श्रवण करावा अशी आमची फार इच्छा आहे.

विदूषक—(स्वगत) हें आतां आमचें कर्म उभें राहिलें ! आह्मी आपले स्वस्थांतःकरणानें गोष्टी बोलत बसलों असतां ही रिकामी कटकट येथें कुठून आली कोण जाणे ! आतां या विजयसेनाचें जें एकदा चऱ्हाट सुरू होईल तें भरदुपार होऊन भुकेनें पोटांत कावळे कोकलायला लागले तरी संपावयाचें नाहीं ! (उघड) अहो राजश्री ! आह्मी जातों आतां इथून.

राजा—अरे वेड्या थांब. असल्या युद्धाच्या कथा ऐकायाला भाग्य पाहिजे. सेनाधीश ! चालूं द्या तुमचें.

विजयसेन—महाराज ! हत्ती, घोडे आणि पायदळ अशा तीन प्रकारच्या निवडक सैन्यासह आपली आज्ञा घेऊन निघालों ते चौथ्या दिवशीं प्रातःकाळीं आह्मी विंध्यपुरी नजीक पोहोंचलों. सैनिकांस थोडा वेळ विश्रांति मिळाल्यावर त्याच दिवशीं रात्रीं आह्मीं विंध्यपुरीवर छापा घातला.

राजा—आणि विंध्यकेतु राजाहि स्वस्थ बसला नसेलच !

विजयसेन—आमच्या वीरांचा तो भयंकर सिंहध्वनि श्रवण करितांच राजा विंध्यकेतु स्वपरबलाबलाचा विचार न करितां विंध्यपर्वताच्या खिंडींतून सिंहासारखा एकदम बाहेर पडून आमच्या सैन्यावर तुटून पडला !

राजा—(मान डोलवून) शाबास ! वीर असावा तर विंध्यकेतूसारखाच !

विजयसेन—पुढें काय सांगावें महाराज ! हाच विंध्यकेतु असें समजतांच, ईर्षेनें दुप्पट बलयुक्त होऊन त्याचा सेनासमुद्र आह्मीं एका क्षणांत आटवून टाकिला. मग, सैन्यविरहित झाल्यामुळें तो शूर विंध्यकेतु क्रोधानें अगदीं संतप्त होऊन आमच्यावर अति तीक्ष्ण व भयंकर असे शरप्रहार करूं लागला.

राजा—शाबास, विंध्यकेतो! शाबास! खऱ्या क्षत्रियास साजेल असेंच शौर्य तूं दाखविलेंस. यौगंधरायण! खरे वीर कोणास ह्मणावें ?

पद (**चाल**–खेळ चांगला वेषधर०)

भूमिभाग हे विलसती पहा ।
यांचिया बळें, शूर हे महा ॥
देह मानिती जे तृणापरी ।
अपजयार्थ जे विकल अंतरीं ॥ १ ॥
विजयकंकणा हस्ति बांधुनी ।
राहती उभे युद्धरंगणीं ।
भीतिलेशही नाहिं अंतरीं ।
अंतिं भोगिती सौख्य सुरपुरीं ॥ २ ॥

यौगंधरायण—खरें आहे महाराज.

राजा—बरें, पुढें काय झालें विजयसेन ?

विजयसेन—मग जो कांहीं अनर्थ आणि प्रळय झाला, तो केवळ अवर्णनीय !

पद (**चाल**–शंकराभरण.)

चुरुनि वक्षस्थलें, पदचमू आमुची ।
वीर तो एकटा सकल मारी ।
अश्वबल झोडुनी हरिणशिशुसम नृपा ! ।
पळवि तो शरबलें सर्व दूरी ।
इतर शस्त्रें दिलीं टाकुनी सकलही ।
जाहला वीरवर खड्गधारी ।
कर्दळीवनिं करी केलि करि त्यापरी ।
सैन्यनिधि शोषिला घोर समरीं ।
किती शौर्य वर्णू तया राजयाचें ।
चकित झाले अहो ! नयन अमुचे ॥ ध्रु० ॥

शेवटीं तो महायोद्धा आमच्या सैन्यांत प्रळयकाळच्या चपलेप्रमाणें तळपत असतां, आमच्याकडील एका योद्धयाच्या शरप्रहारानें व्याकुल होऊन धारातीर्थी पतन पावला.

राजा—प्रधानजी, सत्पुरुषाच्या मार्गाचें अवलंबन करणाऱ्या विंध्यकेतूच्या मृत्यूनें आह्माला खरोखर खालीं पहावयास लाविलें!

यौगंधरायण—महाराज, आपल्यासारखे जे गुणाचे खरे परीक्षक व मार्मिक आहेत, त्यांनां शत्रूंचेहि गुण पाहून आनंद व्हावा, यांत आश्चर्य तें काय?

राजा—बरें विजयसेन, विंध्यकेतूचें एखादें अपत्य तरी मागें आहे काय?

विजयसेन—ऐकावें महाराज. विंध्यकेतु मृत्यु पावल्यावर नगरांतील सगळीं मनुष्यें नगर सोडून गेलीं. नंतर आह्मी त्या उदास व रक्तमय शहराच्या मुख्य रस्त्यांतून फिरत असतां, तेथें असलेला प्रचंड राजवाडा आमच्या दृष्टीस पडला. इतक्यांत, त्यांतून येणारा कोणा तरुणीचा करुणस्वर आमच्या कानीं आल्यावरून आंत जाऊन पाहतों तों एक अत्यंत रूपवती तरुण राजकन्या आमच्या दृष्टीस पडली. ती विंध्यकेतूची कन्या असावी, असें समजून मी तिला बरोबर आणिली आहे.

राजा—अरेरे! विजयसेन, आतां कोठें बरें असेल ती? विचारीला फार दुःख झालें असेल.

दर्शिका—(स्वगत) असो. या राजाला माझं वृत्त ऐकून माझी थोडी तरी दया आली, हें मोठं सुदैवच समजावयाचं.

विजयसेन—महाराज, ती कन्या ही येथें उभी आहे. (दर्शिकेस) बाळे, अशी पुढें ये.

दर्शिका—(पुढें होऊन व हात जोडून राजास)

पद (चाल-मी कुमार तीहि कुमारी०)

ही अनाथ भूपतिकन्या लीन असे तुमच्या पायीं ॥
तुह्माविण तारक आतां कोणी मज उरला नाहीं ॥
विपरीत गती नशिबाची, प्रतिकूल मला तें होई ॥
ही लीन दीन पदिं बाला ।
मूढमती केवळ अबला ।
घ्या पदरिं अतां भूपाला ।
नच सौख्य मनाला कांहीं ॥
पालन आजवरी केलें, त्या जनकें मजला त्यजिलें ॥ १ ॥

(सर्व डोळे पुसतात.)

राजा—

(दिंडी.)

राजकन्ये आवरीं शोक आतां,
लाभ झाला मुक्तिचा तुझ्या ताता;
समज आतां मी मित्र तुझा ऐसें,
तुझें दुःख मला साहवेल कैसें ? १

(प्रतिहारीस) यशोधरे, या राजकन्येला घेऊन वासवदत्तेकडे जा, आणि तिला सांग, कीं:—

(साकी.)

विंध्यनृपाची कन्या ही, हिस भगिनीसम समजोनी,
ठेवीं संन्निध, सदयपणें घे प्रेमानें वागवुनी;
तैशा सर्व कला । शिकवीं पूर्णपणें हिजला. १

(दर्शिकेस) बाळे, जा या यशोधरेबरोबर.

दर्शिका (नम्रतेनें)—

पद (चाल–कंथबिनरही०)

मानुं किती आभार । नृपवरा ।
झालां मज आधार ॥ ध्रु० ॥
ऐशा व्यसनार्णवीं घेतला
या अबलेचा भार ।
सुखकर होवो पूर्ण तुह्मांला
प्रभु तो विश्वविहार ॥ १ ॥

राजा—तूं वीरतनयाच आहेस त्या अर्थी असें भाषण तुला योग्यच आहे. जा, मी तुझें कधींहि अकल्याण करणार नाहीं.

विदूषक—आणि मीहि तुला आशीर्वाद देतों, कीं, या आमच्या राजश्री-सारख्याच एखाद्या सार्वभौम राजाची तूं पट्टराणी होशील व तुझें लग्न मोठ्या थाटानें आणि पंचपक्वान्नयुक्त भोजनानें सुशोभित होईल !

दर्शिका—(गालांत हंसते.)

राजा—(विदूषकास) काय वेडगळ आहेस रे. (दर्शिकेस) बाळे, जा तूं.

यशोधरा—(दर्शिकेस) चला बाई, आपण राणीसाहेबांकडे जाऊं.

[त्या जातात.

राजा—कां यौगंधरायण, विंध्यकेतूची मुलगी किती चांगली आहे?

यौगंधरायण—काय सांगूं सरकार, अशी चतुर व सुंदर मुलगी मीं आजपर्यंत पाहिली नव्हती.

(पडद्यांत वंदीजन गातात.)

पद–(राग सारंग.)

सार्वभौमनृपराजशिरोमणि ।
वाट पाहती या तव रमणी ॥ ध्रु० ॥
सुखदर्शन द्या निजचरणांचें ।
हर्ष जयांला तव आगमनीं ॥ १ ॥
सुतप्त झालें विश्व सकल हें ।
नभोमंडलीं तळपे तरणी ॥ २ ॥

राजा—(वर पाहून) खरेंच!

पद (गौड मल्हार–ताल त्रिवट.)
दीप्तकिरण हा विलसे गगनीं ।
भूषित झाला खरतर किरणीं ॥ ध्रु० ॥
नृत्यश्रमिता निजकांतेवरी ।
शिखि पिच्छांचें छत्र पहा धरी ।
शीतलजलपानार्थ सरोवरीं ।
हरिण चालिले सवत्स हरिणी ॥ १ ॥

यौगंधरायण, आतां वाड्यांत जाऊन या विजय संपादून आलेल्या विजयसेनाचा योग्य आदर करूं व त्यांस त्या दुष्ट कलिंगाचा सूड घेण्याकरितां पाठवून देऊं.

[तिघे जातात.

विदूषक—(उठून व ते गेले असें निरखून पाहून) अगदीं शर्थ झाली! काय रांडलेकानें माझें डोकें उठविलें! असो. मूर्खाशीं गांठ पडली ह्मणजे असेंच व्हावयाचें. बरें, आतां दिवस तर डोक्यावर आला. खालीं जमीन तर कशी पायांचे तळवे भाजून काढित आहे. काय करावें! पायांत जोडाहि नाहीं. त्या दिवशीं उपाध्येबुवांच्या येथें सहस्रभोजन होतें, त्या गडबडींत लाडवांच्या राशींत अडखळून पडलों, तेंव्हांपासून हा डावा पाय थोडा दुखवल्यामुळें चालतांना अमळ लंगडावें लागतें. माझी छत्रीहि त्या भिकंभटाच्या कार्यानें

दक्षिणेला जातों ह्मणून सांगून त्या दिवशीं नेली, ती अजून आणून दिली नाहीं. कोणावर उपकार करावयास जावें तर हें बट्कीचें असें वांकडें होतें ! बरें, आतां जेवणाची व्यवस्था कोठें करावी ? पोटांत भुकेनें कसे कावळे तडफडूं लागले आहेत ! परंतु अस्मादिकांसारख्या भोजनपंडितानें जेवणाचा शोध करित गांवांत भटकत फिरावें, हेंहि एकप्रकारें लज्जास्पद होय. तेंच, हवें तर या वसंतक ब्राह्मणास शोधित इकडे चालून येईल ! तोंपर्यंत आपण या दाट वृक्षांच्या थंड सावलींत, अमळ पाय लांब करावे ! (निजतो.)

(दासी मनोरमा, पदराखालीं फराळाचें ताट घेऊन प्रवेश करिते.)

मनोरमा—आज आमच्या वासवदत्ता राणीसाहेब आपल्या व्रताची सांगता करणार आहेत व त्यासाठीं वसंतक ब्राह्मणास त्यांनीं हें फराळाचं पाठवून, पहांटेपर्यंत न जेवण्याची विनंति केली आहे. तर हें ताट त्याच्या स्वाधीन करून व बाईसाहेबांचा निरोप त्याला कळवून आपण जावं. (इकडे तिकडे पाहून) पण भटजींची स्वारी इथं कुठं दिसत नाहीं. महाराज ह्मणाले, कीं, तिथंच कुठं तरी बसला असेल; पण नाहीं. स्वारी, लाडवांच्या शोधांत कुठं तरी झुकली असावी, असं वाटतं. (पाहून) वा ! हा तर या अशोक वृक्षाखालीं स्वस्थ झोंप घेत पडला आहे ! बराच दिसला ह्मणायचा ! असो; आतां याला हळूच जागं करावं. (जवळ जाऊन) अहो वसंतकभटजी, उठा. आपणांस कांहीं निरोप सांगाय्चा आहे.

विदूषक—(आळेपिळे देतो व बरळतो.)

मनोरमा—नुसत्या हांक मारण्यानें हा कांहीं जागा होत नाहीं. (त्याला हातानें ढळवून) अहो वसंतकभटजी, उठा उठा.

विदूषक—(एकदम उठून रागानें) काय द्वाड कार्टी आहे हो ही ! माझा नुकताच कुठें डोळा लागला होता, तोंच माझ्या कानाशीं येऊन एवढ्या मोठ्यानें आरडाओरड करावयास, असें तुझें काय अडलें होतें गे ? निर्लज्ज बटकीची !

मनोरमा—अहो, रात्रीची पुरी झोंप घेऊन आणखी दिवसाहि झोंप घेतली तर प्रकृति बिघडते, यासाठीं मीं तुह्मांला उठविलं. त्यांत एवढा राग कशाचा आला ?

विदूषक—हो हो ! माझ्या प्रकृतीस फार जपणारी ती आहेस ठाऊक मला. ' अहो वसंतकभटजी, हे शंभर बुंदीचे लाडू टाका तोंडांत, किंवा या

केशरी हलव्यांतला परातभर हलवा न्या आपल्या घरीं' असे शब्द तुझ्या तोंडांतून कधीं तरी आलेले तुला आठवतात काय गे? आणि ह्मणतेस राग कशास करावा? निद्राभंगासारखें दुसरें पातक नाहीं, समजलीस? तूं मनोरमा ह्मणूनच तुला क्षमा केली; परंतु, त्या इंदिवरिकेनें येऊन जर मला असें उठविलें असतें, तर या माझ्या दंडकाष्ठाचा एक तरी तडाखा तिच्या डोक्यांत दिल्याशिवाय मी कधींहि राहिलों नसतों. माझा राग आणि माझें डोकें फार विलक्षण आहे, समजलीस? या वेळीं, भुकेनें माझा चालला आहे प्राण! आणि त्यांत आणखी तुझी कटकट हवी आहे कोणा लेकाला? (तिच्या पदराखालील ताट पाहून) पण मनोरमे, पदराखालून काय आणलें आहेस गे हें? कांहीं फराळाचें आहे वाटतें.

मनोरमा—कांहीं का असेना? तुह्माला कां त्याची इतकी पंचाईत?

विदूषक—अगे बटकीचे पोरी, सांग तरी काय तें!

मनोरमा—अहो, हें बाईसाहेबांनीं तुह्माला फराळाचं पाठविलं आहे. आणखी तुह्मांला एवढ्या फराळावरच पहांटेपर्यंत राहावयास सांगितलं आहे. कारण, त्यांच्या व्रताची सांगता पहांटेस व्हावयाची असून त्या वेळीं तुह्माला तिथं हजर राहावं लागणार आहे.

विदूषक—शाबास! मग हें मला तूं पहिल्यानेंच कां बरें सांगितलें नाहींस? तसें केलें असतेंस ह्मणजे मी इतका रागावलों नसतों; असो. आधीं तें ताट दे इकडे व वासवदत्तेला सांग, कीं, 'वसंतक ब्राह्मणानें तुला 'अभीष्टसिद्धिप्राप्तिरस्तु' असा आशीर्वाद दिला आहे. आणि ह्मणावें, पहांटेस, व्रतसांगतेची व विशेषेंकरून सौभाग्यवाणाची उत्तम तयारी करून ठेव. मी अगदीं खात्रीनें येतों.

[जातात.

[पडदा पडतो.]

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

[राणी वासवदत्ता प्रवेश करिते.]

वासवदत्ता—काय चमत्कार आहे !

पद—(भीमपलास—आदिताल.)

नृपस्त्री एकटी भोगी ।
जगामध्यें सुखें सारीं ॥
नशीबाची ह्मणोनी ती ।
पडे बाई नृपागारीं ॥
जनाची भावना ऐशी ।
परी मिथ्याच ती वाटे ॥
सुखाचा लेश लाभेना ।
नृपागारीं मला कोठें ! ॥ १ ॥

तथापि एकंदरींत माझं पूर्वपुण्य सबळ होतं ह्मणूनच महाराजांसारखं नृपरत्न मला लाभलं. नाहीं तर, महाराज बावांच्या कैदेंत पडावे, तेथून युक्तिप्रयुक्तीनं मीं त्यांची मुक्तता करावी व माझ्यावर लुब्ध होऊन त्यांनीं माझा अंगीकार करावा, इतक्या गोष्टी कशा घडल्या असत्या ? असो. बरेच दिवस झाले. विजयसेन सेनापतींनीं विंध्यकेतु राजाचा वध करून त्याच्या तरुण कन्येस मजपाशीं आणून ठेविलं आहे. अहाहा ! काय त्या वीरतनयेचं अलौकिक सौंदर्य ! बोलण्याचालण्याची तऱ्हा किती मधुर ! आणि वर्तन किती नम्र ! हल्लीं तर, ती तारुण्याच्या अगदीं भरांत असल्यामुळं, फारच खुलते. तिच्या शरीराचा प्रत्येक अवयव कसा अगदीं चित्रासारखा रेखलेला आहे. स्वभाव तरी किती गरीब आणि मनमिळाऊ ! मला तर ती कशी जीव कीं प्राण अशी वाटते. ज्या पुरुषाच्या नशिबांत, विधीनं तिचं पाणिग्रहण लिहिलं असेल, तो खरोखरच मोठा भाग्यवान् समजला पाहिजे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणं, गायनवादनादि कलांत मीं तिला कशी अगदीं तरबेज करून ठेविली आहे. तिनं वीणा घेऊन आपल्या मंजुळ स्वरांत गाणं ह्मणण्यास प्रारंभ केला, कीं, स्वर्गाची प्रत्यक्ष उर्वशीच गात आहे कीं काय, असा भास होतो ! परंतु, महाराजांसंबंधानं मात्र मला आतां फार सावध राहिलं पाहिजे. कारण, सध्याच्या स्थितींत, महाराजांच्या जर का

ती एक वेळ दृष्टीस पडली, किंवा तिच्या मधुर गायनाचा एखादा चुटका त्यांनीं ऐकिला, तर स्वारीचं मन चंचल झालंच ह्मणून समजावं! परंतु, ती उपवर झाली आहे, ही गोष्ट पर्यायानं त्यांस कळवून तिचं एखाद्या सुंदरशा राजपुत्राशीं लग्न करून दिलं ह्मणजे ही भीति आपोआप नाहींशी होईल. (वर पाहून) वा! चंद्रोदय होण्याची वेळ झाली. तर आपण आतां अगस्तिमुनिपूजनाच्या तयारीस लागावं.

पद (ललत–त्रिताल)

नभिं तिमिर भरित ही रजनी। ध्रु० ॥
धवल शशीचे हिमकर आतां।
विकसित होतिल गगनीं ॥ १ ॥
परावलोकनिं सतीनयन तशिं।
कमलें जातिल मिटुनी ॥ २ ॥
कुवलयखंडें हंसतिल हर्षें।
रजनिनाथ नभिं बघुनी ॥ ३ ॥

[जाते.

प्रवेश दुसरा.

[विदूषक प्रवेश करितो.]

विदूषक— (स्वगत) छेः, तें गेलेंच डोक्यांतून पार निघून! केवढा मंदबुद्धि मी! मला कोणत्याहि गोष्टीची आठवण राहत नाहीं, ती कां बरें? एखाद्या रोगानें तर मला पछाडलें नसेल ना? पण छे! रोग होण्याचा मुळीं संभवच नाहीं. कारण, रोगाच्या उत्पत्तीचीं मुख्य कारणें दोन; काळजी आणि जागरण. परंतु आपण त्यांच्या तावडींत कधींहि सांपडणार नाहीं. मला काळजी काय ती एक उदरपूर्तीची. झोंपेविषयीं ह्मणाल तर जेवणाच्या पूर्वींच बिछाना घालून ठेवितों. जेवण झाल्यावर जो निजतों तो सकाळीं शेजारच्या सखंभटानें महिम्न ह्मणावयास प्रारंभ केला, ह्मणजे मग सावकाश उठतों! (पोटाकडे पाहून) आतां, नाहीं ह्मटल्यास कधीं कधीं अजीर्ण मात्र होतें. पण त्यापासून का माणसाची स्मृति नष्ट होते? छेः (विषय बदलून) बरें, मी विसरलों तरी काय आतां? अगदीं मनांत येतें आणि लागलेंच पुनः आंत जातें. आतां करावें तरी कसें? (आठवल्यासारखें करून) हां हां हां, आलें ध्यानांतः—

कटाव.

होहो ! बरवी याद जाहली । अंगीं माझ्या स्फूर्ती चढली । वत्स नृपाची वासवदत्ता—राणी आहे आज व्रतस्था । आमंत्रण मज दिधलें असतां । जातचि होतों विसरुनि सारें । झण् झण् खण् खण् स्वर्ण-दक्षिणा । तैशीं भोज्यें नानापरिचीं । मोतिचुराचे लाडु मनोहर । जिलब्यांच्या वरि राशी सुंदर । राघवदास सुवासिक नासिक । तोषविती मग मुखांत शिरती । पान कराया दुग्धहि सुखकर । अनारसेही खाऊं भराभर । बेसण, मुग्दळ साखरफेण्या । लोणकढें तें तूप गाइचें । श्रीखंडहि तें किति मौजेचें । बासुंदी पण गोड लागते । क्षुधा सांगते । तोंड मागतें । आम्ल तिक्त कटु मधुर रायतीं । तयार केलीं सर्व आयतीं । हा पठ्ठया सोडील काय तीं । ऐसे जिन्नस नानापरिचे । भक्षण करितां मांजर शिंचें । म्यांव्म्यांव् करुनी पुढ्यांत येतें । लाडी गोडी फार दावितें । परी पोळिचा एकहि तुकडा । कधीं न टाकीं मी त्याजपुढां । नृपती करितो माझी थट्टा । ह्मणतो ब्राह्मण कर्मकरंटा । कर्मावर फिरला वरवंटा । दारिद्र्याचा बसला खुंटा । अशी चालते पुष्कळ चेष्टा । पक्वान्नाचा नसेचि तोटा । भोजन मौजेचें ऐसें । विसरत होतों मी कैसें ? ॥ १ ॥

पण आतां तिकडे लवकरच गेलें पाहिजे. कारण, थोडासा उशीर झाल्यास, वासवदत्ताराणी, त्या बट्कीच्या इंदिवरिकेकडून माझी शेंडी धरवून, माझे गरीब ब्राह्मणाचे हाल हाल करील ! तर आतां या गार पाण्याच्या सुंदर पुष्करणींत अंमळ जलक्रीडा करून आपली स्वच्छ धावळी नेसावी, आणि गोपिचंदनाचे चार वळसे उगाळून सगळें अंग पांढरें शुभ्र करून टाकावें ! आणि मग राणीसाहेबांकडे जाऊन, कोंबड्याप्रमाणें कांहीं तरी अद्वातद्वा वडवड करून, सौभाग्यवाण एकदाचें घ्यावें पदरांत पाडून. नाहीं तर, ते कानटोपे लंबोदराचार्य पुरोहितबुवा येऊन जर का आपलें कर्मकांड एकदा सुरू करतील, तर मग तेथें माझ्यासारख्या भोजनपंडिताची डाळ शिजणें कठीण ! (पडद्यांत पाहून) अरे वा ! मोठीच मौज झाली ह्मणावयाची ! हा माझा प्रियमित्र, वासवदत्ता आज व्रतस्थ असल्यामुळें, आपली कांहीं तरी करमणूक व्हावी, या हेतूनें इकडेच येत आहे; तर आतां याच्याचबरोबर आपण तिकडे मोठ्या डौलानें प्रवेश करावा.

[वत्सराज प्रवेश करितो.]

राजा—वासवदत्तेचा कोण वेडेपणा हा !

पद (चाल–होईल कलह ह्मणोनी०)

काय ह्मणावें याला ! ।
इतुका हट्टी स्वभाव कसला ॥ ध्रु. ॥
चातुर्य नसे अंगीं कांहीं ।
सांगितलें तें ऐकत नाहीं ।
नित्य क्रोधभरानें ।
त्रासविते बहु अनुगां सकलां ॥ १ ॥

विदूषक—वा ! हे राजश्री तर आपल्याच नादांत कांहीं पुटपुटत आहेत !

राजा—पण या हट्टी स्वभावानें तिला स्वतःला तरी कांहीं सुख होत आहे काय ? मुळींच नाहीं !

पद (राग भैरव–ताल दीपचंदी.)

किमपिहि अंतरिं सौख्य नसे ॥ ध्रु० ॥
व्रतोद्यापनीं मग्न सदा ती ।
कोमल निजतनु शिणवितसे ॥ १ ॥
कांतिरहित निजवदनशशीनें ।
प्रभात हिमकर जिंकितसे ॥ २ ॥

काय करावें ? आपण उपदेश करावयास गेलों तर ती उलट रागावेल मात्र ! (सचिंत उभा राहतो)

विदूषक (राजास)—मित्रा ! तुझा उत्कर्ष होवो.

राजा (चकित होऊन)–वा ! आपली स्वारी कुठें इकडे अशा पहांटेची ?

विदूषक—(आढ्यतेनें) तसेंच कांहीं महत्त्वाचें काम आहे ह्मणून रात्रीचेंच इकडे येणें भाग पडलें. नाहीं तर आपला सुखाचा विछाना सोडून, अशा वेळीं कोण लेक इकडे यायला बसला होता !

राजा—बरें वसंतका ! आज तुला इतका हर्ष रे कशाचा ?

विदूषक—वा ! हें काय विचारणें ! आज वासवदत्ता राणीसाहेब ब्राह्मण-पूजन करणार आहेत ना ?

राजा—होय. पण तुला इतका आनंद होण्यासारखें त्यांत विशेष तें काय आहे ?

विदूषक—विशेष आहे तर ! इतर ब्रह्मवृंदासारखीच का माझी योग्यता समजलां आपण ? दहादहा बाराबारा वेदांचें पठन केलेल्या अगडबंब ब्राह्मणांच्या झुंडीच्याझुंडी येऊन, त्यांनीं राजवाड्यांत जरी मोठा गोंगाट केला, तरी राणीसाहेबांपासून सौभाग्यवाण पहिल्या प्रथम पटकावणारा विद्वान् ब्राह्मण अस्मादिकांशिवाय दुसरा नाहीं, हें आपण खास समजा !

राजा—शाबास ! वेदसंख्या ज्याअर्थी तुला इतकी पूर्णपणें ठाऊक आहे, त्या अर्थी आपली विद्वत्ता फार मोठी असली पाहिजे, यांत संशय नाहीं. बरें मित्रा, चल आपण आतां धारागृहोद्यानांत जाऊं.

विदूषक—तुझी इच्छा असेल तर चल बुवा.

राजा—अरे तूं हो पुढें अगोदर.

विदूषक—हा पहा मी पुढें झालों. (पाहून) अरे या रम्य उद्यानाची शोभा तर पहा पहिल्यानें. फुलांच्या सतत वर्षावानें हीं स्फटिक शिलातलें पहा कशीं रेशमासारखीं मऊ झालीं आहेत. इकडे या बकुल वृक्षावर आणि मालतीमंडपावर, हे बद्रकीच्या भुंग्यांचे थव्यांचे थवे गुं गुं करित बसले आहेत. आणि येथें तर या तमाल वृक्षांची अशी दाट राई लागून गेली आहे, कीं, येथें दिवसा बारा वाजतां आलें तरी मध्यरात्र झाल्यासारखें वाटावयाचें !

राजा—शाबास ! तूं वर्णन केल्याप्रमाणेंच मनोरम देखावा दिसत आहे खरा ! आणि हे पाहिलेस का दुसरे चमत्कारः—

पद (**चाल**—काय वेड्या हरिणाचि०)

विविध लतांनीं आच्छादित ही भूमि गड्या शोभते । पहा रे।
प्रवालखंडीं खचित ह्मणुनि ही रक्तवर्ण दिसते ॥ ध्रु. ॥
उग्रगंधयुत कुसुमीं नटले सप्तपर्ण तरु ते । पहा रे ।
कमलगर्भनिर्गलितरजांच्या लागुनि रंगातें ॥
पिंगट वर्णे नटले मधुकर करिती गायन तें । पहा रे ।
अस्फुट मंजुल पडतां श्रवणीं तोषित मन होतें ॥ १ ॥

विदूषक—मित्रा, ही पहा आणखी मौज. ह्या समोरच्या सांतविणाच्या झाडाखालीं लाडवांच्या ढिगासारखा पहा केवढा फुलांचा ढीग झाला आहे ! आणि अझूनहि फुलें एकसारखीं पटापट गळत असल्यामुळें पाऊस पडल्यावर झाडांच्या पानांतून पाण्याचे थेंब टप् टप् टप् टप् पडतात, तशी हुबेहुब शोभा दिसत आहे !

राजा—उत्प्रेक्षा तर मोठी बहारीची केलीस बुवा. केवळ शरत्कालाचाच भास होत आहे खरा!

[इंदिवरिका फुलांची परडी घेऊन प्रवेश करिते.]

इंदिवरिका—(स्वगत) आज बाईसाहेबांनीं मला अशी आज्ञा केली आहे, कीं, अगस्तिमुनिपूजनाकरितां पुष्पवाटिकेंत जाऊन बकुलपुष्पांच्या माळा करून आण, व त्याचप्रमाणें विंध्यकेतूची कन्या आरण्यका हिलाहि त्यांनीं धारागृहोद्यानांतल्या पुष्करणींतील प्रफुल्लित कमलें आणावयास पाठविलें आहे; परंतु त्या विचारीला ती पुष्करणी कोठें आहे हें माहीत नसेल, तर तिलाहि आपण बरोबर न्यावें, हें चांगलें.

[जाते.

राजा—मित्रा, हा पहा अरुणोदय झाला. या समयीं पत्यागमनानें प्रमुदित झालेल्या पूर्वदिशेची शोभा, कितीतरी मनोहर दिसत आहे!

पद (कितीतरी पहांटेची वेळ०)

पहा पहा ! प्रवेशला अरुणराज उदयगिरिवरी ॥ ध्रु. ॥
आक्रमुनी मार्ग सकल । तनु झाली फार विकल ।
श्रमपरिहरणार्थ अचल । जात मंदिरीं ॥ १ ॥
व्योमपात्र धरुनि करीं । नक्षत्रें त्यांत वरीं ।
ओवाळी स्वपतिवरी । पूर्व सुंदरी ॥ २ ॥
शशि झाला निष्प्रभसा । तारागण गुप्त जसा ! ।
गेला बघ तिमिर तसा । हा दिगंतरीं ॥ ३ ॥

विदूषक—खरेंच मित्रा, रात्र जाऊन दिवस आला ह्मणावयाचा!

राजा—अरे, या भगवान् सूर्यनारायणानें आपले किरण भूमंडलावर फेंकतांच काय आल्हादकारक चमत्कार घडले हे!

पद (भूप–धुमाळी.)

सरोवरीं बघ कमलवृंद हा विकसित कीं झाला ।
परिमल सुटतां, मधु चुंबाया भ्रमरसंघ उठला ।
जिकडे तिकडे दिसे शांतता, रवि निजकांतीला ।
अधिकाधिक दे कठोरता ती सुखवी शरीराला ॥ १ ॥

[इंदिवरिका व दर्शिका प्रवेश करितात.]

दर्शिका—(दुःखानें) देवा, अशा उत्तम नृपकुलांत जन्म देऊन आज परक्यांची सेवा करून दिवस घालविणं माझ्या नशिबीं आणलंस ना ? हाय ! हाय ! केवढी मी हतभागिनी !

पद (कधिं करिती लग्न०)

बहु शिणलें, देवराया ! मज द्यावा आसरा ॥ ध्रु. ॥
घेउनी जन्म नृपकुला । दोष लाविला । नाहिं राहिला ।
कुणी आधारा ॥ मज द्यावा० ॥ १ ॥
सेवनीं परांच्या असें । रहावें कसें । योग्य नच दिसे ।
सुखाचा वारा ॥ मज द्यावा० ॥ २ ॥
माय तूं बाप चांगला । जन्म मज दिला । तूंच मांडिला ।
खेळ हा सारा ॥ मज द्यावा० ॥ ३ ॥

प्रभो ! मीं माझं कुलशील अद्याप कोणास उघड करून सांगितलं नाहीं, ह्मणून तर हें दुःख मला भोगावं लागत नसेलना ?

विदूषक (राजास)—मित्रा, अरे मित्रा ! इकडे पाहिलेंस का ?

राजा—थांब, बोलूं नको. त्या काय बोलतात तें पहिल्यानें आपण ऐकूंया.

इंदिवरिका—बाई आरण्यके ! वेड्यासारखं भलतंच कांहीं तरी मनांत आणून तूं जी एकसारखी रडत बसतेस ती कां बरं ? अग थोडे दिवस दम धर, समजलीस ?

दर्शिका—इंदिवरिके, थोडे दिवस दम धरून असं काय व्हायचं आहे? का उगाच आपलं माझ्या तोंडापुरतं बोलतेस कांहीं तरी ?

इंदिवरिका—वेडे, तुझी शपथ मी तोंडापुरतं नाहीं बोलत. हें बघ, तूं उपवर झालीस हें आतां महाराजांस समजलं, ह्मणजे एखाद्या राजपुत्राशीं ते तुझं लग्न लावून देतील. मग तूं बसशील आमच्या बाईसाहेबांसारखी राणी होऊन. (विषय बदलून) बरं, आरण्यके, या धारागृहोद्यानाची शोभा किती प्रेक्षणीय आहे, पाहिलीस !

दर्शिका—हो हो, पाहिली बरं. मी समजलें, तूं हें बोलणं मध्येंच कां काढलंस तें.

इंदिवरिका—शाबास, इतकं चातुर्य तुझ्या अंगांत आहेना ? तर मग हें रडणं टाकून आपल्या कामाला लाग पाहूं.

दर्शिका—लागतें बाई. अशीच जन्मभर जरी मी रडत बसलें तरी माझं दुःख कांहीं कमी होणार नाहीं, हें मलाहि समजतं. पण काय करावं ? असो. इंदिवरिके, ती पुष्करणी अझून फार दूर का आहे ?

इंदिवरिका—अग कशाची दूर. ती पहा जवळच त्या आंबराईच्या पलीकडे आहे. चल आतां लवकर, अशी रेंगाळूं नकोस, उशीर झाल्यास राणीसाहेब रागं भरतील ना ?

[जातात.

राजा—(श्रमिष्ट होत्साता) मित्रा ! केवळ वर्षाकाळाचाच भास होत आहे खरा ! पहा तरी !

विदूषक (रागावून) अहो महाराज ! तुह्मी तर 'हें पहा, तें पहा' असें निष्कारण कांहीं तरी बोलून आपल्या मनाची करमणूक करण्याचा प्रयत्न करित आहां; पण इकडे माझी विद्वान् ब्राह्मणाची सौभाग्यवाण पटकावण्याची वेळ चालली निघून, त्याचा विचार काय ? मी तर बुवा आतां या पुष्करणींत स्नान करून वाड्यांत जाणार. (कपडे काढूं लागतो.)

राजा—हा वेड्या ! पुष्करणी तर मागें राहिली ! पण, या सुंदर उद्यानाची शोभा पाहण्याचें सोडून तुझें मन दुसरीकडे जातें तरी कसें ?

विदूषक—अरे, पंचपक्वान्नांची रास पुढें पडली असतां, तिकडे लक्ष्य न देतां, वाढावयास येणाऱ्या स्त्रीकडेच जसे कांहीं लोक पहात बसतात, तसेंच हेंहि आहे !

राजा—गड्या !

पद (अंजनीगीताची चाल.)

जलाशयाच्या सभोंवतालीं ।
दाट झाडि ही लागुनि गेली ।
तत्संधींतुनि सदनावलि ही ।
उच्च किती दिसते ॥ १ ॥

बरें, मित्रा, चल आपण आतां त्या पुष्करणीच्या तीरीं जाऊं. (चालूं लागतात.)

विदूषक—मित्रा, अरे मित्रा ! इकडे पहा अगोदर. ही स्त्री पाहिलीस का तूं ? ही कोण बरें असावी ? हिच्या वेणींतील पुष्पपरिमलाला भुलून हे पहा काळे कुळकुळीत भुंगे तिच्या तोंडासभोंवतीं कशा घिरट्या घालित आहेत.

हिचे हात तर कसे पोंवळ्यासारखे आरक्त, शरीर तेजःपुंज आणि बाहुलतिका कोंवळ्या लुसलुशीत आहेत. मित्रा! ही या उपवनाची देवता तर नसेलना?

राजा—खरेंच गड्या, हिच्या या अलौकिक सौंदर्यासंबंधानें कांहींच तर्क चालत नाहीं खरा–कारणः–

पद (दादरा.)

मानवावलोकनार्थ नागकन्यका।
आलि तरी नच असेल अशि अलौकिका॥ ध्रु.॥
चंद्रकला मूर्तिमती ह्मणुं हिला जरी।
दिनभागीं निजदर्शन देइ नच तरी।
लक्ष्मीसम करिं कमला धरित सुंदरी।
नकळे ही कोण असे प्रेमदर्शिका॥ १॥

विदूषक—आतां लागले याला तर्कावर तर्क सुचावयाला! अरे तिला तूं अद्याप पुरती पाहिलीससुद्धां नाहींस, आणि इतक्यांत झालास का असा भ्रमिष्ट? धन्य आहे बुवा तुह्मां राजे लोकांची! (स्वगत) अथवा यांत नवल तें काय? पंचपक्वान्नांचें ताट पाहून जी आपली स्थिति होते तीच याची झाली!

राजा—मित्रा! आपल्याशींच काय पुटपुटतोस? इकडे पहा अगोदर! या चंद्रमुखीच्या नुसत्या दर्शनानेंच मी अगदीं वेडावल्यासारखा झालों आहें.

विदूषक—अरे पण अंमळ थांब तरी! ही कोणाची मुलगी, राहते कुठें, इत्यादि चौकशी तर अगोदर केली पाहिजे!

राजा—बरें तर, तूं ह्मणतोस तसेंच का होईना. पण हिची हकीकत आपल्याला समजणार तरी कशी?

विदूषक—होय बुवा. कांहीं तर्क चालत नाहीं खरा! (इंदिवरिकेस पाहून) अरे! ही तर वासवदत्तेची दासी इंदिवरिका! ह्या बटकिचीला इकडे येण्याचें कारण काय?

राजा—मित्रा, त्या दोघी आपसांत कांहीं बोलत आहेत, तर चल आपण त्या लतामंडपाच्या आड राहून, त्यांचें भाषण ऐकूं या.

इंदिवरिका—(कमलपत्र घेऊन) आरण्यके! अग आरण्यके!

दर्शिका—अग अशी ओरडतेस कशाला, हळू नाहीं का बोलतां येत? बरं तूं ह्मणतेस काय?

इंदिवरिका—तूं कमळं तोड, तोंपर्यंत मी या नलिनीपत्रांत फुलें घालून तीं बाईसाहेबांस नेऊन देतें.

विदूषक—मित्रा, पाहिलेंसना ? ही द्वाड इंदिवरिका तिला येथें एकटीच सोडून जाऊं पाहात आहे.

राजा—अरे चूप ! पुढें ऐक त्या काय बोलतात तें.

(इंदिवरिका जाऊं लागते.)

दर्शिका—अग इंदिवरिके, तुझ्यावांचून मला एकटीला नाहीं बाई इथें राहवत. पण या लतामंडपांत पाय कुणाचे वाजतात ?

विदूषक—(घाबरून) मित्रा ! त्या कार्टीनें आह्मांला पाहिलेंसें वाटतें !

दर्शिका—मला बाई भीति वाटते. तूं मला सोडून जाऊं नकोस.

इंदिवरिका—(सहास्य) अहाहा ! वेडी खरी ! बाईसाहेबांच्या सांगण्याप्रमाणं जर का लवकरच घडून आलं तर मग तूं कसं करशील ?

दर्शिका—(सलज्ज) मी कसंहि करीन. पण इंदिवरिके ! बाईसाहेबांनीं तुला असं सांगितलं तरी काय ?

इंदिवरिका—आमच्या बाईसाहेब ह्मणाल्या, 'विंध्यकेतूची मुलगी उपवर झाली आहे, हें मी आतां महाराजांस सांगणार. मग ते तिचं एखाद्या राजपुत्राशीं लग्न लावून देतील.' आणि असं झाल्यावर, माझी सोबत तुला कशी मिळेल ग आरण्यके ?

राजा—अरे वसंतका, ही कोणाची कन्या आहे, हें आतां तरी समजलें का तुला ?

विदूषक—छे बुवा ! मला कांहींच समजलें नाहीं अझून !

राजा—

पद (अर्जुन तर संन्यासि०)

नागकन्यका नव्हे अप्सरा, क्षत्रियकुलभूषणा ।
सौंदर्याची पुतळी ही स्मितहासित चंद्रानना ।
पुष्पपात्र करिं घेउनि आली मोहाया मन्मना ।
रतिच काय अवतरली भूवरि ही पंकजलोचना ॥
ही विंध्यकेतुची प्राणप्रिय बालिका ।
विजयानें आणिली करुनी रणकौतुका ।
नृपसदन आमुचें शोभवि ही कामुका ।

राजसुता ही, परम भयंकर कारागृहयातना ।
भोगित आहे, नकळे सखया बल दैवाचें कुणा ॥ १ ॥

विदूषक—त्या कारागृहयातना किती भयंकर असतात, याचा अनुभव आह्माला कोठून असणार? परंतु आपण प्रद्योतराजाच्या कारागृहांत वरेच दिवस वास्तव्य केलें असल्यामुळें तो अनुभव—

राजा—जाऊंदे रे! त्यांत काय आहे? पण मित्रा, या कन्येला तूं आपल्या बहिणीप्रमाणें वागीव, असें वासवदत्तेला मीं सांगितलें असून, ती हिला असलीं श्रमाचीं कामें करावयास लाविते, ही किती सखेदाश्चर्याची गोष्ट आहे बरें?

विदूषक—अरेरे! या मुलीची ही दुःस्थिति अवलोकन करून मला फार वाईट वाटतें. (डोळे पुसतो)

राजा—गड्या वसंतका! एवढा वेळ, आपण अगदींच फसलों, ह्मणावयाचे! कारण, ही बाला तर अद्याप अविवाहित आहे.

विदूषक—हो हो! आपण या स्त्रीशास्त्रांत चांगले प्रविण आहांत, यांत संशय नाहीं!

राजा—मित्रा! मी तुला खरेंच सांगतोंः—

(साकी.)

पूर्व पुण्य मम सबळचि होतें ह्मणुनि रत्न हें असलें
बहु यत्नेंही लभ्य नसे तरि, अवचित मजला दिसलें;
सत्यचि हें सखया। आला भाग्यशशी उदया १.

दर्शिका—असला हा चावटपणा मला नाहीं आवडत!

इंदिवरिका—बरं बाई, इतकं रागवायाला नको कांहीं. ही मी जातें आपली. [जाते.

राजा—ऐकलेंस मित्रा!

पद (मालकंस–त्रिवट.)

गांभीर्यानें निजसुकुलातें।
या सुंदरिनें प्रगटचि केलें ॥ ध्रु० ॥
कमलकरा ही दुसरी कमला।
प्रतिक्षणीं करि मोहित मजला।
धन्य ह्मणूं नरशिरोमणी तो।
पात्र हिच्या जो स्पर्शसुखातें ॥ १ ॥

विदूषक—(स्वगत) हे राजश्री चालले आतां ब्रह्मानंदांत मग्न होत ! (पाहून उघड) पहा मित्रा ! हें काय आश्चर्य आहे ! ही कन्या कमलें तोडित असतां, तिच्या करपल्लवानें कंपित झालेल्या पाण्याची जी शोभा दिसत आहे, तिजपुढें या कमलवृंदाची शोभा कांहींच नाहीं !

राजा—खरें बोललास गड्या. पण हा काय चमत्कार आहे? ही कोमलांगी खरोखर चंद्रतनु असतां तिच्या करस्पर्शानें हीं सूर्यविकासी कमलें, आपलीं मुखें लज्जेनें खालीं कां करित नाहींत !

दर्शिका—(डोळ्यांत धूळ गेल्यामुळें डोळे चोळीत)—अगबाई ! कोण धुरळा हा ! आतां करूं तरी काय ? (इतक्यांत भुंगा जवळ आला त्याच्या त्रासानें) आणखी हा मेला दुष्ट मधुकर कमलिनीला सोडून मला कुठून त्रास द्यायला आला ! अग इंदिवरिके ! धाव बाई लवकर. अग इतक्यांत गेलीस तरी कुठं?

राजा—मित्रा ! ही तरी एक मौजच झाली ह्मणावयाची !

विदूषक—वाहवा ! याचें नांव प्रेम ! शाबास ! मित्रा, तूं तरी दीड-शाहणाच आहेस ह्मणावयाचा ! अरे, असा वेड्यासारखा काय तिजकडे पाहतोस ? ती कारटी इंदिवरिका आली नाहीं तों हळूच तिच्याजवळ जा, ह्मणजे पहा कशी मौज होईल ती ! तुझ्या चालण्यानें पाणी ढवळून, त्याचा शब्द तिच्या कानीं पडतांच, इंदिवरिका आली असें समजून ती तुलाच एकदम मिठी मारील ! कां, कशी मसलत आहे ?

राजा—वाहवा ! मसलत तर गड्या छान आहे. तर मी आतां तसेंच करितों. (दर्शिकेसमीप जातो.)

दर्शिका—कोण ! इंदिवरिके ! बरीच बाई अगदीं वेळेवर आलीस ह्मणावयाची ! या मेल्या द्वाड भुंग्यानं तर माझी बाई अगदीं पाठ पुरवली ! (राजास आलिंगिते.)

राजा—हा वेडे !

पद (मालकंस—त्रिवट.)

भीरु किती तूं राजकुमारी ।
विषाद लवही न धरिं अंतरीं ॥ ध्रु. ॥
सुवास लोलुप ही मधुपावली ।
परिमललोभें तवमुखकमलीं ।
नवमधुपाना धावत आली ।
दोष कुणाचा ? यांत सुंदरी ! ॥ १ ॥

दर्शिका—(राजास पाहून)—अगबाई ! ही इंदिवरिका नव्हे तर ! (दूर होण्याचा प्रयत्न करिते) आणि ते भुंगे गेले वाटतं.

विदूषक—होय. आतां फक्त हा एवढा भुंगा राहिला, पण ह्या मात्र आतां तुझ्या पाठीमागें कायमचा लागला ह्मणून समज !

दर्शिका—(लाजून) महाराज ! सोडा मला. अग इंदिवरिके !

विदूषक—अगे वेडे पोरी, सगळ्या पृथ्वीचें रक्षण करणारा व सरसकट सगळ्या ब्राह्मणांस पक्वान्नें चारून संतुष्ट करणारा असा हा सार्वभौम वत्सराज तुझा पाठीराखा असतां, तूं जी त्या वटकीच्या दुष्ट पोरीला हांका मारतेस, त्या तुला ह्मणावें तरी काय ?

दर्शिका—(राजापासून दूर होऊन स्वगत) अहाहा !

पद (चाल—तव मानस कैसें काय०)

किति मानस झालें शांत । नृपमुखशशि देखुनी ।
हा प्रियकर माझा कांत । ठेविन मनिं रेखुनी ।
मधुर वदन हें वक्ष विशालहि अंगीं यौवनभार ।
कंपित झालीं अंगें माझीं स्पर्शसुखानें फार ।
प्रणयांकित होउनी ॥ १ ॥

इंदिवरिका—(प्रवेश करून स्वगत) खरेंच बाई, त्या मेल्या भ्रमरांनीं माझ्या प्रियसखीला फार त्रास दिला असेल. तर लवकर जाऊन आधीं तिचें समाधान केलें पाहिजे. (जवळ जाऊन) बाई, आरण्यके, भिऊं नको बरं; ही मी आलें.

विदूषक—(राजास) राजश्री ! आतां पळा पळा लवकर इथून. नाहीं तर ही वटकीची इंदिवरिका आह्मांला येथें उभे असलेले पाहून वासवदत्तेला भलतेंच कांहींतरी जाऊन सांगेल आणि मग तिच्याकडून आपल्याबरोबर माझेंहि चांगलेंच वाक्पूजन होईल ! तर चल, आपण जाऊन त्या कदलीगृहांत घटकाभर बसूं.

[जातात.

दर्शिका—बरीच ग इंदिवरिके लवकर आलीस तूं ! अग सखीजनाच्या बोलण्याचा असा राग—

इंदिवरिका—सखे, तुझ्या गळ्याची शपथ मीं राग धरिला नाहीं. (तिची हनुवटी धरून) पण हें बघ, हा दोष, त्या बिचाऱ्या भ्रमरांचा नसून, ह्या

तुझ्या कमळासारख्या मुखाचाच आहे, समजलीस ? ते बिचारे निर्बुद्ध प्राणी ! त्यांनां काय ? मधुपान करावयास मिळेल तेवढं थोडंच. बरं आरण्यके, दिवस पाहिलास का केवढा आला तो ! तर चल आतां बाईसाहेबांकडे जाऊं. (चालूं लागतात.)

दर्शिका—(राजा येतो त्याच्याकडे पहात) अग सखे !

पद (कलंगडा–दीपचंदी.)

किति गार गडे हें वारी ।
बघ, शीतल होती मम पद भारी ॥ ध्रु. ॥
रंभावनिंचा पवन वहातो ।
चलनगतीतें कुंठित करितो ।
हळु हळु जाऊं सखे मंदिरीं ॥ १ ॥

इंदिवरिका—किती नाजूक पण माझी सखी ! बरं आरण्यके, चल बाई सावकाश जाऊं.

[जातात.

विदूषक—मित्रा ! ती गेली, आतां तोंड उघडें ठेवून काय पाहत आहेस ?

राजा—(साश्चर्य) काय ह्मणतोस ? ती सुंदरानना गेली ?

विदूषक—हो हो ! यज्ञोपविताची शपथ ती इथून गेली. पण मित्रा, ती आपण होऊन गेली नाहीं, तर त्या द्वाड बटकीच्या पोरीनें तिला येथून पळविलें !

राजा—(श्वास सोडून)—काय करावें !

(साकी.)

मजसम असती भाग्यहीन जे दुर्दैवी भूवरती,
इच्छित वस्तू निर्विघ्नपणें प्राप्त न त्यांनां होती;
नियमचि हा ठरला । त्याचा अनुभव मज आला. १

विदूषक—ठीक ! हें मला पूर्वीच ठाऊक होतें. आतां आपण त्या इंदिवरिकेच्या नांवानें अशाच हांका मारित बसाल ! पण आपल्या नादीं लागल्यामुळें तूर्त माझें केवढें नुकसान झालें आहे, त्याची कल्पना तरी आहे का आपल्याला ?

राजा—अरे पण, माझ्यामुळें तुझें एवढें नुकसान काय झालें तें तर सांगशील.

विदूषक—अरे बावा, नुकसान लहानसहान नव्हे, समजलास! राणीसाहेबांकडून सौभाग्यवाण मिळावयाचें होतें, तें तर राहिलेंच; पण दक्षिणासुद्धां उपाध्येबुवांनींच पटकाविली असेल. शिवाय, वेळेवर आलों नाहीं ह्मणून राणीसाहेबांच्या क्रोधानलांत माझी गरीब ब्राह्मणाची आणखी आहुती पडते कीं काय, समजत नाहीं! आणि असें असतां, ह्मणे तुझें काय नुकसान झालें? (जाऊं लागतो.)

राजा—अरे, अंमळ थांब तरी. हें पहा—

विदूषक—छे बुवा! नाइलाज झाला आतां. अहो राजाधिराज! 'अंमळ थांब, अंमळ थांब' असें ह्मणून, आज मला उपाशीं मारण्याचा बेत आहे वाटतें आपला!

राजा—मित्रा, तसें नव्हे रे. पण इकडे पहा तरी, हें कमलवन किती आल्हाददायक आहे तें. (विषय बदलून) पण मित्रा! ती सुंदरी पुनः आपल्या दृष्टीस पडण्यास काय उपाय योजावा बरें?

विदूषक—(स्वगत) यानें मला कमलवनाची मौज दाखविण्याचें मिष करून त्या कमलिनीची हळूच पुनः गोष्ट काढिली. वाहवारे वाहवा! शाबास! ती वासवदत्ता तरी मोठी लवाड खरी. हें भविष्य तिला ठाऊक होतें, ह्मणूनच तिनें त्या पोरीला आजपर्यंत या राजश्रींच्या दृष्टीस पडूं दिलें नाहीं. पण आज मात्र ती फसली खरी! (उघड) छे छे छे छे! आपण नाहींरे बुवा पुनः त्या फंदांत पडणार. मीं ब्राह्मणानें मोठ्या चातुर्यानें घडवून आणलेला डाव तूं फुकट घालविलास, आणि आतां रडत बसतोस, त्याला मी काय करूं? (शांततेनें) बरें मित्रा, मी ह्मणजे काय आपला शुद्ध भोजनभाऊ आहें, असें तुला वाटतें?

राजा—अरे, पण तुला भोजनभाऊ ह्मटलें कोणीं? बरें वसंतका, मीं तो डाव कसा काय फुकट घालविला तें तर सांग पाहूं अगोदर.

विदूषक—अरे, मीं तुला सांगितलें, कीं, तिच्याजवळ जाऊन मुकाट्यानें उभा राहा. पण तूं केवढा विद्वान्! मोठा धीर करून एकदाचा मोठ्या संकटानें तिच्याजवळ गेलास आणि मोठ्यानें '**भीरु किती तूं राजकुमारी**' ह्या व असल्याच दुसऱ्या कर्णकटु शब्दांनीं आपलें वाक्पांडित्य सुरू केलेंस. ती बिचारी गरीब पोर तुझ्यासारखी निर्लज्ज नसल्यामुळें तुला ओळखतांच मर्यादेनें दूर झाली. आणि दुसरें असें, कीं, 'भीरु' ह्मणवून घेणें कोणाला तरी आवडेल का?

राजा—काय मूर्ख आहेसरे !

विदूषक—कोण, मी का ? वरें पुढें ?

राजा—अरे, मी त्या प्रमदेचें समाधान करित होतों, त्याला तूं मूर्खपणा समजतोस काय ?

विदूषक—(शांतपणानें) येथें मूर्ख कोण, हें उघडच दिसत आहे. पण आतां काय त्याचें ? ती जी गेली ती गेलीच. मग विनाकारण शब्दरचना वाढवून, आपल्या पक्कान्नभक्षणनिपुण तोंडाला व्यर्थ त्रास कां द्यावा ? हा पहा, सूर्यनारायण रागानें लाल होऊन आह्मांकडे कसा अगदीं टवकारून पहात आहे ! आणि क्षुधेनें तर माझ्या या उदराच्या ठायीं मोठें काहूर उठवून दिलें आहे. तर चल आपण आतां वाड्यांत जाऊं.

राजा—चल बुवा. तुला येथें कशाचें चैन पडतें ?

विदूषक—तूं, मला काय वाटेल तें ह्मण, पण एकदाचे लवकर पाय उचल, ह्मणजे झालें.

राजा—

पद (असावरी–त्रिवट.)

काय वरिल मज ती सुदती ।
शशिकांति सुवदना चंचलनयना ।
प्रेमरसाची सजीव मूर्ति ॥ ध्रु. ॥
प्रमदारूपी चंचल वल्ली ।
नवयौवनकुसुमीं जी नटली ।
विनयवती ती ॥ काय. ॥ १ ॥

[जातात.

[पडदा पडतो.]

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

[वत्सराजाचा वृद्ध कंचुकी प्रवेश करितो.]

कंचुकी—

पद (ब्राह्मणकन्या नव्हे क्षत्रिया०)

युवतिजनाला अंतःपुरिंच्या तुष्ट करावें कसें ।
विदित तें पूर्ण मला जरि असे ।
पदोपदीं या वृद्धपणानें प्रमादही घडतसे ।
परि तया उपाय माझा नसे ।
शक्तिरहित मम शरीर झालें, यष्टि करीं धरितसें ।
नृपाची करणी मी करितसें ॥ १ ॥

आमचे महाराज फार दयाळू असल्यामुळें आह्मां सेवकांनां ते अतिशय प्रिय वाटतात. मी स्वतः जरी इतका वृद्ध झालों आहें, तरी, महाराज सांगतील त्या वेळीं, त्यांची आज्ञा मान्य करावयास मी मोठ्या आनंदानें तयार. ते एखादे वेळीं शिकारीस गेले ह्मणजे मला कसें अगदीं उघडें उघडें वाटतें. राजेलोकांमध्यें आमच्या महाराजांसारखे लोकप्रियता संपादन करण्याचे अलौकिक गुण क्वचितच आढळतील. परंतु मला आश्चर्य वाटतें, कीं—

पद (चाल—काय वदावें भाग्य मुखानें०)

सार्वभौम हा वीरशिरोमणि वत्सपती भूपति असुनी ।
निशिदिनिं सेवक आज्ञातत्पर दक्ष पुढें कर जोडोनी ।
परम मनोहर नृपकन्या त्या तोषविती त्याला रमणी ।
सौख्यविपुलता अनुकूल तरी उदास झाला कां म्हणुनी ॥ १ ॥

मला तर वाटतें, कीं, येथें कांहींतरी गुप्त प्रेमाचा प्रकार असावा. त्या विंध्यकेतूच्या उपवर कन्यकेस आमच्या महाराजांनीं कोठेंतरी पाहिलें असावें आणि त्यामुळें हा असा घोटाळा झाला असावा; परंतु ही गोष्ट जर राणीसाहेबांस कळेल तर मग काय भयंकर परिणाम होईल, हें सांगवत नाहीं. असो. हळुहळू काय तें समजून येईलच.

[जातो.

प्रवेश दुसरा.

राजाः—

पद (चाल—नृपममता रामावरती०)

उल्हासवृत्ति मावळली ।
तनुलता शुष्क ही झाली ॥ कितितरी ॥
बुद्धीस मंदता आली ।
पांडुरता दिसते गालीं ॥ उघड ही ॥
प्रणयाची छाया पडली ।
स्मृति कोठें जाउनि दडली ॥ नाकळे ॥
चंचला । प्रणयपरिमला । वल्लि कोमला ।
पुष्पिता गमली ।
प्रमदा ती हृदयीं रमली ॥ निशिदिनीं ॥ १ ॥

काय करावें ? त्या सुंदरीचें पुनः दर्शनहि होणें दुर्लभ ! (सचिंत बसतो)

[विदूषक प्रवेश करितो.]

विदूषक—वा ! हे राजश्री तर हातावर गाल टेंकून आणि डोळे मिटून त्या विंध्यकेतुनृपनंदिनीकडे ध्यान लावून बसले आहेत. योगी परमेशप्राप्ती-करितां अशीच ध्यानधारणा करितात, पण तींत आणि हींत केवढें अंतर ! असो. आपण याच्या नादीं लागून उपयोग नाहीं. त्या दिवशीं याच्यावरोबर वडबड करित भटकत राहून वेळेवर आलों नाहीं ह्मणून वासवदत्तेनें माझी काय फजिती केली ह्मणतां ! ! ती इंदिवरिका मोठी द्वाड ! ! राणीनें अंमळ खुणाविलें, कीं, बस्स, लागली एकदम झोड काढायला ! नाहीं तर हा विद्वान् ब्राह्मण, राजाच्या मर्जींतला, याच्यावर एकदम कसा हात टाकावा, हा कांहींतरी विचार ! आतां हे ध्यानस्थ राजश्री चटकन् जागृत होतील असा कांहींतरी आशीर्वाद दिला पाहिजे (राजास) ए, बायकोसाठीं योग्याचें ढोंग करणाऱ्या ! तुला ती विंध्यकेतूची मुलगी लवकरच मिळेल बरें !

राजा—(एकदम उठून) अरे कुठें आहे ती, सांग लवकर !

विदूषक—शाबास, ती इकडे कशाला येईल ? आपल्याच राणीसाहेबां-जवळ ती असेल ! !

राजा—(स्वगत) या मूर्खानें मला फसविलें खरें. (उघड) मित्रा वसंतका, कायरे करूं ? त्या सुंदरीचें मुखकमल पुनः एक वेळ तरी माझ्या दृष्टीस पडेल काय ?

विदूषक—अरे बाबा, हा त्या दुष्ट मदनाचा प्रताप! शंकरानें त्याला जाळून टाकिला ह्मणून बरें, नाहीं तर, माझ्यासारख्या चतुर पंडितावर सुद्धां आपले तीव्र शर सोडण्यास त्यानें कमी केलें नसतें!

राजा—मित्रा—

पद (**चाल**–नंदनवनदेवीनें माझा०)

जरि मदनाचा नाश शिवानें निजनयनें केला।
प्रमदांनीं निजनेत्रकटाक्षें निर्मियलें त्याला।
प्रमदांच्या या उपकारास्तव तत्सेवक झाला।
ह्मणुनी प्रमदापक्ष घेउनी छळितो तरुणाला ॥ १ ॥

मित्रा, त्या सुंदरीच्या आलिंगनाशिवाय माझ्या देहास होत असलेला ताप कमी होईल असें वाटत नाहीं; आणि ती तर पुनरपि आपल्या दृष्टीस पडेल कीं नाहीं, याचाच संशय. आतां करावें तरी काय?

विदूषक—मी काय सांगूं बाबा? तिची आणि तुझी गांठ पडून एकदा लग्नाचें ठरलें असतें ह्मणजे पुढची लाडवांची तयारी मीं स्वतः केली असती. पण मित्रा, त्या दिवशीं ती जेव्हां त्या इंदिवरिकेबरोबर वाड्यांत जावयास निघाली, त्यावेळीं तिनें मागें वळून तुझ्याकडे पाहिलें होतें, यावरून तीहि तुजवर अनुरक्त झाली असावी, असें वाटतें.

राजा—होय, मलाहि तसेंच वाटतें:—

पद (**चाल**–आतां शशिमुखिच्या०)

जातां सहज तिनें मुरडुनि मजला पाहिलें, जातां ॥ ध्रु० ॥
नेत्र मिटोनी प्रेमभरें ती सहजचि सुंदरि हांसे।
स्वप्रेमामृतचिन्हचि मित्रा दिधलें मज हें खासें ॥
संशय घ्यावा व्यर्थ कशाला सांग सख्या रे आतां ॥ १ ॥

विदूषक—पण मित्रा, ती तुझ्याशीं एकहि शब्द बोलली नाहीं, तो कां बरें?

राजा—अरे, ती इंदिवरिका येईपर्यंत तिनें मुळीं वर पाहिलेंच नाहीं. मित्रा, ज्या वेळीं त्या शशांकाननेला मी आलिंगन दिलें, त्या वेळीं ती लाजून विनयानें ह्मणाली 'महाराज, सोडा मला!' अहाहा! किती गोड आणि मंजुळ शब्द ते! अद्याप माझ्या कानांत सारखे गुणगुणत आहेत!

विदूषक—मित्रा, तुला तर त्या तरुण पोरीचा फारच नाद लागल्यासारखा दिसतो, तर आतां असें कर; तिला एक सुंदर पत्र लिहून तें मजपाशीं दे. मग मी तें हलुच तिला नेऊन देतों. जर तुझ्यावर ती खरोखरच अनुरक्त झाली असेल तर तुझ्या पत्राचें उत्तर पाठवून ती आपलें मनोगत तुला कळवील. कां, मी ह्मणतों हें खरें कीं खोटें?

राजा—असें करून पहावें खरें. माझें पत्र पाहून तिला आनंद झाला तर ठीकच; परंतु कदाचित् वाईट वाटलें तरी ती कांहीं ही गोष्ट उघड करणार नाहीं; कारण, ती फार लज्जावती आहे. तर तूं आतां माझें लिहिण्याचें सामान मला आणून दे.

विदूषक—(जातो व सामान आणतो) मित्रा, हें घे.

राजा—मी आतां पत्र लिहितों बरें. (लिहूं लागतो.)

विदूषक—(स्वगत) मीं काय मूर्खपणा केला हा!! हें पत्र त्या पोरीला नेऊन द्यावयाचें ह्मणजे मोठें जिवावरचें काम आहे, हें आतां बरीक माझ्या लक्ष्यांत आलें. त्या बटकीच्या मनोरमेनें जर का मला पाहिलें आणि वासवदत्तेला जाऊन सांगितलें, तर सगळें इंगित बाहेर पडून फजिती व्हावयाची ती होऊन, वर आणखी दक्षणेदाखल मुष्टिमोदक मिळावयाचे. असो. बोलून तर चुकलों, आतां मोठ्या दक्षतेनें वागलें पाहिजे.

राजा—मित्रा, हं, हें लिहून झालें.

विदूषक—दे पाहूं इकडे, मला एकदा वाचून पाहूं दे.

राजा—(देतो) हें घे. (स्वगत) याची आणि अक्षरांची जर मुळीं ओळखच नाहीं तर हा वाचणार काय?

विदूषक—(पत्र डोळ्यांजवळ नेऊन) अथवा नको! प्रियकरानें आपल्या प्रियेला पाठविलेली प्रणयपत्रिका तिऱ्हाइतानें वाचणें बरोबर नाहीं. शिवाय मी माझी चाळीशी आणावयास विसरलों, आणि ती लाविल्याशिवाय तर हें असलें बारीक अक्षर मला मुळींच वाचतां येणार नाहीं. तर आतां या पत्राची घडी करून ती मजकडे दे पाहूं.

राजा—(देतो) पण पत्र द्यावयाचें तें शहाणपणानें दे हो! नाहीं तर तुला काय! जाशील आपला वासवदत्तेजवळ आणि विंध्यकेतूच्या मुलीला राजानें हें पत्र दिलें आहे ह्मणून सांगशील!

विदूषक—अरे बाबा, तसें करावयास मी जरी कदाचित् वेडा असलों तरी माझी पाठ आणि थोबाडें वेडीं नाहींत, समजलास ! तूं आपला अगदीं निर्धास्त रहा. काम असें बेमालूम करितों, कीं, तें तुला, मला किंवा त्या पोरीलाच ठाऊक. [जातो.

राजा—या मूर्खाच्या नादीं लागून मीं त्या तरुणीला पत्र पाठविलें खरें, परंतु त्यामुळें एखादा अनर्थ न उद्भवो ह्मणजे झालें. मला तर राणीची फार भीति वाटते; आणि दुसरें असें, कीं, त्या राजकन्येला माझ्या पत्रानें आनंद न होतां उलट तिला माझा राग आला तर बिचारीच्या दुःखी मनाला अधिक दुःख दिल्यासारखें होणार.

पद (चाल–वीरा भ्रमरा जन्मुनि॰)

पत्र करींचें पाहुनि माझ्या आनंदित होउनी ।
उत्तर देइल का धाडुनी ॥
विरहदुःख जें होत मला तें निजहृदयीं आणुनी ।
उत्तर देइल का धाडुनी ॥
किंवा आधीं त्या पत्रातें पाहुनियां वाचुनी ।
क्रोधें टाकिल का फाडुनी ॥
अनुभव नाहीं प्रणयसुखाचा त्या प्रमदेलागुनी ।
यास्तव संशय येतो मनीं ॥

अहाहा ! त्या नवयुवतीचें काय मधुर रूप तरी ! तिला पाहिल्यापासून माझें चित्त इतकें चंचल झालें आहे, कीं, तें इतर सुखविलासांकडे मुळींच आनंद पावत नाहीं. मला बरें वाटावें ह्मणून वासवदत्ता काय काय उपचार करिते, पण छे; त्यांचा कांहींच उपयोग होत नाहीं. एकंदरींत माझें मन कांहीं माझ्या स्वाधीन राहिलें नाहीं.

पद (चाल–तनु हिची सुंदरा॰)

काय मला पामरा वरिल सुंदरा ।
पाहिल हास्यमुखें का जरा ।
होइन धन्य जगीं या खरा ॥ १ ॥
आलिंगन देउनी जवळ घेउनी ।
ठेविन तिजला अंकासनीं ।
राहिन अधरामृत सेवुनी ॥ २ ॥

[एक दासी प्रवेश करिते.]

दासी—महाराजांचा जयजयकार असो ! महाराज, राणीसाहेब आपणास भेटावयास येत आहेत.

राजा—ठीक आहे. जा, मी तुझीच वाट पहात बसलों आहें ह्मणून सांग तिला.

दासी—आज्ञा महाराज. [जाते.

राजा—वासवदत्ता या वेळीं मला भेटावयास येत आहे, याचें कारण काय असावें बरें? त्या मूर्खानें तिकडे जाऊन आपले गुण तर पाघळले नसतील ना? अथवा, तें पत्र राणीच्या हातीं तर लागलें नसेल ना ? काय असेल तें असो. वेळ तर येऊन ठेपली खरी. त्यासंबंधानें कांहीं निघालेंच तर योग्य बतावणी करून तिचा संशय दूर करावयास मी कांहीं कमी आहें, असें नाहीं. मात्र, आपल्याविषयीं तिच्या मनांत कांहीं संशय उत्पन्न न होईल, असाच भाषणक्रम ठेविला पाहिजे.

[वासवदत्ता प्रवेश करिते.]

वासवदत्ता—देवा! नाथांची काय दुःखास्पद स्थिति झाली ही ! माझ्यानं पहावत दिखील नाहीं. पण अशी अवस्था होण्याचं कारण तरी काय असावं ?

(हरिणी.)

नृपतिमन कां चिंताग्नीनें सदैव जळे अहा !
शिथिल तनु कां झाली त्यांची नसे श्रमही महा;
वदनकमलश्रीही गेली, कसा भ्रम होतसे,
मजसि न सुचे कांहीं, आतां करूं तरि मी कसें ? १

अथवा, मला जी शंका आली तीच कशावरून खरी नसेल ? मला वाटतं, त्याच पोरीला पाहून महाराज असे भ्रमिष्टासारखे झाले असावेत. कारण त्या राजतनयेचं सौंदर्यच तसं विलक्षण आहे.

पद (चाल–अरसिक किति हा.)

शशिवदना ती बाला । जणु कुसुमशराची
कीर्ति विशाला ॥ ध्रु० ॥
वाटे धन्यचि झाला । विधि निर्मुनि ऐशा स्मरमंजरिला ॥
नाजुक गौर तनूला । अति कोमल मोहक मुखकमलाला ॥

प्रेमळ नयनशरांला । अतिमंदस्मितमधु हास्यरसाला ॥
पाहुनि जो नच भुलला। तो यतिवर किंवा अरसिक ठरला॥ १ ॥

त्याच शशांकाननेस पाहून महाराजांची जर अशी स्थिति झाली असेल, तर ही फार खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे ! नशीब आपलं! (राजास) प्राणनाथ, वंदन करितें.

राजा—(उठून) आज यावेळीं आह्मां गरिबांची वरीच आठवण झाली ह्मणावयाची !

वासवदत्ता—महाराज !

पद (चाल–उभि जवळ खरी०)

मुखकमल वाळुनी गेलें ।
औदास्य वरी कां आलें ॥
मन चंचल कां हें झालें ।
कीं हरुनि कुणी तें नेलें ? ॥
तें स्पष्ट सांगुनी आतां ।
दूर करा माझी चिंता ।
विनती ही चरणीं नाथा ।
किति रडूं नेत्र हे शिणले ।
मी वृत्त पुसाया आलें ॥ १ ॥

राजा—(स्वगत) हिनें तर माझी खरी स्थिति ओळखली असें वाटतें. (उघड) प्रिये, माझी दुःस्थिति पाहून तुला वाईट वाटावें हें साहजिकच आहे. परंतु मजविषयीं भलताच संशय घेऊन तूं आपणास वाईट वाटून घ्यावेंस, हें मात्र मला बरें दिसत नाहीं. वासवदत्ते !

पद (चाल–अभिनव मधुलोलुप हे०)

तुजविण मम हृदय कवण हरिल सांग गे ।
भाग्यवती अशि युवती कोण असे गे ॥ ध्रु० ॥
बघुनि तुझें चित्त विमल । मोहक हें वदनकमल ।
ओळखुनी गुणहि सकल । दास तुझा मी केवळ ।
झालों; मग संशय कां व्यर्थ घेसि गे ॥ १ ॥

वासवदत्ता—महाराज, आपण माझ्यावर किती प्रेम करतां हें मला ठाऊक नाहीं का ? पण आपल्या मनाची उद्विग्नता पाहून मेले भलभलते विकल्प मनांत येतात, याची दासीला क्षमा करावी.

राजा—(स्वगत) त्या राजकन्येचें दर्शन झाल्यापासून हिजवरच्या माझ्या प्रीतीला जरी हळुहळू ओहोटी लागत चालली होती, तरी आतांचे हे हिचे प्रेमालाप ऐकतांच पुनः त्या प्रीतीला भरती येऊं लागली ! (उघड) प्रिये, तुझ्या भाषणानें मला मुळींच राग न येतां उलट आनंद मात्र होत आहे.

वासवदत्ता—(स्वगत) महाराजांचं मनोगत समजून घेण्याला ही संधि फार चांगली आहे. (उघड) प्राणनाथ, मी आपणास सांगावयास विसरलें, ती विंध्यकेतूची कन्या आतां उपवर झाली हो !

राजा—(सहास्य) मग, तिला काय करावें ह्मणतेस तूं ?

वासवदत्ता—हें असं काय बोलावं बरं ? एखाद्या चांगल्याशा राजपुत्राशीं तिचं लग्न करून द्यावं, ह्मणजे झालं. त्या बिचारीला आमच्यावांचून आतां कुणाचा आधार तरी आहे का ?

राजा—(स्वगत) वा ! ही त्या सुंदरीला बिचारी ह्मणते ! पण, माझी अशी अवस्था होण्याचें कारण तीच आहे हें हिला काय ठाऊक ? असो. आतां येथें कांहीं तरी थाप देऊन वेळ मारून नेली पाहिजे.

वासवदत्ता—(स्वगत) तिच्या लग्नाची गोष्ट काढतांच स्वारी पुनः भ्रमिष्ट झाली ! यावरून माझाच तर्क खरा ठरतो. (उघड) प्राणनाथ, विचार कशाचा चालला आहे ?

राजा—या कामीं विचार तर अवश्य केला पाहिजे; कारण तो विंध्यकेतु सामान्य मनुष्य नसून मोठा योद्धा व कुलीन पुरुष होता; आणि तूं ह्मणतेस ती त्याची मुलगी. तेव्हां त्याच्या व आपल्या कुलशीलास साजेल असेंच स्थळ पाहून वरयोजना केली पाहिजे.

वासवदत्ता—पण आतां या कामीं अवधी लावून उपयोग नाहीं. ती सुकुमार मुलगी दिवसेंदिवस काळजीनं कशी कोमेजून चालली आहे.

राजा—(स्वगत) काय, ती कोमेजून चालली आहे ? त्या दिवशीं मीं तिला त्या प्रमदवनांत पाहिली त्या वेळीं तर ती कशी गुलाबाच्या फुलासारखी टवटवीत आणि प्रसन्नचित्त दिसत होती आणि आतां ती कृश होत चालली आहे, असें ही सांगते. यावरून तिलाहि प्रणयानें आपला प्रताप दाखविला असावा,

यांत संशय नाहीं. (उघड) बरें, आतां मी त्याच उद्योगास लागतों. तिचें लग्न होऊन ती स्वतंत्र होईपर्यंत तिच्या कोमल मनाला किंचित्‌हि वाईट न वाटेल अशा रीतीनें तिला वागीव बरें.

वासवदत्ता—महाराज, हें आपण का मला सांगितलं पाहिजे ?

राजा—तसें नव्हे, पण हें पहा, त्या दिवशीं-(स्वगत) अरे रे! हें मी काय भलतेंच बोललों !

वासवदत्ता—कां, स्तब्ध कां झालां ? त्या दिवशीं काय झालं ?

राजा—(स्वगत) आतां काय करावें ? (उघड) तसें नव्हे. मीं ह्मटलें, तूं चतुरच आहेस, पण मी आपली सूचना दिली एवढेंच.

वासवदत्ता—(स्वगत) आतां यांतलं इंगित बाहेर पडलं. त्या दिवशीं मीं तिला कमळं आणावयास प्रमदवनांत पाठविली होती, तेव्हां त्यारीनं तिला कुठं तरी पाहिली असावी, यांत संशय नाहीं.(उघड) महाराज, मीं सांगितलेली गोष्ट लक्ष्यांत असूं द्या बरं.

राजा—मी मला स्वतःला विसरेन, पण तिला-नव्हे-तुझें बोलणें कधींहि विसरणार नाहीं. तूं स्वस्थ रहा; तिच्या लग्नासंबंधाचें सर्व कांहीं मजकडे लागलें.

वासवदत्ता—(स्वगत) ठीक ! हें भविष्य मीं पूर्वींच केलं होतं. (उघड) आपणास जसं योग्य दिसेल,'तसं करावं. मीं कांहीं सांगितलं पाहिजे असं नाहीं. पण होईल तेवढं लवकर करावं, ह्मणजे झालं. [जाते.

राजा—तुझी भीति जर मला नसती, तर मला चांगलें वाटतें तें मीं आजच केलें असतें. पण नाहीं. या कामीं मला बराच त्रास सोसावा लागणार आहे. मन चंचल झाल्यामुळें बोलण्यांत असे प्रमाद होतात. वासवदत्ता चतुर असल्यामुळें माझी खरी स्थिति तिनें ताडलीच असेल, यांत संशय नाहीं. माझा मित्र माझें पत्र घेऊन त्या सुंदरीकडे गेला आहे. त्याचा काय परिणाम होतो इकडे माझें लक्ष्य लागून राहिलें होतें तोंच हें विघ्न मध्यें आलें; एकंदरींत-

श्लोक (केदार.)

सौख्याच्या बहु कल्पना घडिघडी येती मनोमंदिरीं,
यत्नावांचुनि सिद्धिला न वरिती, संत्रास देती वरी;
झाला स्त्रीवश पूर्ण त्यांतहि तरी तो मंदभागी खरा,
स्त्रीबुद्धि प्रलयासि कारण जगीं पाडील मोहीं नरा. १

[जातो.

[पडदा पडतो.]

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

[**स्थळ**—अंतःपुर. दर्शिका प्रवेश करिते.]

दर्शिका—

पद (चाल–जमुनापे बाजे०)

मदनाला तिळभर नाहिं दया ।
जाळित हा हृदया ॥ मदनाला० ॥ ध्रु० ॥
शशि हा त्याला मित्र मिळाला ।
शीतलता कशि गेलि लया ॥ मदना० ॥ १ ॥
वसंत सगळें जग शृंगारी ।
परि तो मजला देत भया ॥ २ ॥

कुसुमायुधा ! हा वत्सपति राजा तुला आपल्या सौंदर्यानं आणि गुणांनीं खरोखर लाजवितो, यांत संशय नाहीं. अहाहा !

पद (चाल–मथुरासे शाम०)

किति सुंदर मोहक शांत दिसे ।
रूपास दुजी उपमाच नसे ॥ ध्रु० ॥
सकल नभोंगण हें आक्रमुनी ।
नवतरुणाचा वेष धरी ।
नररूपानें या नरभुवनीं ।
कमलापति हा काय वसे ? ॥ १ ॥

आणि शौर्यानें ह्मणशील, तर मदना ! तूं त्याजपुढं कांहींच नाहींस. युवतिजनांच्या अंतःकरणांत शिरून त्यांनां नको जन्म करावयाचा, हाच काय तो तुझा पराक्रम ! पण, त्याचें युद्धकौशल्य पाहून महापराक्रमी योद्धेहि चकित होतात. असो. जवळ जवळ दोन वर्षें झालीं, एके दिवशीं बाबांनीं मला आपल्या मांडीवर घेऊन आईकडे वळून ते ह्मणाले:—

पद (चाल–मल्हारि वारि०)

किति ही माझी चांगली सुगुणखनी ।
प्रेमळ मृदुभाषिणी ॥ ध्रु० ॥

उदास होतां रंजविते मन ।
मधुर गिरा वदुनी ॥ १ ॥
वीरशिरोमणि वत्सनृपतिला ।
अर्पिन ही चिमणी ॥ २ ॥
त्याविण दुसरा वर योग्य हिला ।
न दिसे मजसि कुणी ॥ ३ ॥
वच ऐकुनि हें आई हंसली ।
माझें मुख चुंबुनी ॥ ४ ॥

देवा ! ते दिवस आणि तीं माणसं पुनः या जगांत माझ्या कधीं तरी दृष्टीस पडतील काय ? छे, आशाच नको. प्रभो ! माझ्यासारख्या गरीब बालिकेवर अशीं संकटं आणण्यांत तुझा हेतु तरी काय असावा ? मनांत मोठमोठ्या सुखाच्या कल्पना येतात, पण त्या सफल होण्याचा कांहीं तरी संभव आहे का ? अथवा संभव असो वा नसो, वत्सराजांशिवाय अन्य पुरुषास वरणार नाहीं, हाच माझा निश्चय !

पद (**चाल**–मूर्तिमंत भीति उभी०)

मूर्ति तीच मीं वरिली मन्मनोविनोदिनी ।
वाहिला अतांच काय पदसरोजसेवनीं ॥ ध्रु० ॥
प्राण घ्यावयास जरी तो कृतांत पातला ।
निश्चया न मोडितां वरीन मी नराग्रणी ॥ १ ॥
विघ्न कांहिं उद्भवुनी लग्न तें नव्हे जरी ।
मी त्यजीन प्राण हे स्वकीय नेमपालनीं ॥ २ ॥

मनोरमा—(पडद्यांत) शाबास ! हिचा निश्चयसुद्धां होऊन चुकला ! (प्रगट होऊन) बाई आरण्यके ! हा तुझा निश्चय परमेश्वर लवकरच पूर्ण करील बरं !

दर्शिका—(स्वगत) ही मनोरमा इथंच कुठं तरी लपून राहून माझं भाषण ऐकत होती वाटतं. (उघड) मनोरमे, तूं माझं बोलणं ऐकलंस म्हणून काय झालं ? मी तरी तें तुला सांगणारच होतें.

मनोरमा—काय सांगणार होतीस, तें आतां सांग पाहूं.

दर्शिका—अग पण तूं आडून सगळं ऐकलंसना ? मग तीच रडकथा पुनः काय सांगूं ?

मनोरमा—आरण्यके! हा तुझा लाजाळू आणि संशयी स्वभाव मला नाहीं बाई आवडत.

दर्शिका—अग वेडे, आपलं हृद्गत तुला सांगायला मला लाज का वाटते? पण सखे, माझं दुःख मी तुला किती ह्मणून सांगूं?

पद (चाल-तूं टाक चिरुन ही०)

मज न सोसवे हा त्रास। बरा वनवास।
करूं काय सांग मी कंठुं कसे दिन।
गिळुनि सदा दुःखास ॥ ध्रु० ॥
मनिं जनकजननिचा ध्यास। तीं अंतरलीं मज खास।
हा जाळि विरह चित्तास। गे शून्य सकल जग
भासे जीवित वाटे व्यर्थ उदास ॥ १ ॥
तो थोर जगाचा नाथ। जोडिले तयाला हात।
परि न ये दया चित्तांत। यमराजहि कैसा
मला विसरला तारक जो अबलांस ॥ २ ॥
वाटते मनाला लाज। परि सांगतेंच तुज आज।
मनिं भरला तो नृपराज। जरि दुर्लभ तरि ही
न तुटे बाई हा प्रणयाचा पाश ॥ ३ ॥

मनोरमा—आतां उघड करून सांगितलंस हें चांगलं झालं. आतां कांहीं तरी मेला यत्न करितां येईल. बरं आरण्यके! त्या दिवशीं बाईसाहेबांनीं महाराजांपाशीं तुझ्या लग्नासंबंधानं गोष्ट काढली, तेव्हां महाराज काय ह्मणाले तें तुला समजलं का?

दर्शिका—गडे, या गोष्टी मला कशा समजाव्या बरं?

मनोरमा—ऐक तर, मी सांगतें. राणीसाहेबांनीं महाराजांपाशीं तुझ्या लग्नासंबंधानं गोष्ट काढली, त्या वेळीं महाराज भ्रमिष्टासारखे झाले. नंतर, राणीसाहेबांस भलताच संशय येऊं नये ह्मणून त्यांनीं त्यांनां असं सांगितलं, कीं, विंध्यकेतूची कन्या सद्गुणी व रूपसंपन्न असल्यामुळं तिच्या योग्य असा वर मिळावयास बरेच दिवस लागतील. यासाठीं तूर्त घाई करून फायदा नाहीं.

दर्शिका—पण मनोरमे! माझ्या लग्नाची गोष्ट निघतांच महाराज खरेच का ग भ्रमिष्ट झाले?

मनोरमा—मी खोटं का सांगतें तुला ? महाराजांचं मन तुझ्यावर गेलं आहे, व ह्मणूनच ते तुझ्या लग्नासंबंधानं टाळाटाळ करित आहेत ! पण गडे, मी तुला तुझ्या हिताची एक गोष्ट सांगणार आहें, ऐकशील का ?

दर्शिका—(सहास्य) अशी हिताची काय गोष्ट आहे, ती तरी आधीं ऐकूं दे.

मनोरमा—तूं महाराजांनां एक प्रेमपत्रिका लिहून ती मजकडे दे.

दर्शिका—पण गडे, तसं केल्यास महाराज मला निर्लज्ज नाहींत का ह्मणायचे ?

मनोरमा—मग बाई तुझ्या लज्जेची शिकस्त झाली ह्मणायची ! बरं, आरण्यके! तुझ्या बाबांनीं तुला आमच्याच महाराजांनां द्यायची केली होती ना ?

दर्शिका—पण मनोरमे, हें तुला ग कुणीं सांगितलं ?

मनोरमा—अग तूं आपल्याशींच बोलत बसली होतीस, तेव्हां मीं एकलं. एकंदरींत, तुझ्या बापानं तुला अगदीं अनुरूप असंच स्थळ योजिलं होतं, यांत संशय नाहीं.

दर्शिका—(सलज्ज) स्थळ कसंहि असो, पण रूप मात्र अनुरूप होतं, एवढं खरं.

मनोरमा—गडे, असं कां ह्मणतेस ?

पद (चाल–जोगी–धुमाळी.)

बाई ! काय कथूं तुजला । वैभव भूपतिचें ॥ ध्रु० ॥
देशोदेशींचे नृपनाथ । ज्याच्या चरणीं जोडिति हात ।
विजयश्रीचा प्रियकर कांत । मुनिसम शांतमानस जो ॥ १ ॥
धरुनि यच्चरिताचा छंद । कविवर रचिती रम्य प्रबंध ।
सुटला सुखकर कीर्तिसुगंध । दे आनंद जन-वृंदा ॥ २ ॥

दर्शिका—अग यांत नवल तें काय ? चंद्रप्रकाशानंच कुमुदिनी विकास पावतात, इतरांकडून तसं होईल का ? आणि ह्मणूनच माझं हें वेडं मन तिकडे धाव घेतं.

(पडद्यांत ‘ अग मनोरमे, तुला राणीसाहेब बोलावताहेत, चल लवकर. ’)

मनोरमा—ही मेली कटकट आहेच आपली जेव्हां तेव्हां ! मी जातें बाई आरण्यके

[जाते.

विदूषक—(प्रवेश करून) या नृपसमागमांत इच्छित पदार्थांवर जरी यथेच्छ हात मारावयास मिळतो, तरी इतर बाबतींत तो दुःखदायकच आहे. हें माझेंच उदाहरण पहाना ? मी वेड्यासारखा त्याला ह्मणालों मात्र, कीं, त्या पोरीला एक पत्र लिहून दे, तोंच त्यानें हें पत्र लिहून मजपाशीं दिलें ! हें त्या पोरीला कालच नेऊन दिलें पाहिजे होतें; परंतु तिच्याजवळ वासवदत्ता बसलेली असल्यामुळें मला तेथून हळूच मागें पाय काढावा लागला ! आतां हें पत्र घेऊन, वाड्याचे चौदा चौक ओलांडून येईपर्यंत माझी कोण त्रेधा उडाली ! वाटेंत वासवदत्ता भेटली, तिला पहातांच मी अगदीं भिऊन गेलों. पण 'भटजी, कुठें चालली स्वारी ?' 'नाहीं, आपला सहजच इकडे आलों,' एवढ्याच प्रश्नोत्तरावर भागलें ह्मणून बरें झालें. आतां त्या पोरीला पहिल्यानें हुडकून काढिली पाहिजे. कोळशांच्या राशींतल्या मोठ्या हिरकणीप्रमाणें तिला दासीजनांच्या समुदायांतून ओळखून काढणें कांहीं कठीण नाहीं ! (दर्शिकेस पाहून) अरे वा ! ही तर आपल्या कमलासारख्या नाजूक हातावर आपला गुलाबी गाल टेंकून कसला तरी विचार करीत बसली आहे ! अथवा, प्रेमा-शिवाय हिचा दुसरा काय विचार असणार ? तो तिकडे हिच्या नादानें खुळा होत चालला आहे, आणि ही इकडे त्याच्या नादानें वेडी बनत चालली आहे ! खासा कारभार ! हें प्रेम ह्मणजे आहे तरी काय, कळत नाहीं ! आमच्या कुटुंबास तरी एकदा विचारून पाहिलें पाहिजे. असो. आतां हें पत्र तिला देऊन, आपण या कामगिरींतून एकदाचें मोकळें व्हावें, हें उत्तम. (दर्शिकेस) अगे विंध्यनृपकन्यके ! हें तुझ्या महाराजांनीं तुला पत्र दिलें आहे.

दर्शिका—(दचकून) काय ह्मणतां, मला पत्र दिलं आहे ? कुणीं दिलं ?

विदूषक—अगे दुसरा कोण देईल असें तुला वाटतें ? आमच्या वत्सपति राजानें दिलें आहे.

दर्शिका—(आनंदानें) बरं, या पाहूं तें माझ्याकडे.

विदूषक—(पत्र देतो) हें घे, वाचून पहा, आणि याचें उत्तर लवकर त्याला पाठीव. नाहीं तर त्याची आतां कांहीं धडगत दिसत नाहीं. सांभाळ बरें ! मला लवकरच गेलें पाहिजे.

[पळत जातो.

दर्शिका—हें पत्र मला महाराजांनीं पाठविलं आहे ? मोठंच आश्चर्य ह्मणायचं! अथवा मला पाहून माझ्यासारखीच त्यांचीहि स्थिति झाली नसेल कशावरून ? पण हा वेडा ब्राह्मण अंमळ चमत्कारिक दिसतो. (पत्र वाचते—)

पद (**चाल**–पाहिन सिंहासनिं राम०)

प्रणयपत्रिका लिहितों तुज ही विंध्यकेतुनृपनंदिनी ॥ ध्रु० ॥
सुमंगलप्रद आशीर्वचनें देउं किती तुज कोमले ।
मंगलमूर्ती मम सदनांतिल तूं माझी संजीवनी ॥ १ ॥
प्रमदवनीं कमलांस्तव गेलिस त्या दिवशीं कमलानने ।
धन्य जाहलों, मुखचंद्र तुझा पाहुनि, तुज आलिंगुनी ॥ २ ॥
तेव्हांपासुनि वेडा झालों प्रेमानें मी राजसे ।
प्रेमांधाला मार्ग दाखवीं, सन्निध त्याच्या येउनी ॥ ३ ॥

मना! थोडा धीर धर. आतां काय संशय उरला आहे ? पण महाराज! आपण मला ही प्रेमपत्रिका पाठविली खरी, परंतु राणीसाहेबांसंबंधानं आपण कांहीं विचार केला आहे का ? असो. आपण आतां या पत्राचं आपणांस येईल तसं वेडंवांकडं उत्तर लिहावं. (पडद्यांत जाऊन लिहिण्याचें सामान आणिते व पत्राचें उत्तर लिहूं लागते.)

[इंदिवरिका व मनोरमा प्रवेश करितात.]

इंदिवरिका—मनोरमे! ही आरण्यका तर इथं कायसं लिहीत बसली आहे.

मनोरमा—तिचं मन पत्रलेखनांत अगदीं गढून गेलं आहे. थांब, मीच तिला हांक मारतें. आरण्यके! राणीसाहेब तुला बोलावताहेत, ऐकलंस का ?

दर्शिका—कोण ? तुह्मी का ? या. मी तुमचीच वाट पहात होतें.

मनोरमा—ती ग कां ?

दर्शिका—अगबाई, (सलज्ज) हें पाहिलंस का तिकडचं पत्र !

इंदिवरिका—महाराजांनीं का पाठविलं हें ?

मनोरमा—(पत्र घेऊन) हा पाहिलास यांतला मजकूर किती प्रेमानं लिहिला आहे तो ? (बाजूला जाऊन दोघी वाचतात.)

दर्शिका—आतां या लागल्या आपसांत कुजबुजायला.

मनोरमा—(थट्टेनें) आरण्यके! तुला महाराजांनीं प्रेमपूर्वक पाठविलेलं पत्र आह्मीं वाचलं याची आह्मांला क्षमा कर हो. बरं, या पत्राचं उत्तर कसं काय लिहिलंस तें वाच पाहूं.

दर्शिका—ऐका तरः—

पद (चाल-सोच समजे०)

वाटतसे मनिं लाज । नृपाला ।
स्वमनीषेतें कळवायाला ॥ ध्रु० ॥
पंकजकलिका वाळुनि जाते ।
नच मिळतां ती भ्रमरमुखाला ॥ १ ॥
चातकि पाहे वाट घनाची ।
ती स्थिति आली या दासीला ॥ २ ॥
याहुनि विनती काय करावी ।
मंदमति मी केवळ बाला ॥ ३ ॥

मनोरमा—शावास ! किती तरी मधुर पद्य हें ! अगदीं महाराजांवर ताण केलीस बाई !

इंदिवरिका—खरंच गडे. हें पत्र वाचून आमचे महाराज आपले अगदींच वेडे होऊन जावयाचे !

दर्शिका—पुरे करा बाई थट्टा आतां. मनोरमे! माझं एक महत्त्वाचं काम तुला केलं पाहिजे. हें पत्र महाराजांनां नेऊन दिलं पाहिजे.

मनोरमा—नको नको ! तें आपलं आपणच करावं.

दर्शिका—(तिच्या गळ्यांत हात घालून) गडे ! इतकं रागवायाला काय झालं ? काल तूंच ना मला पत्र लिहावयास सांगत होतीस.

मनोरमा—पण त्या वेळीं तूं माझं सांगणं कुठं ऐकलंस ?

दर्शिका—माझी चुकी झाली गडे. पण आतां महाराजांनीं आपण होऊन हें पत्र पाठविल्यावर त्याचं उत्तर मला नको का पाठवायाला ? तूं नको ह्मणतेस तर हें पत्र मी आतांच फाडून टाकतें. तुझ्या विचाराविरुद्ध मी वागेन असं तुला वाटतं का ?

मनोरमा—गडे, मी तें विनोदानं बोललें वरं. तुझं असलं नाजूक काम मी नाहीं तर दुसरं कोण करणार ? दे इकडे तें पत्र. (घेते.) तुह्मीहि चला आतां. राणी साहेब ह्मणतील, बसल्या आहेत गोष्टी सांगत. मी हें पत्र महाराजांस नेऊन देतें.

दर्शिका—पण मनोरमे ! फार सांभाळून वाग वरं. मला बाई राणीसाहेबांची फार भीति वाटते.

मनोरमा—तूं अगदीं स्वस्थ रहा.

[जातात.

प्रवेश दुसरा.

[राजा, विजयसेन व विदूषक.]

विजयसेन—सरकार, माझी एवढीच विनंति आहे, कीं:—

पद (चाल-जीं जीं कर्म त्या०)

दुष्ट कलिंगावरती मजला पाठविलें होतें ।
धाडुनि त्याला स्वर्गीं येथें आलों मी नृपते ॥ ध्रु० ॥
विंध्यकेतुच्या वधप्रसंगीं आपण जो केला ।
आनंद तसा मानहि माझा, आज न कां झाला ।
म्लानपणा वदनेन्दूवरती कां तुमच्या आला ।
कारण याचें सांगुनि भूपा, शांत करा मातें ॥ १ ॥

विदूषक (स्वगत)—शाबास, आतां या राजश्रींच्या मुखांतून काय काय मुक्ताफळें बाहेर पडतात, पहावें.

राजा—विजयसेन, तुमच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मला लाज वाटते.

विजयसेन—राजाधिराज, या सेवकापाशीं आपण बिलकूल संकोच धरूं नये, अशी विनंति आहे.

राजा—ऐका तरः—

पद (चाल—वल ज्याचें त्यास तें०)

वेड मला लाविलें । प्रमदवनीं निजमुखशशि
दावुनि । सुंदरिनें । स्मरमंजिरिनें । मन माझें चोरिलें ॥ ध्रु० ॥
त्या दिवसापासुनि चंचलता । उद्भवली । स्मृति संहरली ।
सुविचारें सोडिलें ॥ १ ॥
क्षमा करा राणीस न कळवा । देइल ती । मज दुःख अती ।
हे कर मीं जोडिले ॥ २ ॥

विजयसेन—महाराज, हें काय बरें ? आपण अगदीं निर्धास्त असावें. (स्वगत) पण ही सुंदरी कोण? दर्शन कधीं झालें? आणि हें आहे काय प्रकरण? कांहीं समजत नाहीं. (विदूषकास) काय हो वसंतक! हा काय प्रकार आहे, हें तुह्मांला तरी ठाऊक आहे का ?

विदूषक—होय. ऐका, नीट लक्ष्य द्या बरें. विंध्यकेतूचा वध तुह्मींच केला ना ?

विजयसेन—होय, मींच केला; पण त्याचा या गोष्टीशीं काय संबंध ?

विदूषक—अवश्य संबंध आहे. तुह्मी ऐका तर खरे. विंध्यकेतूला मारून, तुह्मी जेव्हां विजयी होऊन इकडे आलां, त्या वेळीं बरोबर एक वस्तु आणलेली आठवते का ?

विजयसेन—वस्तु ?

विदूषक—हो हो, वस्तु. माझ्या या मित्राच्या दृष्टीनें तर फारच दुर्मिळ वस्तु.

विजयसेन—छे बुवा, या तुमच्या संदिग्ध भाषणानें माझी मुळींच समजूत पडत नाहीं.

विदूषक—अँः, एवढाहि नाहीं तर्क तुह्माला ? अहो, तुह्मीं विंध्यकेतूची कन्या आपल्याबरोबर आणिली नव्हती का ? ती कन्या आतां चांगली वयांत येऊन उपवर झाली आहे. तेव्हां, तिच्या लग्नाच्या काळजींत हे राजश्री पडले आहेत, दुसरें काय ?

विजयसेन—हां, आतां आलें ध्यानांत. तर मग तिच्या लग्नाच्या काळजींत पडले ह्मणण्यापेक्षां तिच्याशीं आपलें लग्न कसें होईल, या विचारांत आहेत, असें ह्मणणें अधिक सयुक्तिक !

विदूषक—अहो, त्या वेळीं जिला या महाराजांनीं ‘ बाळे ’ अशी हांक मारून आणि मित्रत्वाचें नातें दाखवून आपल्या अर्धांगीच्या स्वाधीन केलें होतें, तिलाच हे आतां आपली अर्धांगी बनविण्याच्या विचारांत आहेत !

[मनोरमा प्रवेश करिते.]

विदूषक—ही कार्टी इकडे कशाला आली ?

विजयसेन—मनोरमे ! तुझ्या हातांत काय ग हें ?

विदूषक—(राजास) मित्रा, त्या तुझ्या प्रियपात्रानें हें तुला तुझ्या पत्राचें उत्तर पाठविलें वाटतें.

मनोरमा—महाराजांचा जयजयकार असो. (स्वगत) आतां कसं करावं ? हे विजयसेन इथं असतील असं मला वाटलं नव्हतं.

राजा—(तिचें मनोगत जाणून) मनोरमे ! विजयसेन असले तरी त्यांनां भिण्याचें कांहीं कारण नाहीं. ते आपलेच आहेत.

मनोरमा—(स्वगत) माझं मन विजयसेनावर गेलं आहे, हें महाराजांस ठाऊक आहे वाटतं. (उघड) महाराजांनीं कृपा करून हें पत्र पहावं, अशी विंध्यकन्येची नम्र विनंति आहे.

राजा—(पत्र वाचून) अहाहा ! काय ही मधुर भाषा आणि केवढा विनय !

विदूषक—पण मित्रा, आतां हें तिच्या हातचें पत्र वाचून तरी तुला अंमळ बरें वाटलें कीं नाहीं ?

राजा—गड्या, काय विचारतोस ?

पद (चाल-निजमख रक्षाया०)

मन्मनिं वास करी । मूर्ति मनोहर । प्रेमें आजवरी ॥
तिच्या करींची रम्य पत्रिका । किति यत्नानें आली स्वकरीं ॥ १ ॥
ही मुक्तामाला । विमला । अर्पियली मजला ॥
प्रेमपरिमळें वासित झाली । ही विरहाचें दुःख निवारी ॥ १ ॥

सध्या राणीनें तर तिला अशी बंदोबस्तानें ठेविली आहे, कीं, ती माझ्या मुळींच दृष्टीस पडूं नये. तर अशा स्थितींत मला तिचें दर्शन तरी कसें होणार ?

विजयसेन—मी तरी काय सांगूं महाराज ? राणीसाहेबांचा स्वभाव अंमळ चमत्कारिक पडला.

विदूषक—मला एक युक्ति सुचते बुवा. राजानें राणीला असा निरोप पाठवावा, कीं, विंध्यकेतूच्या कन्येला योग्य वर पहावयाचा आहे, याकरितां ती गायनवादनादि कलांत कशी काय निपुण झाली आहे तें आह्मांला एक वेळ पाहिलें पाहिजे. यासाठीं तिच्या परीक्षेची उद्यां तयारी ठेवा. असें झालें ह्मणजे तुला आपल्या नेत्रांचें सावकाश पारणें फेडून घ्यावयास चांगला वेळ मिळेल व तिचें मधुर गायनहि ऐकावयास मिळेल.

विजयसेन—ही वसंतक भटजींची युक्ति फार नामी आहे. शिवाय, आपल्या राणीसाहेबहि फार रसिक आहेत. तेव्हां हें कार्य घडून यावयास कांहीं हरकत येईल, असें वाटत नाहीं.

राजा—मनोरमे ! वासवदत्तेला माझा निरोप सांग, कीं, उद्यां, विंध्यकेतूच्या कन्येचें गायनवादन पहावयाचें आहे. याकरितां आपलें गायनमंदिर चांगलें सुशोभित करण्याचा अनुचरांस आतांच हुकूम द्या व सर्व तयारी होतांच आह्मांला वर्दी येऊंद्या.

मनोरमा—आज्ञा सरकार.

[जातात.

[पडदा पडतो.]

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

[**स्थळ**—नृत्यशाला—विजयसेन प्रवेश करितो.]

विजयसेन—ह्या नृत्यशालेची शोभा आज किती मनोरम दिसत आहे ! आणि आज तर विंध्यकेतूच्या त्या तरुण कन्येचें येथें गायन होणार आहे. (पडद्यांत पाहून) इकडे तरः—

श्लोक.

पायीं नूपुर वाजती कटिं तटीं सिंजावहा मेखला,
शोभा हार कुचांसि देति तशिं तीं रत्नांगदें बाहुला;
कर्णी मौक्तिकगुच्छ हे विलसती केशांमधें स्वस्तिकें,
घालोनी परिचारिकागण जमे येथें पहा कौतुकें. १

खरोखर, आतां येथें कांहीं करावयाचें ह्मणून राहिलें नाहीं. सर्व तयारी आहे. त्या राणीसाहेब तिकडून येत आहेत व हातीं वीणा घेऊन ती विंध्यकन्याहि त्यांच्याबरोबरच येत आहे; तर आपण आतां जाऊन महाराजांस वर्दी द्यावी.

[जातो.

[राणी, दर्शिका, व हातीं सारंगी, वीणा, तबला वगैरे वाद्यें घेऊन परिचारक व परिचारिका प्रवेश करितात. कोणी वाद्यांच्या तारांची जुळवाजुळव करितात, कोणी तबल्यावर थाप देतो.]

वासवदत्ता—आज, प्रधानजींनीं स्वतःच्या देखरेखीखालीं सर्व तयारी करविली असल्यामुळे हें गायनमंदिर फार शोभायमान दिसत आहे. बरं आरण्यके, तुझा कंठ आज साफ आहे ना ? ह्मण पाहूं एखादं पद्य.

दर्शिका—(लाजून खालीं मान घालते.)

वासवदत्ता—तुझा वेडेपणा तो हाच ! अग अशा कामीं लाज काय उपयोगाची ? ह्मण ह्मणतांच ह्मणावं तें सोडून बसली खालीं मान घालून नवरीसारखी !

दर्शिका—(हांसून)

पद (चाल—ठुंबरी-झिंजोटी.)

पीन पयोधर पाहुनि अंबर ।
स्मरपीडित मधुकरिका होते ॥ ध्रु० ॥

उत्कंठित मग होय बिचारी ।
बघण्या प्रियदर्शन दयितातें ॥ १ ॥

वासवदत्ता—शाबास ! आज, महाराज तुझ्या गायनाची परीक्षा पाहणार आहेत, यासाठीं अशीं सुरेख पदें ह्मण, कीं, त्यांची चित्तवृत्ति अगदीं तल्लीन होऊन जावी.

दर्शिका—(स्वगत) ज्यांच्यावर माझं प्रेम जडलं आहे, त्यांजपुढं आतां मला गायन करावं लागणार ! मनोरमा सांगत होती, कीं, माझं एकवार दर्शन व्हावं, ह्मणून, महाराजांनीं विजयसेनांस कांहीं तरी युक्ति योजावयास सांगितली, पण त्यांस ती सुचेना. शेवटीं, ज्याला आह्मी आजपर्यंत वेडा समजत होतों, त्या वसंतक ब्राह्मणानं ही माझी परीक्षा घेण्याची युक्ति काढली. पण हीं जी परीक्षा होणार ती माझ्या गायनाची, सौंदर्याची, कीं प्रेमाची ? असो. आतां येथें महाराज माझ्यासमोर येऊन बसले ह्मणजे माझं मन चंचल न होवो ह्मणजे झालं.
[जाते.

(राजा, विदूषक, सेनापति व प्रधान येतात.)

राजा—मित्रा वसंतका, काय मौजेची रात्र आहे !

पद (चाल-देस, दादरा)

कुसुमचाप आज न संताप देत तो ।
हिमकरही या समयीं सुखद वाटतो ॥ ध्रु० ॥
श्वासहि ते आज पहा नष्ट जाहले ।
मंदपणा नैराश्यहि विलय पावलें ।
प्रियकरजनसंगम हा त्रास वारितो ॥ १ ॥

विदूषक—मित्रा, ही नृत्यशाला ह्मणजे आज प्रत्यक्ष इंद्रभुवनच दिसत आहे ! जिकडे तिकडे लखलखाट आणि चकचकाट पाहून माझे डोळे तर अगदीं दिपून गेले बुवा !

वासवदत्ता—प्रधानजी, आतां रात्र नाहीं का झाली ?

राजा—खरेंच, त्या मुलीचें गायन केव्हां ऐकेन असें माझ्या प्रियेला झालें असेल.

वासवदत्ता—हो हो ! आणि आपणांला त्यांत कांहीं ऐकावयाचंच नाहीं वाटतं ?

विजयसेन—महाराज, राणीसाहेबांनीं विंध्यकन्येला गायनवादनादि कलांचें शिक्षण स्वतः दिलें आहे; व त्यांत आज तिची परीक्षा होणार ह्मणून त्यांना विशेष आनंद झाला आहे.

वासवदत्ता—खरोखरच मला आज आनंद झाला आहे.

राजा—बरें तर आतां अवधी कां ?

वासवदत्ता—आरण्यका आपला मुक्ताहार आणावयास विसरली, तो आणावयास ती गेली आहे. मधुकरे जा, तिला लवकर इकडे घेऊन ये. महाराज आले ह्मणावं.

मधुकरी—आज्ञा बाईसाहेब.

(जाते, व दर्शिका व मनोरमा यांसह प्रवेश करिते.)

दर्शिका—मनोरमे, चल बाई लवकर. बाईसाहेब रागावतील ना !

मनोरमा—महाराजांस केव्हां पाहीन असं तुला झालं आहे हें मी समजलें बरं ! पण सांभाळ हो. गायन करते वेळीं मन स्वाधीन ठेव. नाहीं तर आपली त्यांच्याच तोंडाकडे पहात बसशील !

दर्शिका—

पद (चाल—आम्रमंजिरी तुला०)

धीर नसे अंतरीं । सखये, चल जाऊं मंदिरीं ॥ ध्रु० ॥
सुंदर शशिमुख नृपकुलतरणी । पाहिन केव्हां प्रेमें नयनीं ।
उत्कंठा ही मजलागोनी । मन मोदातें वरी ॥ १ ॥

[बसतात.

विदूषक—(तबलजीस) काय रे ए ! तोंड उघडें करून काय पाहतोस ? दे थाप मृदंगावर. (दुसऱ्यास) तूं लाव आपली सारंगी सुराला. बघतां काय ?

राजा—(स्वगत) अहाहा ! नेत्रांनों, असेच स्थिर रहा. ही मूर्ति मला एकदां नखशिखांत पाहून घेऊं दे.

विदूषक—आतां होऊं द्या ना प्रारंभ ? उशीर कां उगाच ?

वासवदत्ता—आरण्यके, कर पाहूं प्रारंभ आतां.

दर्शिका—(मांडीवर वीणा घेऊन तारांची जुळवाजुळव करिते.)

राजा—(स्वगत) आतां तर ही अधिकच सुंदर दिसूं लागली !

पद (चाल—होइल कलह ह्मणोनी०)

अंकीं घेउनि वीणा । उत्सुक झाली
अभिनव गाना ॥ ध्रु० ॥
काय उर्वशी ही स्वर्गीची । किंवा हरुनी
शोभा रतिची । या स्थानीं अवतरली ।
मोहित करिते माझ्या नयना ॥ १ ॥

दर्शिका—

पद (चाल—प्यारे नवल लाडलि राधिका०)

किति विकल जाहली कामिनी ।
चैन नसे दिनयामिनी ॥ ध्रु० ॥
असिद्धय कसें एका कोशीं ।
राहिल हा न विचार मनीं ॥
भलतीच करी आशा वेडी ।
मृगजल तें जल मानुनी ॥ १ ॥

यौगंधरायण—शाबास, राजकन्ये शाबास !

विजयसेन—(स्वगत) हिला पाहून आमचे महाराज मोहित झाले यांत नवल तें काय ?

वासवदत्ता—महाराजांनां ही चीज आवडली नाहीं वाटतं.

राजा—छे छे ! प्रिये, हें गायन ऐकून मी तर अगदीं वेडावून गेलों आहें.

वासवदत्ता—माझ्या आरण्यकेचा कंठच तसा मधुर आहे.

राजा—

पद (चाल—मालकंस-त्रिवट)

रागरंगयुत सुरंग गायन ।
परिसुनि मन हें झालें तल्लीन ॥ ध्रु० ॥
श्रवणमधुर हा स्वर वीणेचा
बनला केवळ सप्तसुरांचा ।
कंठ मधुर या नृपतनयेचा ।
चित्त दंग करि मृदंगवादन ॥ १ ॥

दर्शिका—(सलज्ज व सहास्य) कांचनमाले, फार वेळ वीणा वाजवून मी गडे अगदीं थकून गेलें आहें. तर आतां तूं वीणा वाजीव आणि मी गातें.

राजा—होय, खरोखरच ती फार श्रमित झाली आहे:—

दिंडी.

लाल झाले गाल, हा घर्म वाहे,
होति कंपित कर चरण हिचे पाहें !
श्रमित झाली सुंदरी वादनानें,
जरी भरली ही पूर्ण यौवनानें. १

(राणीस) प्रिये, वीणावादनांत तूं फार कुशल आहेस. तर आतां तूं वीणा वाजीव आणि ती गायन करील.

वासवदत्ता—बरं आरण्यके, दे ग तो वीणा माझ्याकडे. (घेते) श्रीकृष्णास रुक्मिणीनें जी प्रणयपत्रिका पाठविली होती, ती म्हण गडे आतां.

दर्शिका:—

पद (चाल—नंदगृहाच्या समीप०)

जय श्रीरमणा करितें विनती तुमच्या पदकमला ॥ ध्रु० ॥
दुष्टशिरोमणि त्या शिशुपाला । मज देण्याचा निश्चय ठरला ।
बंधु खलचि परि तातहि फिरला । यत्न सकल हरला ॥ माझा ॥ १ ॥
विप्रमुखें परिसुनि सत्कीर्ति । मन्मनिं भरली तुमची मूर्ति ।
शशिमुख सुंदर नवघनकांती । कंठीं वनमाला ॥ विराजे ॥ २ ॥
सत्वर यावें या समयासी । पदरीं घ्यावी ही निजदासी ।
जगन्नाथकविवरवचनासी । मान्य करा विमला ॥ ३ ॥

वासवदत्ता—आरण्यके, तूं आतां फारच थकल्यासारखी दिसतेस.

दर्शिका—नाहीं बाईसाहेब, मला कांहीं इतके श्रम झाले नाहींत.

राजा—(दर्शिकेजवळ जाऊन)

पद (चाल—झडकरि पाव जगज्जननी०)

वदनीं घर्मबिंदु आले । इंद्रियगण कंपित झाले ।
नयनकमलजलबिंदु पडुनि हे झाले स्तन ओले ॥ ध्रु० ॥
अधर पावती स्फुरणाला । आला रक्तपणा गालां ।
नृपकन्ये श्रम तुज झाला । घे विश्रांति क्षणभरि
तरि वरि सुख विलसनशीले ॥ १ ॥

वासवदत्ता—(स्वगत)काय ? 'स्तन ओले झाले ?' आणि 'विलसनशीले, क्षणभर तरी तुला विश्रांति मिळूं दे' ? जशी काय मी तिला सगळा दिवस कामाला जुंपतें ! छे छे ! असला चावटपणा मला नाहीं खपणार. (उघड) महाराज!

पद (दादरा.)

स्थिति तुमची पाहुनि मज नवल वाटतें
हास्यास्पद कृत्य, परी हृदय दाटतें ॥ ध्रु० ॥
ही कन्या परक्याची येथ आणिली ।
सकल कलामंडित ही पूर्ण जाहली ।
भगिनीसम मानुनी मी जीस पाळिली ।
बघुनि तिला चित्त कसें मोह पावतें ? ॥ १ ॥

राजा—प्रिये, मीं असा अपराध तरी काय केला ?

वासवदत्ता—

पद (चाल—मोठा झंझावात०)

पाहुनी भूपा तव कृत्याला ।
क्रोधाग्नीचा भडका झाला ।
झालें कृत्या या समयाला ।
पूर्ण असें समजा । स्वमनीं ॥ १ ॥
धाडिन जेव्हां विपिनीं इजला ।
बांधुनि नेइन या अधमाला । (विदूषकास)
होइन तेव्हां शांत नृपाला ॥
पूर्ण असें समजा । स्वमनीं ॥ २ ॥

राजा—प्रिये,

पद (चाल—उभि जवळ खरी ती०)

कां व्यर्थ कोप हा केला ।
तूं सांग सखे गे मजला ॥ ध्रु० ॥
निंदिसी वृथा आह्मांला ।
अपराध कायसा घडला ॥
बघुनि हिची गान कुशलता ।
तैसी तववादनपटुता ।
भ्रम होय अशा समयाला ।
उद्गार सहज तो आला ॥ १ ॥

वासवदत्ता—पुरे पुरे ! तुमचीं सर्व ढोंगं मला समजून चुकलीं आहेत. (परिचारकांस) बांधा रे या ब्राह्मणाच्या मुसक्या आणि ठेवा नेऊन याला कारागृहांत. आणि विजयसेन! या कार्टीला, आपला वनप्रदेशांत जो बंगला आहे, त्यांत आतांच्या आतां नेऊन ठेवा. या दोघांची मी फिरून दृष्टादृष्टहि होऊं देणार नाहीं.

राजा—प्रियेः—

पद (चाल—गुरु दत्त निरंजन वनमो०)

या अकस्मित तुझ्या कोपानें । उद्भवतिल नाना व्यसनें ॥ ध्रु० ॥
ही नवयुवति ढाळित अश्रु विपिनीं राहिल कैशी ।
नृपतनयेची कोमलतनु या कृश होइल दुःखानें ॥ १ ॥
निराश्रितातें आश्रय देउनि जी आशा दाखविली ।
तद्भंगाचें अघोर पातक करिशी अविचारानें ॥ २ ॥

वासवदत्ता—होऊं द्या पातक. असल्या स्त्रीप्रतारणेच्या पातकापेक्षां हें पातक पुष्कळ चांगलं.

[जाऊं लागते.

राजा—(तिला अडवून)

पद (चाल-सुजनहो ! दया करा०)

प्रियतमे, क्षमा करीं क्षमा करीं ।
कांहिं दया मनिं धरीं ॥ ध्रु० ॥
सहज करानें प्रमाद घडला ।
कोपूं नको अंतरीं ॥ १ ॥
अपराधी मी पूर्ण असें, ही–।
निर्दोषा सुंदरी ॥ २ ॥

वासवदत्ता—क्षमेची आतां गोष्टच काढूं नका. (सेवकास) या ब्राह्मणाला आतांच शिक्षा केली पाहिजे. नसत्या उठाठेवी करून, नवराबायकोचं भांडण लाविलं असतां काय होतं, हें त्याला चांगलं समजलं पाहिजे. धरा, बांधा याच्या मुसक्या.

[जाते.

दोन सेवक—(विदूषकास धरितात) उठा, चला भटजी.

विदूषक—अरे बापरे ! कुठ्ची झक् मारली आणि या भानगडींत पडलों.

(सेवकांस) अरे, अंमळ थांबा शिंचानों, असे ओढतां काय ? (त्यांच्याशीं ओढाताण करितो) अरे, पण ओढतां कां? मीच आपला खुषीनें येतों ना ? अरे पागोट्याच्या पट्टया गळ्यांत आल्या त्या तरी वर करितों ! पहा ! कस्य केन संबंधः [तिघे जातात.

(विजयसेन प्रधान व इतर अनुचर जातात.)

दर्शिका—(राजास) महाराज ! आपण केवढा प्रमाद केला हा ! (रडूं लागते.)

राजा—(तिला आलिंगून) प्रियतमे, हा प्रमाद तुझ्या सौंदर्याचा ! पण तें सौंदर्य आतां वनवासी होऊन व्यर्थ जाणार ना ? दुष्टा मदनाः—

पद (चाल—नका करूं अविचार०)

तृषा तुझी अनिवार । अधमा ॥
अति दुःखद तूं, काळाहुनि तव-
कृतिचा जगिं या निंद्य प्रकार ॥ ध्रु० ॥
बुद्धि हिरावुनि बलही हरिसी ।
मूढा नसता भ्रम मनिं भरिसी ।
पापाचारचि आचरसी ।
मरसि न कां रे ठार ॥
अधमा तृषा तुझी अनिवार ॥ १ ॥

दर्शिका—महाराज !

पद (चाल—देस-दादरा.)

दीन मी अनाथ मी वनांत केविं राहूं ।
प्राणनाथ ! केविं हा वियोगताप साहूं ॥ ध्रु० ॥
हाय ! हाय ! दुर्दैवा कंठ चिरियला ।
नये दया दयाघना ! अजूनि कां तुला ।
वांचवा मला कुणी । पाठवूं नका वनीं ।
बघीन का पुन्हा कधीं पदाब्ज हे स्वलोचनीं ॥ १ ॥

राजा—प्रिये,

पद (चाल-दृष्टि भरे जलभारें०)

कृत्य न हें मज साजे। लाजे । मन माझें । जगिं राजे ।
नच भीति असे निजभाजे ॥ ध्रु० ॥

भीरुपणें मीं तुज अंतरलों ।
विफल होय मम कीर्ति जगीं जी गाजे ॥ १ ॥
भार्यांकित मज म्हणतिल जन ते ।
मानित होते वीर नरेश मला जे ॥ २ ॥

दर्शिका—महाराज, हे सगळे माझ्या दुर्दैवाचे खेळ आहेत. पण राजाधिराज, मज अभागिनीसाठीं आपण आपल्या कोमल मनास इतकं दुःख कां बरं करून घ्यावं ? मी आपली एक गरीब दासी होतें, इतकी आठवण आपण ठेविली ह्मणजे झालं, कारणः—

पद (चाल–मूर्तिमंत भीति०)

मूर्ति हीच मीं वरिली मम–मनोविनोदिनी ।
वाहिला कधींच काय पदसरोजसेवनीं ॥ ध्रु० ॥
प्राण घ्यावयास जरी तो कृतांत पातला ।
निश्चया न मोडितां, वरीन मी नराग्रणी ॥ १ ॥
विघ्न हें समुद्भवुनी लग्न तें नव्हे जरी ।
ब्रह्मचारिणी अशी करीन वास काननीं ॥ २ ॥

राजा—शाबास माझे लाडके ! पण तुझ्यावांचून या स्मशानवत् वाटणाऱ्या राजवाड्यांत मी आपला वेळ कसा घालवूं ?

दर्शिका—महाराज, आपल्या राणीसाहेब आहेत, दासदासी आहेत, प्रधानजी, विजयसेन, वसंतक इत्यादि अनुचर आहेत, त्यांच्या सान्निध्यांत आपला वेळ कसा तरी जाईल, पण मी अरण्यांत एकटी कशी राहूं ?

विजयसेन—(प्रवेश करून) महाराज, राणीसाहेबांचा हुकूम मला मोडतां येत नाहीं. अशा स्थितींत मी आतां काय करूं, तें आपणच मला सांगावें.

दर्शिका—विजयसेन, राणीसाहेबांच्या आज्ञेप्रमाणें वनवासी व्हावयास ही मी तयार आहें.

राजा—राजकन्ये, काय हें धैर्य तुझें ! विजयसेन, माझ्या या चमत्कारिक स्थितीबद्दल तुह्मांला हंसूं येत असेल, नाहीं ?

विजयसेन—महाराज, आलेली वेळ कशी तरी मारून नेली पाहिजे. सगळेच दिवस काय सारखे असतात ? दुःखामागून सुख आणि सुखामागून दुःख प्राप्त होणें, हा सृष्टिक्रमच आहे. आतां मी स्वतः मात्र पूर्ण दुर्दैवी खरा.

कारण, ज्या राजकन्येला तिच्या बापाचा वध करून मी येथें आणिली, तिला आज वनवासी करण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे!

दर्शिका—विजयसेन, आपल्या स्वामिनीची आज्ञा पाळणं हा सेवकाचा धर्मच होय. मग यांत तुमचा काय वरं अपराध ?

विजयसेन—नृपकन्ये, वनांत जावयाची तयारी करून मी इकडे आलों. आतां फक्त तुझ्या—

दर्शिका—असे अडखळूं नका. चला ही मी आलें.

विजयसेन—विंध्यकन्ये, मनोरमेलाहि तुझ्याबरोबर पाठविण्याचा राणीसाहेबांचा हुकूम झाला आहे.

दर्शिका—असो, तेवढं तरी दुःखांत सुख झालं म्हणावयाचं. वरं, आतां उशीर नको, राणीसाहेब रागावतील. (राजास हात जोडून) महाराज, या दासीला विसरूं नका वरं ?

[जातात.

राजा—हाय हाय ! गेली माझी प्रिया !

श्लोक.

हा दुष्टा मदना ! वृथाच छळिसी, गेली वनीं सुंदरी !
मी तीच्या विरहें अनंत दिन हे कंठूं कसे मंदिरीं ?
अन्यायाविण दंड होय, न चले माझेंहि राज्ञीपुढें,
भ्यावें स्त्रीपरि मीं तिला, गमतसे आश्चर्य हें केवढें ! १

[जातो.

[पडदा पडतो.]

अंक सहावा.

प्रवेश पहिला.

[**स्थल**-वनप्रदेशांतील बंगला. दर्शिका व मनोरमा प्रवेश करितात.]

दर्शिका—देवा !

पद (चाल-बघुनि उपवना०)

घोर भयंकर या कांतारीं राहुनियां दिननिशीं ।
विटलें मन हें, काय करावें विमुक्त होतें कशी ॥ ध्रु० ॥
नृपकन्या मी असतां, देवा वनवासी ही अशी ।
दिवस कंठितें आयुष्याचे, परि आशा मानसीं ॥
ती अशोकविपिनीं जेविं जानकी सती ।
रावणें ठेविली, चिंती रामाप्रती ।
मी तशी चिंतितें वत्सराज भूपती ॥
श्रीजगदंबे निजमायेनें तूं जग हें व्यापिसी ।
ही कन्या घे पदरीं आतां वत्सा धेनू जशी ॥ १ ॥

मनोरमा—पण आरण्यके, हा तरी महाराजांचा वेडेपणा नाहीं का ? त्यांनीं इतक्या माणसांसमक्ष तुला तसं बोलायचं नव्हतं. पडद्याआड व्हावयाच्या गोष्टी जर रंगभूमीवर होऊं लागल्या, तर कोणास बरं राग आल्याशिवाय राहील ? त्यांत आमच्या बाईसाहेब ह्मणजे तर काय, प्रत्यक्ष चंडिकेचा अवतार !

दर्शिका—हा महाराजांचा वेडेपणा नव्हे किंवा राणीचा रागहि नव्हे; हें माझं स्वतःचं दुर्दैव, दुसरं कांहीं नाहीं.

मनोरमा—पण आरण्यके, माझ्या सहवासानं तुला इथें अंमळ तरी बरं वाटतं कीं नाहीं ?

दर्शिका—सखे, तुझ्याशीं बोलण्याचालण्यांत माझा वेळ फार आनंदानं जातो. राणीसाहेबांनीं तुझ्यासारखी चतुर आणि रसिक सोबतीण मला दिली, हें मी माझं मोठं भाग्य समजतें. बरं मनोरमे, आज किती दिवस विचारीन विचारीन ह्मणतें पण मेली आठवणच होत नाहीं; तुमचे महाराज राणीला जे इतके भिऊन वागतात ते कां ?

मनोरमा—पहिल्यापासूनच अतिप्रितीमुळं महाराजांनीं त्यांनां वाटेल तसं वागूं दिलं, आणि शेवटीं त्याचा हा असा परिणाम झाला.

(एक दूत प्रवेश करितो.)

दूत—मनोरमे, मी तुला नगरांत नेण्यासाठीं आलों आहें. राणीसाहेबांची तुला अशी आज्ञा आहे, कीं, आपणांस भेटून लागलेंच परत इकडे यावें. विंध्यकन्ये, राणीसाहेबांनीं तुला आपला आशीर्वाद सांगितला आहे.

दर्शिका—व्यतिपाता, तुमचे महाराज सुखरूप आहेत ना ?

दूत—सुखरूप आहेत राजकन्ये. रागाच्या आवेशांत राणीसाहेबांनीं आपणाला वनांत पाठविलें खरें, परंतु आतां त्या गोष्टीचा त्यांनां फार पश्चात्ताप झाल्यासारखा दिसतो. तरी पण, काय कारण असेल तें असो, तुह्मांस नगरांत नेण्याची बुद्धि त्यांनां अद्याप होत नाहीं.

मनोरमा—व्यतिपाता, चल माझी तयारी आहे. गडे, आरण्यके, मी जाऊन येतें बरें.

दूत—चल, तुला कशी हां हां ह्मणतां नगरांत घेऊन जातों.

[जातात.

दर्शिका—वासवदत्तेला पश्चात्ताप झाला आहे ? झाला असेल कदाचित्. तिचा स्वभाव जरी तापट आहे तरी हृदय अगदीं कोमल आहे. महाराजांनीं माझा हात धरला त्या वेळीं ती इतकी रागावली होती तरी ती मला रागाचा एक शब्दहि बोलली नाहीं. (ऐकल्यासारखें करून) अगबाई ! हें काय आश्चर्य आहे ! हा कर्णमधुर स्वर कुणीकडून येतो ?

(एक बालमुनि प्रवेश करितो.)

दर्शिका—अहाहा काय मनोहर ध्यान हें !

पद (चाल—जोगी-दीपचंदी.)

मुनिवरदर्शन घडलें । आज जगीं या पावन झालें ॥
शिरीं जटांचा भार विराजे । दंडकमंडलु करिं हा साजे ॥ १ ॥
नामस्मरणीं रमली वाणी । असतिल मोठे ऋषिवर कोणी ॥ २ ॥

मुनिराज, मी आपणांस वंदन करितें.

मुनि—

श्लोक.

तुझ्या शुभमनोरथांस परिपूर्णता द्यावया ।
समर्थ गिरिजापती शिव सदैव ठेवो दया ॥
सुशील नृपकन्यका विनयशालिनी सुंदरी ।
सदा नृपसमागमीं विहरशील तूं मंदिरीं ॥ १ ॥

दर्शिका—(हात जोडून) या आपल्या आशीर्वादानं मी पावन झालें. मुनिराज, आपण अशा यौवनावस्थेंत इतके विरक्त कसे झालां ?

मुनि—बाळे,

पद (चाल-पार्थासाठीं शंकर कपटी०)

या संसारीं सौख्य कशाचें; हें जग मायेनें भरलें ।
दृश्य असे तें नश्वर सारें हें मत माझ्या मनिं ठसलें ॥ ध्रु० ॥
ज्या ईशानें इच्छामात्रें निर्मियलें हें जग सारें ।
सूत्र धरोनी केवळ हातीं खेळत लीला परभारें ।
महातपस्वी साधक योगी सेविति ज्यास्तव कांतारें ।
गुरुप्रसादें लाभ तयाचा होतां मन शांतचि झालें ॥ १ ॥

दर्शिका—खरं मुनिमहाराज, या जगांत मनुष्यमात्रास सुखाच्या कोटीपट दुःखच भोगावं लागतं; नको हा संसार आणि नको तें लग्न. आपला सदुपदेश ग्रहण करून योगिनी होऊन रहावं हें चांगलं, असं मला वाटतं.

मुनि—पण बाळे, विधिलिखिताप्रमाणें ह्या सर्व गोष्टी घडावयाच्याच. त्या जर आम्हां मानवांच्या इच्छेवरच अवलंबून असत्या तर आज जें हें सर्व जग मला उदास आणि नाशवंत दिसत आहे तें केवळ आनंदमय आणि चिरकालिक असें दिसलें असतें. असो; माझा गुरुदर्शनसमय समीप आला, यास्तव मी जातों. आजपासून सातव्या दिवशीं तुझे मनोरथ पूर्ण होतील.

दर्शिका—(नमस्कार करिते.)

[दोघेंहि निघून जातात.

प्रवेश दुसरा.

[राजा प्रवेश करितो.]

राजा—अरे निर्दया मदना,

पद (देस, धमार.)

तापा देसि कां व्यर्थ मजला । ध्रु० ॥
विषम तव करणिला ।
यश नये रे खला ।
दैवयोगें वनीं पडलि ती कोमला ।
भेटिचा मज तिच्या मार्ग नुरला ॥ १ ॥

शिवाय, अशा या विपत्कालीं आपल्या अद्वितीय वाक्पांडित्यानें माझी घटकाभर करमणूक करणारा माझा मित्र वसंतक, तोहि बिचारा विनाकारण कारागृहांत पडला ! असें असतां:—

पद (चाल–कोणता वदरे०)

कासया छळिसी नीचा व्यर्थ सांग मातें ।
होउनियां स्मृति सुंदरिची दुःख मात्र होतें ॥
प्रेम तिचें देहीं माझ्या व्यापुनी असे तें ।
नष्ट कसें व्हावें आतां, यत्न काय त्यातें ॥ १ ॥

विजयसेन—(प्रवेश करून)–महाराजांचा जयजयकार असो! महाराज, आपण आतां पूर्वस्थितीवर येणार तरी केव्हां?

राजा—काय सांगूं विजयसेन ! मी एवढा मोठा सार्वभौम राजा, तुमच्या सारखे शूरवर्य माझे सेनापति, वासवदत्तेसारखी राणी, वसंतक ब्राह्मणासारखा प्रियमित्र आणि या भव्य आणि परम शोभायमान प्रासादांत माझा वास, परंतु त्या राजकन्येच्या अभावामुळें हें सर्व वैभव मला शून्य वाटत आहे !

पद (चाल–धनाश्री–धुमाळी.)

पद्माविण तें काय सरोवर, मधुर जलानें जरि भरलें ।
करिवर होतां मदविरहित तो, तेज तयाचें का उरलें ॥ ध्रु० ॥
पूर्ण शशीविण काय शर्वरी, वेग नसे ज्या तुरगाला ।
शील नसोनी प्रमदा जैशी, विरहित वसुधा भूपाला ॥ १ ॥
पंडित नसतां काय सभा ती, उत्सव नसतां मंदिर कीं ।
प्रसाद नसतां काव्य कशाचें, सत्पुत्राविण कुल लोकीं ॥ २ ॥

तसें माझें मंदिर विजया, विविध सुखांनीं युक्त जरी ।
असलें तरि तें मजला गमतें प्रमदेविण त्या शून्य परी ॥ ३ ॥

विजयसेन—(स्वगत)एकंदरींत त्या सुंदरीच्या पुनर्दर्शनाशिवाय आमचे महाराज कांहीं पूर्वस्थितीवर येत नाहींत. राणीसाहेबांनीं रागाच्या आवेशांत तिला अरण्यांत पाठविलें खरें, पण त्यामुळें हा मोठाच अनर्थ उद्भवला ह्मणावयाचा ! आणि तिकडे त्या सकुमार राजकन्येची प्रियविरहानें काय अवस्था झाली असेल कोण जाणे !

(वासवदत्ता प्रवेश करिते.)

वासवदत्ता—काय ? महाराजांची किती शोचनीय स्थिति झाली ही ! देवा ! आपल्या प्रियपतीस दुःख देण्याची दुर्बुद्धि त्या वेळीं मला कुठून सुचली ! महाराज, आतां या दासीला क्षमा नाहीं का करावयाची ?

राजा—मी तुला क्षमा करूं ? त्या वेळीं मीं तुझी इतकी विनवणी केली, तुला हात जोडले, तरी तूं कुठें मला क्षमा केली नाहींस ती ?

पद (शंकराभरण–झंपा.)

तुझा क्रोध अनिवार हा फार कांते ।
त्यामुळें सहचरां दुःख होतें ॥ ध्रु० ॥
निष्कलंका पहा विंध्यनृपकन्यका ।
धाडिली काननीं काय ह्मणुनी ? ॥
खचित अविचार हा ज्ञानशून्यापरी ।
आदरीला दिसे स्पष्ट मातें ॥ १ ॥

वासवदत्ता—प्राणनाथ, माझ्या हातून अपराध घडला खरा.

राजा—पण आतां तरी एवढी कृपा करशील तर फार चांगलें होईल. त्या बिचाऱ्या वसंतक ब्राह्मणाचा या कामांत काय अपराध होता वरें ? तूं त्याला निष्कारण बंदींत टाकलेंस.

वासवदत्ता—बरं तर, मी त्याला आतांच बंधमुक्त करतें, मग झालं कीं नाहीं ?

राजा—पहिल्यानें एवढें तरी कर. तो जवळ नसल्यामुळें मला दुप्पट उदासीनता वाटत आहे.

वासवदत्ता—बरें तर, ही मी आतांच जाऊन त्याला बंधमुक्त करितें.

[जाते.

(एक सेवक प्रवेश करितो.)

सेवक—महाराजांचा जयजयकार असो. महाराज, बाहेर दोन ऋषिकुमार आले आहेत.

राजा—अरे, जा तर त्यांनां लवकर इकडे घेऊन ये. विजयसेन, तुह्मी स्वतः जाऊन त्यांनां घेऊन या.

विजयसेन—आज्ञा महाराज.

[जातो.

राजा—हे ऋषिकुमार कां बरें आले असावेत ?

(विजयसेन व दोन ऋषिकुमार प्रवेश करितात)

राजा—यावें मुनिवर्य. हा दासानुदास आपल्या चरणीं लीन होत आहे.

ऋषिकुमार—राजा, तुझे मनोरथ पूर्ण होवोत !

पहिला ऋषिकुमार—

पद (अलैयाबिलावल–झंपा.)

यज्ञयागादि तें पुण्यबल राहिलें ।
राक्षसीं त्रासिलें फार भूपा ॥
समरधीरोत्तमा, धाव रे ! झडकरी ।
तुजविणें वारिता कोण तापा ॥
कसा भूप तूं भोगिशी सदनिं विषया ।
हृदयिं वागे कशी लवहि न दया ॥ १ ॥

दुसरा ऋषिकुमार—

पद (चाल–सदर.)

काय तुज सांगुं खल ताप जो देति तो ।
राक्षसीं जाळिले उटज नृपते ॥
प्रियतमा धेनुका हरण केल्या तिहीं ।
मोडिले तोडिले पुष्पतरु ते ॥
नको बोलणें सांगणें धांव आतां ।
होइं परिणामिं तरि सौख्यदाता ॥ ध्रु० ॥

राजा—मुनिवर्य, आपण स्वस्थ व्हावें:—

पद (मुनिच्या तपा०)

दनुजांचा वध मी करितों । सिद्ध करोनि दल येतों ।
रजनीचर ते वसती कोठें भूमंडळिं बघतों ॥ १ ॥
उदयनकुलिंचा मी राजा । खल नेणति विक्रम माझा ।
मुनि हो, तुह्मी सदना जा । सकल अधम ते रक्तप
या मम धनुषा बलि देतों ॥ २ ॥

विजयसेन (स्वगत)—वा ! फार चांगली गोष्ट झाली ! प्रियाविरहानें लोपून गेलेलें आमच्या महाराजांचें तेज आज सहज प्रकट झालें.

राजा—मुनिराजः—

दिंडी.

वचन सांगा हें धौम्य मुनिवरांतें ।
वृत्त आह्मीं कळविलें भूपतीतें
सिद्ध सेना करुनि तो येत आहे ।
दनुजदमनाविण स्वस्थ कधीं नोहे ॥ १ ॥

ऋषिकुमार—राजा, आह्मी येतों तर आतां.

राजा—(नमस्कार करितो.)

ऋषिकुमार—कल्याणमस्तु !

[जातात.

राजा—विजयसेन, सर्व सैन्याची उत्तम व्यवस्था ठेवून, उद्यां पहांटेस येथून कूच करण्याची तयारी करा. अशा कामीं उपेक्षा केल्यास आपल्यावर महामुनीचा क्षोभ होईल, हें लक्ष्यांत ठेवा.

[जातो.

विजयसेन—मनुष्याच्या अंगांत एखादा गुण आधिक्यानें वास करूं लागला, ह्मणजे त्यापासून त्याला सौख्य व्हावयाचें एकीकडेसच राहून उलट दुःख मात्र भोगावें लागतें. ही माझीच स्थिति पहा ! मी त्या विंध्यकेतूला मारून येथें आलों नाहीं तोंच महाराजांनीं मला त्या दुष्ट कलिंगावर पाठविलें ! त्यालाहि यमसदनीं पाठवून आलों व आतां तरी कांहीं दिवस विश्रांति मिळेल अशी आशा बाळगून होतों, तोंच आज हा दैत्यांवर जाण्याचा

प्रसंग येऊन ठेपला ! वास्तविक पाहतां माझ्या सारख्या शूरानें, असले उद्गार काढणें ह्मणजे मोठ्या लज्जेची गोष्ट होय, परंतु प्रसंगानुसार असेहि उद्गार तोंडांतून बाहेर पडतात, त्यास उपाय नाहीं, असो. आतां जाऊन सर्व सैनिकांस तयार राहण्याचा हूकूम द्यावा.

[जातो.

प्रवेश तिसरा.

विदूषक—(उड्या मारित प्रवेश करितो.)—मोठ्या नशीबानें सुटलों ह्मणावयाचा ! वास्तविक पाहतां, अपराध एकाचा आणि शिक्षा होते भलत्यालाच ! या वासवदत्तेची आपली सगळीच झोटिंगपाच्छाई ! असो. त्या सजीव यमपुरींतून आपली तर एकदांची सुरक्षितपणें सुटका झाली, याबद्दल वासवदत्तेचे मोठे उपकार मानिले पाहिजेत. आतां यापुढें मात्र असल्या लग्नाच्या भानगडींत मध्यस्थी करावयाची नाहीं, हा अगदीं कृतनिश्चय ! भीष्मप्रतिज्ञा कां ह्मणाना ? विकतें शहाणपण चांगलें असें ह्मणतात, त्याचा अस्मादिकांस आज लाभ झाला ह्मणावयाचा ! पण, आज वाड्यांत आणि नगरांत, काय थाट उडून गेला आहे हा ! सैनिक जन तर आज काय हरभऱ्याच्या झाडावर चढूं लागले आहेत ! मी इकडे येत असतां वाटेंत माझी एकानें निष्कारण कुटाळकी केली ! त्याच्या हातांत नागवी तलवार होती, मग आमची स्वारी बोलतेच कशाला ? होय, अशा उन्मत्ताशीं लागून आपणही उन्मत्त व्हावें असेंच कीं नाहीं ? (पडद्यांत पाहून) अरररर !

कटाव

जिकडे तिकडे गर्दि उसळली । मौज आम्हि ती सारि पाहिली । थाट नृपाचा भाट वर्णिती । काठेवाडी खंदे घोडे । धिप्पाड वरी स्वार बैसले । शृंगारुनि रथ सुंदर केले । हत्ती करिती मस्ती वरती महात बसुनि अंकुश मारुनि पुढें वळविती । हातीं शस्त्रें लख लख करिती । लख्लखाट चकूचकाट अवघा । पाहुनि डोळे हे दिपताती । राक्षस शिंच्चे नकळे आतां । तपोवनीं त्या कैसे जगती । अगडूबंब मुनिराज कंदमुळ सेवन करुनी तप आचरती । दानव हे बट्किचे तयांनां

उगाच तेथें दुःखें देती। त्या दुष्टांचा नाश कराया। जातो हा वत्सराज नृपती। जावें संगें मजही वाटे। परी रानिंचे लागुनि कांटे। जेथें देह सर्व हा फाटे। प्राण येउनी कंठीं दाटे। निजावयाची सोय नसे बरि। तंबु ठोकुनी सरदारांच्या झुंडी पडती। सर्व शिपाई झाडांखालीं जाउनि निजती। दों दिवसांनीं जेवण करिती। ऐशी होइल तेथ फजीती। परि विचार घेउनि भूपतिचा॥ बेत करावा मग जाण्याचा॥ ध्रु०॥

अरे वाः! ही वासवदत्ता सुद्धां नटून थटून राजाबरोबर जाण्यास निघाली! तर मग आतां आह्मांलाहि गेलेंच पाहिजे.

[जातो.

[पडदा पडतो.]

अंक सातवा.

प्रवेश पहिला.

[**स्थल**–तपोवनांतील आश्रम–दृढवर्मा, धौम्य, वसुभूति प्रवेश करितात.]

दृढवर्मा—

पद (कानडा–त्रिवट.)

सार्थक नच झालें । माझे । मनिंचे हेतू व्यर्थचि गेले ॥ ध्रु० ॥
राज्यधनादिक जाउनि विलया । अंतरली मज ती प्रियतनया ।
वृद्धपणानें बहु शिणलों या । असशिल कोठें मत्प्रिय बाले ! ॥ १ ॥

हाय हाय ! लहान वय ! ! देवानें राजकन्या केल्यामुळें श्रमाची संवय नाहीं ! अशा स्थितींत, माझे लाडके प्रियदर्शिके, तुझी काय अवस्था झाली असेल ?

वसुभूति—महाराज, हा परमेश्वराच्या घरचा खेळ आहे ! तो जगत्सूत्रधारी आपणांस ज्या स्थितींत ठेवील, त्या स्थितींत आनंद मानून राहणें हें मनुष्य-मात्राचें कर्तव्य होय.

दृढवर्मा—प्रधानजी, अशा या विपत्तींत राहून निरंतर दुःखावस्थेंत दिवस काढण्यापेक्षां—

पद (**चाल**—मजवरि हें आलें०)

मरण जरी येतें । फार सुखावह । या समयीं होतें ॥
दुःख नको हें, सहन कराया । शक्ति न उरली या देहातें ॥ १ ॥
सागर दुःखाचा । बोलति भव हा । अनुभव ये त्याचा ।
दशनहीन मुख, बधिर जाहले कर्ण, अंधता ये नेत्रांतें ॥ २ ॥
इच्छा शेवटची । पाहिन तनया । नयनीं ही साची ।
परि होइल ती पूर्ण कधीं तरि संभव ऐसा न दिसे मातें ॥ ३ ॥

धौम्य—हे प्रापंचिक किती अधाशी आहेत पहा ! हा बेटा मरणाची अपेक्षा करितो, परंतु कन्या पाहीन आणि मग मरेन म्हणतो ! एकंदरींत, यामुळें सत्पुरुषांच्या वचनास पुष्टीच येते. ते प्राप्रंचिकांचें असें वर्णन करितातः—

साकी.

गलित देह शिर पलितचि झालें दशनहीनता आली ।
यमराजहि ये सन्निध, परि तन्मनिंची आशा गेली ।
ऐसें कधिं न घडे । प्राणी दुःखाब्धींत बुडे ॥ १ ॥

(दृढवर्म्यास) राजा, मी तुला किती वेळां सांगितलें, कीं—

पद (चाल—स्वामी न्यावें आम्हासी०)

इच्छा होइल पूर्ण तुझी ।
वाणी ही माझी ॥ ध्रु० ॥
राज्यधनादिक मिळेल सारें ।
सत्य समज बा रे ॥ १ ॥
ती तवतनया विपिनीं वसते ।
मज ऐसें गमतें ॥ २ ॥
दिवस सुखाचे सन्निध आले ।
दुःख लया गेलें ॥ ३ ॥

दृढवर्मा—गुरुराज याच आपल्या आश्वासनावर विश्वास ठेवून, मी या तपोवनांत आनंदानें वास करीत आहें. आपलें वचन ज्या दिवशीं सत्य होईल तो सुदिन!

धौम्य—तुझे मनोरथ पुरविणारा गौरीश समर्थ आहे !

(मागील दोघे ऋषिकुमार प्रवेश करितात.)

ऋषिकुमार—गुरुजी, वंदन करितों.

धौम्य—बालकांनो, सुखी असा.

१ ला ऋषिकुमार—गुरुजी, आपला आदेश आह्मी राजाला कळवून आलों.

धौम्य—मग तो काय ह्मणाला ?

२ रा ऋषिकुमार—गुरुमहाराज, आपला आदेश ऐकतांच तो वीरश्रीनें अगदीं वेडावून गेला. आज उद्यां इतक्यांत तो सकल दलभारासह इकडे येणार आहे. आपण अगदीं स्वस्थ असावें, अशी त्याची विनंति आहे.

धौम्य—अरे, तो वत्सराज ह्मणजे या लोकींचा केवळ पुरंदर आहे.

१ ला ऋषिकुमार—सत्य गोष्ट गुरुजी !

पद (चाल–शाममुसें खेल न होरी०)

स्वर्गीं इंद्र जसा तो । नृप या लोकीं मजला गमतो ॥ ध्रु० ॥
काय तयाचें रूप मनोहर । केवळ दुसरा कुसुमायुधधर ।
या लोकीं अवतरला । दक्षपणें जनपालन करितो ॥ १ ॥

२ रा ऋषिकुमार—

(चाल–सदर.)

समुद्रवलयांकित ही भूमी ।
रमली ज्याच्या गुणगणधामीं ।
ज्ञाता शूरपणाचा ।
कीं विनयाचा रत्नाकर तो ॥ २ ॥

धौम्य—अरे, मोठमोठे कविवर्य ज्याच्या चरितवर्णनानें थकून गेले, त्या वत्सराजाचा पराक्रम काय सांगावा ?

दृढवर्मा—गुरुराज, त्या वत्सराजाला आपली प्रियदर्शिका अर्पण करून मी त्याला आपला जामात करणार होतों, परंतु दुर्दैवानें ही माझी इच्छा पूर्ण होऊं दिली नाहीं !

धौम्य—राजा, तुझ्या इच्छेप्रमाणें तुला वत्सराजच जामात मिळेल, समजलास ? थोडे दिवस दम धर. (शिष्यांस) बाळांनों, प्रातःस्नानाचा समय झाला, नाहीं वरें ?

ऋषिकुमार—होय गुरुजी.

धौम्य—मग चला तर मंदाकिनीवर.

[जातात.

प्रवेश दुसरा.

[दर्शिका व मनोरमा प्रवेश करितात.]

मनोरमा—आमचे महाराज, विजयसेन इत्यादि मंडळी सध्यां तपोवनांतील ऋषींनां त्रास देणाऱ्या राक्षसांचा संहार करावयास गेली आहे. आमच्या राणीसाहेबहि महाराजांबरोबर तपोवनांत गेल्या आहेत.

दर्शिका—पण आपल्या स्थितींत तर कांहीं पालट होत नाहीं ना ?

मनोरमा—विजयसेन सेनापतींच्या बोलण्यावरून मला तर बाई असं वाटतं, कीं, आमचं हें नष्टचर्य लवकरच संपेल.

दर्शिका—विजयसेन सेनापति काय ह्मणत होते ?

मनोरमा—ते ह्मणाले कीं, महाराजांस राणीसाहेबांच्या रागीट स्वभावाचा फार राग आला असून, ते आतां लवकरच सर्व कांहीं आपल्या मनासारखं करणार आहेत. ते राणीसाहेबांस एकदां रागं भरलेसुद्धां, व त्यामुळंच त्या विचाऱ्या वसंतक ब्राह्मणाची कारागृहांतून मुक्तता झाली.

दर्शिका—असो, तो तरी विचारा सुटला, हें फार चांगलं झालं. बरं गडे मनोरमे, माझं जसं महाराजांवर प्रेम जडलं आहे, तसं तुझंहि विजयसेन सेनापतींवर जडलं आहे, खरं ना ?

मनोरमा—असेल जडलं ! त्यांत एवढं महत्त्वाचं तें काय आहे ?

दर्शिका—अग अशी लाजूं नकोस बाई. खरं सांग काय आहे तें.

मनोरमा—तूं ह्मणतेस तसंच अगदीं; शिवाय महाराजांससुद्धां ही गोष्ट ठाऊक आहे, असं सेनापतिसाहेब ह्मणत होते.

दर्शिका—ठीक ठीक ! सेनापतीसाहेब असं का ह्मणत होते ? असो. एकंदरींत आह्मी दोघीहि समदुःखीच आहोंत ह्मणावयाच्या. देव आमचे मनोरथ कधीं पूर्ण करतो, पहावें; नाहीं तर आह्मी योजावं एक आणि घडून यावं भलतंच ! गडे मनोरमे, मी तर या बाबतींत अगदींच निराश झालें आहें, कारण तूंच पहाः—

पद (चाल–भैरवी–त्रिवट.)

लोभ कशास धरावा । सखये मी । ध्रु० ॥
बालपणीं मज प्रियजननीचा । काय वियोग घडावा ॥ १ ॥
वृद्ध सुमंतांसह दुःखानें । वास वनांत असावा ॥ २ ॥
विंध्यपुरीं मी नच गेलें तों । भूप कशास मरावा ॥ ३ ॥

मनोरमा—गडे आरण्यके, त्या हरिणशिशूच्या पुढें चारा नाहीं ह्मणून तो ओरडत असेल ग ! चल बाई, त्याला सोडून त्याच्या आईबरोबर पाठवूं.

दर्शिका—चल बाई, बरी आठवण झाली ?

[जातात.

प्रवेश तिसरा.

[राजा व विदूषक प्रवेश करितात.]

राजा—अहाहा ! काय रम्य प्रदेश हा ! !

पद (चाल—रामराय राज्याचा स्वामी०)

हिमालयाची ही प्रियकन्या माता मंदाकिनी ॥
येथुनि वाहे मधुर जलानें युक्त सदा पावनी ॥ ध्रु० ॥
फलवृक्षांचे कदंब बघ हे जिकडे तिकडे वनीं ।
यच्छायेसी उटज बांधिले श्रेष्ठ अशा मुनिजनीं ॥
बकुल केतकी पुष्पविटप हे फुलले बघ लोचनीं ।
परिमळ त्यांचा मोहित करितो या मधुपांलागुनी ॥
हे मुनिवर येथें ध्यान धरुनि बैसले ।
हे वेदाध्ययनीं शिष्य पहा रंगले ।
हे कामधेनुचे वत्स इथें बांधिले ।
हरिणशिशू हे उड्या मारिती जननींच्या मागुनी ।
तपोवनें हीं ऋषिवर्यांचीं सकल सुखांच्या खनी ॥ १ ॥

विदूषक—येथें तर बुवा सर्वत्र शांतता दिसते ! क्रोध, भय, काम इत्यादि दुष्ट मनोविकारांचा या ठिकाणीं मागमूसहि नसावा असें वाटतें.

राजा—खरें बोललास गड्याः—

पद (चाल—सुवर्णकेतकीपरि०)

मंदाकिनीचीं मधुरूप जलें प्राशन करुनी हे शमले ।
हिमालयाच्या शीतल वातें शांतहृदय हे मुनि झाले ॥ ध्रु० ॥
उग्रतपाच्या सिद्धिबलानें षड्रिपुगण जिंकुनि नेले ।
ब्रह्मस्थापनवादविवादा सदैव करितां हे थकले ॥ १ ॥
अथवा ब्रह्मस्वरूप बनुनि सत्चित्सुखघनपदिं रमले ।
वेदाध्ययनापुढती लौकिक सुख यांनीं तुच्छचि गणिलें ॥ २ ॥

विदूषक—मित्रा, मला तर, हे ऋषिराज अगदीं नेभळे आणि भित्रे असावेत असें वाटतें. कारण, त्यांच्या अंगीं जर तपःसिद्धीचें खरें सामर्थ्य असतें, तर

राक्षसांचा संहार करण्याविषयींचें रडगाणें तुजकडे येऊन गाण्याचें त्यांस कारणच पडलें नसतें !

राजा—वेडा आहेस तूं. अरे ज्या मुनिवर्यांचे सर्व मनोविकार त्यांच्या अगदीं अंकित झाले आहेत, ज्यांनीं हा मायामय संसृतिपाश तोडून टाकून अशा पुण्यस्थानीं वास्तव्य केलें, त्यांचें बल कमी असेल असें तुला वाटतें तरी कसें ? तथापि मुनिजनांच्या यज्ञयागांत येणारीं विघ्नें दूर करून त्यांनां निर्भय करणें हें आह्मां क्षत्रियांचें कर्तव्य आहे व ह्मणूनच राक्षससंहाराचें काम त्यांनीं मजकडे सोंपविलें. वास्तविक पाहतां, हे ऋषि इतके तपोबलसंपन्न आहेत, कीं, एका शब्दानें ते तुझें, माझें आणि सर्व जगाचें भस्म करून टाकितील !

विदूषक—अरे बापरे ! तर मग बुवा त्यांनां आपला दुरूनच नमस्कार असो ! [जाऊं लागतो.

राजा—अरे वेड्या, असा भितोस कां ? ते जरी इतके तेजस्वी आहेत, तरी आमच्या सारख्यांशीं ते प्रेमानेंच वागतात. चल, आपण त्यांचें दर्शन घेऊन त्यांचा आशीर्वाद घेऊंया. (पडद्यांत बोट दाखवून) हे पहा समोरच धौम्य महामुनि वसले आहेत, हे तरी तुझ्या ओळखीचे आहेतना ? चल तर मग. [जातात.

प्रवेश चौथा.

[धौम्य, दृढवर्मा, वसुभूति वसले आहेत असा प्रवेश.]

ऋषिकुमार—(प्रवेश करून)

पद (चाल—वायुनंदन रदन करकर०)

नृपतिमंडन करित दंडन अजि निकंदन दानवांचें ।
किमपि मंद न सणणणणणण करिति शरगण भूपतीचे ॥
प्रबल खलबल करुनि अललल सकल हतबल जाहलें तें ।
बघुनि सुरवर ह्मणति हरहर गगनिं थरथर कांपती ते ॥

गुरुजी, आज राक्षसांचा प्रलयकाळ सन्निध आला आहे असें मला वाटतें. आश्रमाच्या आसमंतात् भागीं जिकडे तिकडे रक्त आणि राक्षसांचीं अक्राळ विक्राळ प्रेतें दृष्टीस पडतात !

धौम्य—हा मानवदानवांचा समरचमत्कार फार प्रेक्षणीय झाला असेल यांत संशय नाहीं.

वसुभूति—मुनिराज, ज्या वत्सराजाच्या सेनापतीनें विंध्यकेतूसारख्या महाशूर पुरुषाला आणि कलिंग राजासारख्या प्रतिघटोत्कचाला यमसदनीं पाठविलें, त्या राजापुढें या दुष्ट तामसी राक्षसांचें काय चालणार ?

(राजा व विदूषक प्रवेश करितात.)

राजा—मुनिराज, मी आपणास प्रणाम करितों.

विदूषक—नमस्कार मुनिराज !

धौम्य—राजा,

श्लोक.

शोभे कंठ यदीय नीलगरलें वाहे शिरीं जान्हवी ।
भालीं चंद्रकला त्रिशूल धरितो शंखास जो वाजवी ॥
वामांकीं बसली षडास्यजननी श्रीदक्षजा पार्वती ।
तो पंचानन सांब सौख्य तुजला देवो सदा भूपती ॥ १ ॥

वसंतका, तुझें कुशल आहे ना ?

विदूषक—होय, मुनिवर्य. ह्या आमच्या राजश्रीचें कुशल असलें, कीं, त्यांत आमचेंहि कुशल आलेंच ह्मणावयाचें.

राजा—मुनिराज, आज्ञेप्रमाणें राक्षसांचा संहार करून हा आतांच मी आपलें धनुष्य खालीं ठेवीत आहें. माझ्या सेवेनें आपलीं विघ्नें दूर झालीं ना ?

धौम्य—

पद (चाल–नोहे नारी ही चंचल०)

मज सांग नवल रे ! यांत कशाचें । फल तव सुयशाचें ।
अति दुष्ट निशाचर हे या वनिंचे । तमोरूप साचे ॥
शरभार तुझे ते किरण रवीचे । काय पुढें त्यांचे ॥
प्रखर विमल त्या तेजापुढती । टिकतील थवे त्या अधमांचे ॥ १ ॥

राजा—ही सर्व आपली कृपा आहे. बरें गुरुवर्य, हे वृद्ध पुरुष कोण आहेत ?

दृढवर्मा—बाळा वत्सा, तूं मला ओळखिलें नाहींस ? राज्यहीन झाल्यामुळें माझ्या स्थितींत इतकें अंतर पडलें काय ?

राजा—(ओळखून) दृढवर्मा महाराज ! मी आपणांस अभिवंदन करितों.

दृढवर्मा—बालका, सुखी हो !

(वासवदत्ता प्रवेश करिते.)

ही प्रद्योतकन्यका वासवदत्ता, तुझी धर्मपत्नी ना ?

राजा—होय महाराज (वासवदत्तेस) प्रिये, या मुनिराजांस वंदन कर.

वासवदत्ता—ऋषिराज, वंदन करितें.

धौम्य—अष्टपुत्रा सौभाग्यवती भव !

राजा—प्रिये, हे दृढवर्मा महाराज बरें.

वासवदत्ता—(दृढवर्म्यास) बाबा, माझी मावशी कोठें आहे ?

दृढवर्मा—बाळे, ती पिंगलक ऋषींच्या आश्रमास गेली आहे, एक दोन दिवसांत परत येईल.

राजा—महाराज, ज्या अधम कलिंगानें, आपण आपली कन्या मला द्यावयाची केली ह्मणून, आपल्यावर स्वारी करून आपलें सर्वस्व हरण केलें, त्याचा वध करून माझ्या सेनापतींनीं त्याचें राज्य आमच्या राज्यास जोडिलें आहे. आपली चंपावतीहि सध्यां आमच्याच ताब्यांत आहे. कलिंगाचा समाचार घेतल्यावर आह्मीं आपला पुष्कळ शोध केला, परंतु कांहीं पत्ता लागला नाहीं. असो, आतां आपण आपल्या राज्याचा सुखानें उपभोग घ्यावा.

दृढवर्मा—राजा, हे तुझे मजवर मोठे उपकार आहेत. परंतु या सर्व अनर्थाला मूळ कारण जी माझी लाडकी प्रियदर्शिका, ती सध्यां कोठें आहे, हें कांहींच समजत नाहीं. तिच्या विरहानेंच ही माझी अशी अवस्था झाली ! तुझ्यासारखा रूपगुणसंपन्न जामात लाभण्यास तरी सुदैव पाहिजे ना ?

(विजयसेन प्रवेश करितो)

राजा—विजयसेन! तुह्मी विंध्यकेतूचा वध करून कौशाम्बीस आलां, त्या वेळीं जी राजकन्या तुह्मी बरोबर आणिली, ती विंध्यकन्याच आहे, हें तुह्मांस कसें समजलें ?

विजयसेन—ती विंध्यकेतूच्या वाड्यांत मला सांपडली व आपण विंध्यकन्याच आहें असें तीहि ह्मणाली.

विदूषक—यांत कांहीं तरी गौडबंगाल असलें पाहिजे, यांत संशय नाहीं.

वासवदत्ता—आतां सर्व उलगडा झाला ! शिव ! शिव !

पद (चाल– मज बोध करीं०)

दुर्दैवा ! प्रियभगिनी व्यर्थ छळियली ।
क्रोधवशा होउनि सत्कीर्ति मळविली ॥ ध्रु० ॥
मी केवळ बालपणीं तीस पाहिली ।
रूपाची स्मृति मजला नाहिं राहिली ।
स्वकुलकथा काय तिनें गुप्त ठेविली ।
देवा मज केविं अशी भूल पाडिली ॥ १ ॥

दृढवर्मा—माझी प्रियदर्शिका जरी वनवासिनी असली, तरी सुखरूप आहे ना ?

धौम्य—होय राजा, ती सुखरूप आहे. तिला तूं जो हा वत्सराज वर योजिला होतास त्याजवरच तिचें प्रेम जडलें आहे.

विदूषक—मग होऊंद्या तर आतां लाडवांची तयारी !

ऋषिकुमार—(हंसतात.)

वासवदत्ता—बाबा, माझ्या हातून केवळ भ्रमानं ही चुकी झाली, याबद्दल मी तुमची क्षमा मागतें.

दृढवर्मा—बाळे, यांत तुझा काय बरें अपराध ?

वासवदत्ता—पण, आतां तिला स्वहस्तानें महाराजांस अर्पण केल्याशिवाय माझं समाधान होणार नाहीं.

राजा—(स्वगत) काय विचित्र खेळ चालले आहेत पहा ! ती सुंदरी हिची मावस बहीण असतां, केवळ चुकीनें हिच्याकडून हा भयंकर प्रमाद झाला ! असो. आजचा दिवस मात्र आनंदाचा खरा !

दृढवर्मा—मुनिराज, आतां माझी आपणास इतकीच विनंति आहे, कीं, आपण आमच्याबरोबर कौशाम्बीस येऊन हा एवढा मंगलसमय सुशोभित केला पाहिजे.

विदूषक—होय मुनिराज, आपण पंक्तींत बसल्याशिवाय भोजनसमारंभास यावी तशी शोभा येणार नाहीं. यासाठीं मीहि आपणांस आग्रहपूर्वक सांगतों, कीं, आपण कौशाम्बीस आलेंच पाहिजे ! बरें यावयाचें तें एकटेंच येऊन उपयोगी नाहीं, तर सकुटुंब सपरिवार आलें पाहिजे. ह्मणजे आमचें कुटुंब व आपलें

कुटुंब चार दिवस एके ठिकाणीं राहिल्यानें, आमच्या कुटुंबाच्या खाष्ट स्वभावांत कांहीं तरी बदल झाला तर होईल व आमचा कपाळशूळ एकदाचा कायमची जलसमाधि घेईल.

धौम्य—बेट्या वसंतका, तुझें आमंत्रण मी मोठ्या आनंदानें मान्य करितों.

वासवदत्ता—मग चलावं तर आतां. त्या माझ्या प्रियभगिनीला प्रेमपूर्वक केव्हां आलिंगीन असं मला झालं आहे.

राजा—(स्वगत) आणि मलाहि तसेंच झालें आहे.

विदूषक—आणि परातभर लाडू केव्हां उठवीन असें मला झालें आहे.

[जातात.

प्रवेश पांचवा.

[**स्थल**-नदीतीर. दर्शिका प्रवेश करिते.]

दर्शिका—

पद (राग-मांड-दादरा.)

मन दुभागलें । विफल हेतु जाहले ॥ ध्रु० ॥
बहु होती मज आशा । नष्ट कशी जगदीशा ।
केलिस तीं; रडुनि वृथा नेत्र शिणविले ॥ १ ॥
सांग विधे मम भाळीं । किति दुःखें तरि लिहिलीं ।
याहुनि मज मृत्युमुखीं कां न लोटिलें ॥ २ ॥

देवा, बाल्यावस्थेंतून मला या तारुण्यावस्थेंत आणून माझे असे हाल करण्यापेक्षां मला बालपणींच मरण कां दिलं नाहींस ? त्या मुनिवर्यांनीं सांगितलेला हा शेवटचा दिवस आणि माझ्या आयुष्याचाहि हाच शेवटचा दिवस. माते भागीरथी!

पद (**चाल**-हे प्रभो विभो०)

घे मला त्वरें अगाध या तव सलिलीं ।
करिं पावन दुहिता अपुली ॥ ध्रु० ॥
वीट या जगाचा आला ।
जीव हा नकोसा झाला ।
ठाव दे स्वजठरीं त्याला
विनति हीच पदकमलीं ॥ १ ॥

राजा—(शिकारीच्या वेषानें प्रवेश करून) हें मी काय पाहतों ? ही राजकन्या येथें कशी आली ? अथवा राणीच्या छलास कंटाळून आपल्या जीवाचें कांहीं तरी भलतेंसलतें करून घेण्याच्या इरायानें तर ही येथें आली नसेल ? ही आपल्या स्वतःशींच कांहीं बोलत आहे असें वाटतें, तर आपण येथूनच ती काय बोलते तें ऐकावें.

दर्शिका—हा सूर्यनारायण अस्ताचलाचा मार्ग आक्रमण करून पाताळांत जाण्यास निघाला, तर आतां त्या बालमुनीच्या वचनावर विश्वास ठेवण्यांत काय अर्थ आहे ? या भगवान् सूर्यनारायणावरोबर आपणहि हा भूलोक सोडून जावं, हें उत्तम. प्रभो ! ज्यांनीं मला जन्म देऊन माझं प्रीतिपूर्वक परिपालन केलं व माझ्यासाठीं असह्य दुःखं सहन केलीं, त्या माझ्या प्रिय आई-वापांस व ज्यांच्यावर माझं सहज प्रेम जडलं त्या वत्सराज महाराजांस सुखी ठेव, इतकीच माझी तुला शेवटची विनंति आहे.

पद (चाल—नशिब फिरलें०)

नृपतितिलका । मम वंदन हें तव चरणीं ॥
तूं नांद सुखानें येथें । शोभवि ही धरणी ॥ ध्रु० ॥
विषम मम मनीषा पूर्ण होईल कैशी ।
न करुनि सुविवेका गुंतलें प्रेमपाशीं ॥
परि विफलचि झाली सर्व ती आज आशा ।
ह्मणवुनि करितें मी वल्लभा, प्राणनाशा ॥
घेऊनि पुनर्जन्मासी । होईन अपुली दासी ।
वच हें सत्य गणीं । मम वंदन हें तव चरणीं ॥ १ ॥

राजा—(स्वगत) आतां पुढें होण्यास ही वेळ फार चांगली आहे. (पुढें होऊन)

साकी.

प्राणघात कां करिशी, कारण नाहिं पुनर्जन्माचें,
दुर्दैवाचा खेळ संपला, फिरलें मन राज्ञीचें;
आलिंगन देईं । हा मम कर निजकरिं घेईं ! १

दर्शिका (राजास आलिंगून) महाराज ! आपली स्वारी अशा वेळीं इथं कशी आली ? मी आपली सुखानं प्राणनाश करणार होतें, इतक्यांत इथं येऊन मला वांचविण्याचं आपणास काय प्रयोजन होतं ?

राजा—वेडे, तूं जी क्षुल्लक त्रासास कंटाळून एकदम जीव द्यावयास प्रवृत्त झालीस, त्या तुला ह्मणावें तरी काय ? शिकारीच्या मागें लागून व वाट चुकून मी जर या वेळीं येथें आलों नसतों, तर तुझी काय अवस्था झाली असती बरें ? (तिच्या हनुवटीस हात लावून) हा सुंदर मुखचंद्रमा पुनः माझ्या कधीं तरी दृष्टीस पडला असता काय ?

दर्शिका—आणि मीं जीव दिल्यावर हा मुखचंद्रमा माझ्यातरी कुठून दृष्टीस पडला असता ? पण महाराज, राणीसाहेबांचं मन फिरलं असं जें आपण ह्मणालां, त्याचा अर्थ काय ?

राजा—लाडके, हा सर्व तुझा अपराध आहे व त्यावद्दलची शिक्षा राणी तुला लवकरच देणार आहे, समजलीस ? आपलें कुलशील आणि खरें नांव गुप्त ठेविलें असतां काय होतें, हें तुला चांगलें समजलें पाहिजे !

दर्शिका—प्राणनाथ, पण मीं असा अपराध तरी काय केला ?

राजा—अपराध कोणता, तें तुला मागाहून समजेल; पण त्या अपराधाबद्दल जी शिक्षा तुला देण्यांत येणार आहे, ती मात्र फार भयंकर आहे !

दर्शिका—पण अशी काय भयंकर शिक्षा आहे, ती तरी ऐकूंद्या.

राजा—तूं ज्या पारतंत्र्यदुःखाला कंटाळून जीव द्यावयास निघाली होतीस तेंच पारतंत्र्य कायमचें तुझ्या कपाळीं येणार आहे. तुझ्या आईबापांसमक्ष वासवदत्ता तुला माझ्या स्वाधीन करणार आहे.

दर्शिका—काय माझे आईबाप अद्याप जीवंत आहेत ? देवा ! त्यांस सुखी ठेवल्याबद्दल मी तुझे किती आभार मानूं ? महाराज, राणीसाहेब जर मला हीच शिक्षा देणार असतील तर ती माझ्या जिवांत जीव असेपर्यंत आनंदानं भोगण्यास मी तयार आहें.

राजा—तर चल आतां तिकडेच जाऊं. पण शिपाई जसे अपराध्यास बांधून नेतात, तसा मी तुला माझ्या बाहुपाशांनीं बद्ध करून नेणार.

दर्शिका—महाराज, आपण सार्वभौम राजे आहां, तेव्हां आपण जशा रीतीनं मला न्याल तशा रीतीनं आपण न्याल तिकडे जाणं हें माझं कर्तव्य आहे.

[जातात.

प्रवेश सहावा.

[**स्थल**—अरण्यांतील महाल. विदूषक प्रवेश करितो.]

विदूषक—हाच तो अरण्यांतील महाल. पण ती राजकन्या येथें कोठें दिसत नाहीं. बरें, ती मनोरमा तरी येथें असावी पण तीहि दिसत नाहीं.

मनोरमा—(प्रवेश करून) देवा! आतां आरण्यकेला मी शोधूं तरी कुठं ? तूं नगरांतून जाऊन येईपर्यंत मी रामायण वाचित बसत्यें असं ती ह्मणाली होती. असं असतां इतक्यांत ती गेली तरी कुठं ? अलीकडे ती अगदीं निराश झाली होती, तेव्हां या वनवासदुःखास कंटाळून तिनं आपल्या जीवाचं कांहीं भलतं सलतं तर करून घेतलं नसेल ना !

विदूषक—ही बट्कीची पोर आपल्याशींच काय बरें पुटपुटत आहे ? आणि हिचें तोंड असें रडवें कां दिसतें ? आज हिनें उपोषण तर केलें नसेल ना ? (उघड) मनोरमे, ती राजकन्या कोठें आहे ?

वासवदत्ता—(प्रवेश करून) मनोरमे, माझी आरण्यका काय करित आहे ?

मनोरमा—(स्वगत) देवा, मी आतां यांनां काय सांगूं ? काय ती येथून निघून गेली ह्मणून सांगूं, कीं, तिनं जीव दिला ह्मणून सांगूं ?

विदूषक—पोरी, बोलत कां नाहींस ?

मनोरमा—बाईसाहेब, ही मी आतांच नगरांतून इकडे आल्यें. इथं येऊन पाहतें तों आरण्यका कुठें दृष्टीस पडेना, ह्मणून मी आसपास तिचा शोध केला परंतु कांहींच पत्ता लागला नाहीं. मला असं वाटतं, कीं, तिनं आपल्या जिवाचं—

वासवदत्ता—हरहर, काय अनर्थ हा !

पद (राग भैरवी–त्रिवट.)

गेलिस का प्रियभगिनी ।
नश्वर जग हें तूं सोडोनी ॥ ध्रु० ॥
अधमाधम मी कृत्या केवळ ।
दुःख दिलें गे तुजलागोनी ॥ १ ॥
शून्य तुझ्याविण मजला गमतें ।
विश्व सकल हें गुणरूपखनी ॥ २ ॥

धावुनि आलें तुज भेटाया ।
दैवें केली विचित्र करणी ॥ ३ ॥

देवा ! दृढवर्मा महाराजांस आणि प्राणनाथांस हें मुख मी आतां कसें दाखवूं ?

(विजयसेन प्रवेश करितो.)

विदूषक—विजयसेन, आह्मी मोठ्या आनंदानें येथपर्यंत आलों खरे, परंतु, त्या राजकन्येचा कोठें पत्ता नाहीं.

(राजा व दर्शिका प्रवेश करितात. दर्शिका मागें राहते.)

विजयसेन—हे महाराज आले.

राजा—कां, सर्व मंडळी अशी चिंताक्रांत कां दिसते?

वासवदत्ता—महाराज, माझी आरण्यका कुठं निघून गेली हो !(रडूं लागते.)

राजा—काय ह्मणतेस ! निघून गेली ? (दर्शिकेस) राजकन्ये, ही पहा तुझी भगिनी तुझ्या विरहानें कशी शोकाकुल झाली आहे, तर तिला भेटून तिचें शांतवन कर वरें.

दर्शिका—(प्रवेश करून) वाईसाहेब, ही मी जिवंत असतां आपण माझ्यासाठीं असा शोक करावा हें काय बरं ?

वासवदत्ता—(दर्शिकेस पोटाशीं धरून) बाळे, मी तुझी भगिनी बरं ! माझ्याकडून तुला फार दुःख भोगावं लागलं, याची तूं मला क्षमा करशील ना ?

दर्शिका— (स्वगत) काय चमत्कार आहे !

पद (चाल–भूपति खरे ते वैभव०)

त्या वालमुनीची पूर्ण कृपा मजवरती ।
कीं वचन तयांचें अमृतसिंधु या जगतीं ॥
जे दर्शन देउनि पावन मजला करिती ।
तें अनृत वच कसें होय मुखें जें वदती ।
आभार फार हे झाले मजवरी ।
हा प्राण द्यावया गेलें मी जरी ।
धावोनि सुख पुढें आलें यापरी ।
जी केवळ रागें मजला गांजित होती ।
ती क्षमा मागते; नवल वाटतें चित्तीं ॥ १ ॥

(उघड) भगिनी, मी दृढवर्मा महाराजांची कन्या असतां, मला तूं विंध्यकन्या समजल्यामुळं हा प्रमाद घडला. पण तो दोष मजकडेच येतो. कारण, मीं तरी आपलं कुलशील कां लपवावं ?

[दृढवर्मा प्रवेश करितो.]

दर्शिका—कोण, बाबा ! (त्यास आलिंगून) बाबा माझी प्रियआई कुठं आहे ?

दृढवर्मा—बाळे,

साकी.

नीच कलिंगें अन्यायानें व्यर्थचि आह्मां छळिलें,
परि ईशाच्या पूर्ण कृपेनें आज नवल घडलें;
स्वस्थ रहा आतां । उद्यां येइल तव माता. १

वसुभूति—बाळे, मला ओळखलेंस का ?

दर्शिका—वसुभूति, तुह्माला मी कशी बरं विसरेन ? त्या अनर्थांत तुह्मींच माझं संरक्षण केलं.

धौम्य—(दृढवर्म्यास) राजा, माझ्या आश्वासनाप्रमाणें आज सगळ्या गोष्टी घडून आल्या ना ?

दृढवर्मा—काय सांगूं मुनिवर्य ! आपल्या चरणकृपेनें मी आज केवळ आनंदसागरांत मज्जन करित आहें !

पद (चाल–नाहिं सुभद्रा या०)

वचन नव्हे तें मजला गमतें खाणचि अमृताची ।
चिंताग्नींतुनि आज मुक्तता झाली या तनुची ॥

धौम्य—

अन्य नसे हें केवळ लीला त्या परमेशाची ।
खेळ खेळतो रंगभूमिका करुनी विश्वाची ॥ १ ॥

(वासवदत्तेस) मुली, तुझें जें काय अभीष्ट असेल तें आतां पूर्ण करून घे पाहूं.

वासवदत्ता—(दर्शिकेस) बाळे, आतां अशी मजकडे ये बरं. मी तुला महाराजांस माझी प्रीतीची भेट ह्मणून अर्पण करणार !

दर्शिका—(लाजते.)

मनोरमा—आतां आमच्या धाकट्या राणीसाहेब होणार तुह्मी, अन् अशा लाजतां काय ?

वासवदत्ता—बाळे, आतां लाज नाहीं कामाची. (तिला हातीं धरून) महाराज, तुह्मीहि असे पुढं या, आणि जशी मी तशीच ही माझी प्रियभगिनी आपली अर्धांगी असं समजून हिचं पाणिग्रहण करा, ह्मणजे मला फार आनंद होईल.

राजा—प्रिये, तुझ्या वचनाविरुद्ध मी कधीं तरी वागलों आहें का ?

वासवदत्ता—

पद (राग–ललत–त्रिवट.)

मी धरुनि करीं तुज भगिनी ।
अर्पितसें या नृपवरचरणीं ॥ ध्रु० ॥
हिमकरसन्निध रोहिणी जशी ।
दिसशि तशिच मज गुणरूपखनी ॥ १ ॥

धौम्य—(वासवदत्तेस) शाबास प्रद्योतकन्यके ! आपल्या पतिप्रेमानें तूं आज आपल्या दोन्ही कुलांचा उद्धार केलास, यांत संशय नाहीं !

वासवदत्ता—मुनिराज, ही सर्व आपली कृपा आहे.

राजा—(दर्शिकेचें करग्रहण करितो. पुष्पवृष्टि होते.) बरें, माझे मनोरथ तर माझ्या प्रियतमेनेंच पूर्ण केले; आतां विजयसेन! तुमचे मनोरथ मी पूर्ण करितों. मनोरमे, चल ये अशी पुढं.

मनोरमा—(लाजते.)

दर्शिका—मनोरमे, आतां ग कां लाजतेस अशी ! (तिला ओढून) चल ये अशी.

राजा—

दिंडी.

शूर वीरा प्रियसख्या विजयसेना !
विजयशाली तूं मारुनी रिपूंनां;
अर्पितों मी ही तुला निजकरानें
अंगिकारीं हिस पूर्ण सुखभरानें.

विजयसेन—महाराज, आपली आज्ञा मला शिरसा मान्य आहे. (मनोरमेचें करग्रहण करितो.)

विदूषक—बरें, राणीसाहेब, मी आपणास कांहीं विचारीन ह्मणतों, परंतु राग येणार नाहीं तर !

वासवदत्ता—भटजीबुवा, तुह्माला जें काय विचारायचं असेल तें खुशाल विचारा. त्याबद्दल मला मुळींच राग येणार नाहीं.

विदूषक—त्या दिवशीं, ज्या गोष्टींत मी सामील आहें अशा नुसत्या संशयावरूनच आपण आह्माला चतुर्भुज करून अंधारखान्यांत कोंडून ठेविलें, तीच गोष्ट आज आपण स्वतः घडवून आणिली, हें कसें काय ?

राजा—प्रियतमे, माझ्या मित्रानें येथें मात्र तुला अडविलें खरें !

वासवदत्ता—एवढंच ना ? मी वसंतक भटजींची क्षमा मागतें, मग झालं ना ?

विदूषक—(राजास) बरें राजश्री, आपण तर एकीपेक्षां एक अशा दोन बायका करून मोठ्या आनंदानें मान डोलवित आहां; पण आमच्या लाडवांची आणि दक्षिणेची वाट काय ? बरें आमचें एक राहिलें, पण या मुनिराजांस जें मीं इतक्या आग्रहानें येथपर्यंत आणिलें, त्यांच्या भोजनाची तरी कांहीं व्यवस्था कराल कीं नाहीं ?

दृढवर्मा—भटजीबुवा, उद्यां कौशाम्बीस गेल्यावर हा विवाहसमारंभ सुमुहूर्तानें आणि वेदविधिपूर्वक व्हावयाचा आहे, समजलांत.

धौम्य—वेड्या वसंतका, मी तुजबरोबर आहें ना ? मग तूं असा निराश कां होतोस ?

विदूषक—मुनिराज, या आपल्या आशापूर्ण भाषणानें माझी निराशा नष्ट होऊन मी आशापर्वताच्या अगदीं शिखरावर चढून बसलों; परंतु येथून जर का खालीं पडलों, तर मग मात्र अवस्था कठीण !

धौम्य—तूं स्वस्थ रहा. (राजास)

पद (चाल-वाटे सर्वथा मुक्त झालों॰)

भूपा ! तुज असो विजय आतां । ध्रु॰ ॥
सकल महि तुज वरो ।
शत्रुगण थरथरो ।
अखिल तव कामना पूर्ण शंकर करो ।
यशिं हो सुरगणा सौख्यदाता ॥ भूपा॰ ॥ १ ॥

राजा—गुरुराज, आतां हें एवढें भरतवाक्य असो.

पद (राग–मालकंस–त्रिवट.)

होवो सौख्य जनां सकलां ।
प्रसरो विद्याकला सुविमला ॥ ध्रु० ॥
स्वातंत्र्याचा पर्जन्य पडो ।
विरह कुणातें कधींहि न घडो ।
प्रभुपदकमलीं सद्भाव जडो ।
यवो उदया ही नाट्यकला ॥ १ ॥

धौम्य—तथास्तु तथास्तु तथास्तु !

[पडदा पडतो.]

सज्जनप्रार्थना.

पद (ताल–धमार.)

काय सांगूं नवकुतूहल । उदय पावत मम सुकृतबल ।
नाट्यकृति ही रुचिर सुविमल । करिल वाटे कार्य अभिनव ॥ १ ॥
पूर्ण करुणा हरिहरांची । होय तरि वाक् पामराची ।
सुरगुरूसम करिल साची । कार्य, कविचें थोर वैभव ॥ २ ॥
हे परिश्रम पंचवार्षिक । रसिकपदिं मी अर्पि बालक ।
घ्या करीं ही कृति सकौतुक । सफल कर्ता श्रीसदाशिव ॥ ३ ॥
जगन्नाथ जगन्नियामक । तूंचि कर्ता तूंचि चालक ।
तुजपुढें हे विश्वपालक । काय आह्मी क्षुद्र मानव ॥ ४ ॥

समाप्त.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें प्रसिद्ध केलेलीं विक्रीस तयार पुस्तकें.

पुस्तक.	नांव.	किंमत.
१ लें,	धाकट्या सूनबाई.	०-१०-०
२ रें,	संसारांतल्या गोष्टी.	०—६—०
३ रें,	गुणसुंदरी. ...	०-१२-०
४ थें,	नवयुग. ...	०-१२-०
५ वें,	सरस्वती. ...	०-१०-०
६ वें,	द्रोणसंकोप....	०—६—०
७ वें,	विलक्षण भोळेपणा.	०—८—०
८ वें,	सुंदरमाधव.	०-१०-०
९ वें,	रावबहादुर....	०—६—०
१० वें,	कुसुमगुच्छ....	०—४—०
११ वें,	मृणालिनी. ...	०—८—०
१२ वें,	दुःखाअंतींसुख.	१—४—०
१३ वें,	माणिकबाग....	१—४—०
१४ वें,	चतुरविनोदीस्त्रिया.	०—६—०
१५ वें,	राजा तोडरमल.	०-१२-०
१६ वें,	प्रियंवदा. ...	०-१०-०
१७ वें,	संसाररंजन.	१—०—०
१८ वें,	वंगजागृति. ...	०—४—०
१९ वें,	श्रीकृष्णचरित्र.	०—४—०
२० वें,	भयंकर ग्रहदशा.	०—६—०
२१ वें,	संशयी जिजाबाई.	०—२—०
२२ वें,	सुधारणेचामध्यकाळ.	०-१२-०
२३ वें,	मुद्राराक्षस....	०-१०-०
२४ वें,	मालतीमाधव.	०-१०-०
२५ वें,	उपदेशपाठ....	०—४—०
२६ वें,	परिणामीं हेंच.	०—८—०
२७ वें,	मूर्तिमंत देशाभिमान.	०-८—०
२८ वें,	ऐतिहासिक स्त्रिया.	०—८—०
२९ वें,	प्रेम—कहाणी.	०—१२—०
३० वें,	वेड्यांचें इस्पितळ.	०—३—०
३१ वें,	नव-कुसुम-माला.	०—३—०
३२ वें,	दोन घटका मनोरंजन (भाग १ ला.)	१—४-०
३३ वें,	ही रामाची अयोध्या.	१—०-०
३४ वें,	गौप्यगोपन. ...	०—८—०
३५ वें,	भयंकर सूड.	०—४—०
३६ वें,	नीलांबरी.	०—३—०
३७ वें,	महाराणा संग्रामसिंह	०—८—०
३८ वें,	जीवनसंध्या.	०-१२-०
३९ वें,	अमृतपुलिन.	०—६—०
४० वें,	दोन घटका मनोरंजन (भाग २ रा.)	१—४—०
४१ वें,	सुशिक्षित स्त्री.	०-१०-०
४२ वें,	लीला.	०-१२-०
४३ वें,	मुरारराव. ...	०—४—०
४४ वें,	रमामाधव.	०—४—०
४५ वें,	नशिबाची परीक्षा.	१—४—०
४६ वें,	विवेकानंदाचीं पत्रें.	०—४—०
४७ वें,	प्रेमविजय. ...	०—६—०
४८ वें,	भद्रंभद्र. ...	०-१०-०
४९ वें,	काव्यकुंज....	०—४—०
५० वें,	स्वामी रामतीर्थ.	१—४—०
५१ वें,	संगीत प्रणयानंद.	०—८—०
५२ वें,	आमच्या-आठवणी.	१—०—०
५३ वें,	सुदाम्याचे पोहे.	०—१२—०

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.